CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, २८ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २९८ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# मी कसलीही ‘ढवळाढवळ’ करणार नाही; ‘स्थानिक आमदार’च ठरवतील उमेदवार

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सोलापुरात स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सोलापूर शहर उत्तर आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघाचे आमदारद्वय अनुक्रमे विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख हे दोघेही जुने, अभ्यासू लोकप्रतिनिधी आहेत. त्यांच्या तुलनेत मी लहान कार्यकर्ता आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत मी कसलीही ढवळाढवळ करणार नाही, अशी स्पष्टोक्ती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.

आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख हे दोघे मंत्रीपदेही भोगली आहेत. सोलापूर इतके ‘भाजपा’चे मोठे प्राबल्य राज्यात कोणत्याही शहरात नाही. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत कोणत्या प्रभागातून कोणते उमेदवार द्यायचे? याचा पूर्ण निर्णय स्थानिक आमदारांचाच असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत समन्वयक म्हणून मी काम करीत



आहे. माझी भूमिका पार पाडताना स्थानिक आमदारांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी माझ्यावर नाराजी व्यक्त करणे हा त्यांचा हक्क-अधिकार आहे. ‘महायुती’बाबत माझ्याकडे शिवसेना शिंदे गटासह ‘रिपाइं’चा प्रस्ताव आला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून तसा प्रस्ताव आलेला नाही, असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख यांच्यामुळे सोलापूर शहरात ‘भाजपा’ची मजबूत पकड झाली आहे. या दोघा आमदारांची नाराजी दूर करण्यासाठी आजरोजी सोलापुरात आलोय. चर्चेअंती त्यांची नाराजी दूर झालेली आहे. महानगरपालिका निवडणुकीची रणनीती ठरविण्यात येणार आहे. ‘७५ पार’चा आपला नारा कायम राहणार आहे, असे सांगायलाही ते विसरले नाहीत. **(उर्वरित वृत्त पान ३ वर)**

**आम्हाला होती भीती :** गेल्या ४० वर्षांपासून पक्षात काम करीत आहे. पक्षश्रेष्ठींचा आदेशही पाळत आलोय. लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणूक असली की, आमचे कार्यकर्ते-पदाधिकारी जीव तोडून काम करतात. मात्र यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत निष्ठावंत कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्यात येत होती. तिकीट वाटपात निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जाण्याची आम्हाला भीती होती. त्यामुळे आवाज उठविला. आजरोजी पालकमंत्री गोरे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेअंती नाराजी दूर झाली, अशी कबुली आ.विजयकुमार देशमुख यांनी दिली.

**येत्या दोन दिवसात यादी जाहीर :** जागा वाटपात योग्य तोडगा निघाला तरच युती होणार अन्यथा भाजपा स्वबळावर लढणार आहे. ज्याठिकाणी आमचे भक्कम आणि निष्ठावंत उमेदवार आहेत, त्या जागा आम्ही शिंदेसेनेला सोडणार नाही. येत्या २ दिवसात उमेदवारांची यादी जाहीर करणार आहोत, असेही पालकमंत्री यांनी सांगितले.

# बोअरची मोटार काढत असताना
# विद्युत तारेस स्पर्श; चार जणांचा मृत्यू



- मौजे केशेगाव शिवार येथील घटना
- मृतात बाप लेकाचा समावेश

**तभा वृत्तसेवा । दिनेश सलगरे**
**इटकळ, दि. २७ डिसेंबर-**

धाराशिव जिल्ह्यातील इटकळ-तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव शिवारात बोअरची



मोटार काढत असताना विद्युत तारेस स्पर्श झाल्याने चार जणांचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास घडली. मृतांमध्ये बाप लेकाचाही समावेश आहे. गणपती साखरे यांच्या शेतात बोअरचे काम करताना ‘महावितरण’च्या विद्युत तारेस कप्पीचा स्पर्श झाला. काशिम कोंडीबा फुलारी (वय-५४), रतन काशिम फुलारी (वय-१६), रामलिंग नागनाथ साखरे (वय-३१) नागनाथ साखरे (वय-५५, रा.केशेगाव, ता.तुळजापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमधील रतन फुलारी हा इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होता. वेळप्रसंगी तो वडील कासीम फुलारी यांना मदत करीत होता. मृतांमधील रामलिंग साखरे व नागनाथ साखरे हेही बापलेक आहेत.

या घटनेत दोन्ही बापलेकांचा मृत्यू झाल्याने केशेगावसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. इटकळ औट पोस्टचे पोलिस पुढील तपास करीत आहेत.




# नगरसेवक पदासाठी इच्छुक
# तृतीयपंथीयाचा खून?

## प्रभाग क्रमांक १६ मधून केली होती तयारी


**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी एमआयएम या पक्षाकडून इच्छुक असलेल्या ५० वर्षीय तृतीयपंथीयाचा मृतदेह लष्कर परिसरातील मुर्गीनाला येथील एका मस्जिदजवळ असलेल्या त्याच्या घरात आढळून आला. आयुब सय्यद असे त्याचे नाव आहे. प्रभाग क्रमांक १६ मधून तो निवडणुकीची तयारी करीत होता. तशा आशयाचे बॅनर्सही लावले जात होते. अज्ञातांनी त्याचा खून केल्याचे बोलले जात आहे.

सदर बझार पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. आणि तृतीयपंथी आयुबच्या घराचे दार उघडले असता, तो बेडवर निपचित पडल्याचे दिसून आले. त्याच्या तोंडावर उशी होती. त्या उशिनेच अज्ञाताने त्याचा खून केला असल्याचा संशय नातेवाईकांकडून व्यक्त करण्यात आला. त्याच्या घराशेजारी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. रात्री २ ते ३ वाजण्याच्या सुमारास त्याच्या घरातून तिघे अज्ञात इसम बाहेर पडतानाचे दृश्य कॅमेऱ्यात दिसून आले.



त्या अज्ञात इसमांपैकी एकाच्य हातात बॅग, डोक्यावर टोपी व पायात पांढरे बूट दिसून येतायत. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज जप्त केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार (सिव्हील हॉस्पीटल) येथे त्याचा मृतदेह विच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आयुब सय्यद हा मनमिळावू स्वभावाचा होता. त्याच्याकडे किलोभर सोनं आणि पैसे होते. त्या हव्यासापोटी त्याचा खून झाल्याची कुजबुज परिसरात सुरु होती. दरम्यान, या हत्येच्या घटनेनंतर पोलिसांनी ललीीं मध्ये दिसणाऱ्या तीन संशयित आरोपीचा शोध सुरु केला आहे. दरम्यान अय्युब यांची हत्या नेमकी कशामुळे झाली? याचा तपास देखील सोलापूर शहर पोलिसांच्या वतीने केला जात आहे. सय्यद हे आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग १६ मधून निवडणुकीसाठी इच्छुक होते. तसे विडिओ फोटो त्यांनी इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केले असून त्याला लाखोंच्या संख्येने व्हिव्ज आहेत.









CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बांगलादेशात संगीत कार्यक्रमात धुडगूस

## कट्टरवाद्यांची दगडफेक-जाळपोळ ● पाच विद्यार्थी ठार ● जेम्सच्या कॉन्सर्टमध्ये ३८ जखमी



◆ **ढाका, २७ डिसेंबर**

बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य करून सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पृष्ठभूमीवर आता कट्टरवाद्यांनी एका शाळेच्या संगीत कार्यक्रमात धुडगूस घालत प्रचंड गोंधळ घातला. कट्टरवादी जमावाने शुक्रवारी रात्री बांगलादेशातील फरीदपूर जिल्ह्यातील शाळेत प्रसिद्ध रॉक संगीतकार जेम्स यांच्या कार्यक्रमात दगडफेक आणि जाळपोळ केली. यात पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर आयोजकांसह ३८ नागरिक जखमी आहे. या घटनेमुळे आयोजकांना कार्यक्रम रद्द करावा लागला.

आयोजन समितीचे संयोजक डॉ. मुस्तफिजुर रहमान शमीम यांनी वृत्तसंस्थेला माहिती देताना सांगितले की, फरीदपूर जिल्ह्यात शुक्रवारी रात्री शासकीय जिल्हा शाळेच्या १८५ व्या वर्धापनदिनी गायक जेम्स यांचा संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात पासेस असलेल्यांनाच प्रवेश देण्यात आला होता. कट्टरवादी जमावाने बळजबरीने कार्यक्रमात प्रवेश करीत दगडफेक करण्यास सुरुवात केली. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी मंचावर पेट्रोल बॉम्ब फेकले आणि जाळपोळ केली. या घटनेत विद्यार्थी आणि पालक आणि आयोजक समितीच्या सदस्यांसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर ३८ नागरिक जखमी झाले. या घटनेनंतर ऐनवेळी कार्यक्रम रद्द करावा लागला. पोलिसांनी हल्लेखोरांवर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. दरम्यान, फरीदपूर जिल्हा शाळा या भागातील सर्वांत जुन्या सरकारी संस्थांपैकी एक आहे, शाळेची स्थापना १८४० मध्ये ब्रिटिश राजवटीत झाली होती.



### थोडक्यात बचावले बँड पथक

जमावाने मंचावर पेट्रोल बॉम्ब फेकले, यात बँड पथकातील सदस्य थोडक्यात बचावले. संगीतकार जेम्स यांना सुरक्षा कर्मचाऱ्यांनी घेराव घालत कार्यक्रमस्थळावरून सुखरूपपणे हॉटेलात पोहोचविले. कार्यक्रमासाठी पोलिसांची परवानगी घेण्यात आली होती. बंदोबस्तासाठी पोलिस आणि खाजगी सुरक्षा कर्मचारी उपस्थितीत असताना कट्टरवादी जमावाने हैदोस घातला. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा उपायुक्तांच्या निर्देशानुसार कार्यक्रम रद्द करावा लागला, अशी माहिती शमीम यांनी दिली.

### दहा संशयित ताब्यात

शाळेतील कार्यक्रमात झालेल्या हल्ल्याचा तपास सुरू करण्यात आला. याप्रकरणी दहा लोकांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिस अधीक्षक उस्मान आदील खान यांनी दिली. दरम्यान, बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांनी बांगलादेशातील घटनांचा तीव्र निषेध केला आणि म्हटले की कट्टरपंथीयांनी संगीत, नाट्य, नृत्य आणि कला यांच्याशीही शत्रुत्व जाहीर केले आहे. त्यांनी जिहादीचा मार्ग अवलंबला असून, देशाची वाटचाल विनाशाच्या मार्गावर सुरू आहे. ■

### बांगलादेशी गायक जेम्स कोण आहे?

जेम्स म्हणून ओळखले जाणारे फारुक महफुज अनम हे बांगलादेशी गायक-गीतकार, गिटारवादक आणि संगीतकार आहेत. त्यांनी गँगस्टर, लाइफ इन अ मेट्रो, अलविदा या हिंदी चित्रपटासाठी गाणी गायली. ते बांगलादेशात अत्यंत लोकप्रिय आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# हजारो डॉक्टर्स, अभियंत्यांनी सोडले पाकिस्तान

## सरकारी अहवालामुळे आसीम मुनीरची नाचक्की

◆ **इस्लामाबाद, २७ डिसेंबर**

अत्यंत बिकट अर्थव्यवस्था, राजकीय अस्थिरता आणि रोजगार उपलब्ध होत नसल्याने मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित तरुण आणि कुशल कामगार पाकिस्तान सोडून जात आहे. मागील वर्षभरात पाच हजार डॉक्टर्स, ११ हजार अभियंते आणि १३ हजार अकाउंटंट्सने देश सोडल्याचा अहवाल पाकिस्तानच्या ब्युरो ऑफ इमिग्रेशन ॲण्ड ओव्हरसिज एम्प्लॉयमेंटने दिला आहे. या अहवालामुळे वल्गना करणारा लष्करप्रमुख आसीम मुनीरची नाचक्की झाली.

आर्थिक संकटाला तोंड देणाऱ्या पाकिस्तानवर आणखी एक नामुष्की पत्करावी लागत आहे, असे पाकिस्तानातील माजी खासदार मुस्तफा नवाझ खोकर यांनी म्हटले.

### 'फ्रीलान्सिंग हब'चे मोठे नुकसान

या मुद्यावर मुस्तफा नवाझ खोकर यांनी चिंता व्यक्त केली. पाकिस्तान जगातील चौथा मोठा 'फ्रीलान्सिंग हब' आहे. मात्र, इंटरनेट सतत खंडित होत असल्याने देशाचे १.६२ अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले. यामुळे देशातील २३.७ लाख फ्रीलान्स नोकऱ्या धोक्यात आल्या असल्याचे खोकर यांनी म्हटले. देशातील राजकारणात सुधारणा होत नाही, तोवर देशाची अर्थव्यवस्थेत सुधारणा होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ■

पाकिस्तानातील नागरिकच आता शाहबाझ सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करीत असल्याचे त्यांनी म्हटले. एकीकडे माजी खासदार मुस्तफा नवाझ खोकर यांनी शाहबाझ सरकारवर टीकेची उठवली आहे, तर दुसरीकडे, 'ब्रेन ड्रेन नव्हे, तर ब्रेन गेन' या पाकिस्तानी सैन्याचे प्रमुख फिल्ड मार्शल आसीम मुनीर यांच्या जुन्या वक्तव्याची 'एक्स'वर खिल्ली उडवली जात आहे.

हा नवीन अहवाल समोर आल्यानंतर पाकिस्तानात मोठा गोंधळ उडाला. आसीम मुनीरवर मोठ्या प्रमाणात टीका केली जात आहे. पाकिस्तानात 'ब्रेन ड्रेन' नव्हे, तर 'ब्रेन गेन' असल्याचे काही महिन्यांपूर्वी आसीम मुनीरने म्हटले होते. त्यातच आता समोर आलेल्या आकडेवारीमुळे समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात टीका केली जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

# चीनच्या सीमेवर लष्कराचा सराव

## अरुणाचल प्रदेशात हेलिकॉप्टरद्वारे जलद तैनातीची यशस्वी चाचणी



◆ **इटानगर, २७ डिसेंबर**

भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सने अरुणाचल प्रदेशातील चांगलांग जिल्ह्यात शुक्रवारपासून संयुक्त सराव सुरू केला. पहिल्या दिवशी दोन्ही दलांनी हेलिकॉप्टरद्वारे जलद तैनातीची यशस्वी चाचणी घेतली. सरावादरम्यान सैनिकांनी उच्च पातळीची व्यावसायिक क्षमता, अनुकूलता आणि युद्धसरावाची प्रात्यक्षिके केली.

संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले की, चीनच्या सीमेला लागून असलेल्या अरुणाचल प्रदेशातील धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या चांगलांग जिल्ह्यातील विजयनगर भागात आसाम रायफल्स आणि भारतीय लष्कर यांच्यातील संयुक्त सरावाचा भाग म्हणून हेली बोर्न ऑपरेशन राबविले जात आहे. आपत्कालीन परिस्थिती आसाम रायफल्स आणि लष्करात समन्वय साधण्याच्या उद्देशाने तीन दिवस सराव केला जाईल. कठीण आणि आव्हानात्मक भूभागात कमी वेळात सैन्य तैनात करण्याची क्षमता तपासणे तसेच विशेष मोहिमांची तयारी मजबूत करणे हेदेखील सरावाचा उद्देश आहे. या सरावादरम्यान, प्रशिक्षित आणि अनुकूल सैनिकांना एका 'सिम्युलेटेड ऑपरेशनल' क्षेत्रात जलद तैनात करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### परस्पर कार्यक्षमता वाढविण्याला प्राधान्य

या सरावात वेग, समन्वय आणि अचूकतेवर विशेष भर देण्यात येईल. सरावादरम्यान सैनिकांनी उच्च पातळीची व्यावसायिक क्षमता, अनुकूलता आणि लढाऊ तयारी दाखवली. संयुक्त सरावामुळे दोन्ही दलांची ऑपरेशनल पोहोच वाढेल आणि परस्पर समन्वय आणि समज आणखी मजबूत होईल. सुरक्षा दलांच्या मते, अशा संयुक्त सरावांमुळे संवेदनशील सीमावर्ती भागात मानक कार्यपद्धती सुधारण्यात, परस्पर कार्यक्षमता वाढविण्यात आणि सामूहिक प्रतिसाद यंत्रणा मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली जाते. ■

# कर्नाटक सरकारने तोडली ४०० घरे

## बहुतांश मुस्लिमांचा समावेश ● कारवाईवर केरळच्या मुख्यमंत्र्यांची टीका

◆ **बंगळुरू, २७ डिसेंबर**

कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने बंगळुरू येथे ४०० पेक्षा जास्त घरे उद्ध्वस्त केली. यातील बहुतांश घरे मुस्लिमांची होती. या आठवड्याच्या सुरुवातीला सुरू झालेल्या कारवाईमुळे कर्नाटक राज्य सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका केली जात आहे. केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन् यांनी केलेल्या टीकेनंतर कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेस आणि डाव्या आघाडीत जुंपली आहे.

२२ डिसेंबर रोजी पहाटे चार वाजताच्या सुमारास कोगिलू गावातील फकीर कॉलनी आणि वसीम ले-आऊटमध्ये तोडफोड झाली. यात जवळपास ४०० जण बेघर झाले आहेत. सर्वाधिक थंडी असते, त्यावेळी केलेल्या कारवाईमुळे संताप व्यक्त केला जात आहे.

बंगळुरू सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेडद्वारे केल्या गेलेल्या या कारवाईसाठी चार जेसीबी मशीन आणि १५० पेक्षा जास्त पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. ही घरे उर्दू सरकारी शाळेजवळील एका तलावाच्या काठावर अवैधरीत्या उभारण्यात आली होती, असे कर्नाटक सरकारने सांगितले. मात्र, कारवाईपूर्वी कोणतीही नोटीस मिळाली नसल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे. या कारवाईमुळे शेकडो लोकांना कडाक्याच्या थंडीत रस्त्यांवर अस्थायी आश्रयगृहांमध्ये रात्र घालवावी लागली.

२५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून येथे राहणाऱ्यांकडे वैध आधार आणि मतदार कार्ड आहेत, असा दावा काही वृत्तांमध्ये करण्यात आला. येथून हुसकावण्यात आलेल्यांमध्ये बहुसंख्य परराज्यातील आणि मजुरी करणारे आहेत. गा मुद्दा काँग्रेससाठी वादग्रस्त ठरला आहे. या कारवाईच्या विरोधात लोकांनी निदर्शने केली. कर्नाटकचे महसूल मंत्री कृष्णा बायरे गौडा यांच्या घराजवळही दलित संघर्ष समितीसारख्या संघटनांनी निदर्शने केली. ◂(वृत्तसंस्था)

# २० अमेरिकी कंपन्यांवर चीनने लादली बंदी

### देशातील मालमत्ता गोठवली

◆ **बीजिंग, २७ डिसेंबर**

चीनने संरक्षण क्षेत्रातील २० अमेरिकी कंपन्यांवर बंदी घालण्याची घोषणा केली. अमेरिकन कंपन्यांनी तैवानला शस्त्रास्त्रांची विक्री केल्यामुळे १० व्यक्ती आणि २० अमेरिकी संरक्षण कपन्यांची मालमत्ता गोठविण्यात येणार असल्याची माहिती चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली.

चीनच्या देशांतर्गत संस्था आणि व्यक्तींना या कंपन्यांसोबत कोणत्याही प्रकारचा व्यापार करण्यास मनाई करण्यात आली आहे. बंदी घातलेल्या कंपन्यांमध्ये एंडुरिल इंडस्ट्री आणि या कंपनीचे संस्थापक, तसेच नऊ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या १० जणांना चीनमध्ये प्रवेशबंदी घालण्यात आली. याशिवाय नॉर्थ्रोप ग्रुम्मन सिस्टिम्स कॉर्पोरेशन आणि एल-३ हॅरिस मारिटाईम यासारख्या दिग्गज कंपन्यांवरही बंदी घालण्यात आली आहे.



मागील आठवड्यात अमेरिकेने तैवानला ११.१ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रांच्या विक्रीची घोषणा केली, यामुळे चीनने ही कारवाई केली आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले, तैवानचा मुद्दा चीनच्या मूळ हितांचा भाग आहे. चीन आणि अमेरिका यांच्या संबंधामध्ये ही लाल रेषा आहे. ही रेषा ओलांडता येणार नाही. तैवानप्रकरणी कोणताही प्रकारची चिथावणी देण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला जोरदार उत्तर दिले जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### चीनमधून भारतात येणार' रेअर अर्थ मॅग्नेट'

**नवी दिल्ली** : चीनने भारतीय कंपन्यांना आणि भारतात कार्यरत असलेल्या परदेशी कंपन्यांना रेअर अर्थ मॅग्नेट निर्यात करण्यासाठी परवाने जारी करण्यास सुरुवात केली आहे. सरकारी अधिकाऱ्यांनुसार, चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने या अर्जांवर प्रक्रिया करून त्यांना मंजुरी देण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही काळापासून या महत्त्वाच्या कच्च्या मालाचा पुरवठा थांबल्यामुळे भारतीय ऑटोमोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात चिंता होती, जी आता हळूहळू दूर होऊ शकते. ■

## चित्रपट वार्ता

### ढिल्लनच्या कॉन्सर्टमध्ये संजय दत्तची 'एन्ट्री'



**मुंबई** : गायक एपी ढिल्लनच्या कॉन्सर्ट कार्यक्रमामध्ये बॉलिवूड अभिनेता संजय दत्त अचानक स्टेजवर पोहोचला. त्याची एंट्री होताच उपस्थितांनी मोठा जल्लोष केला. हा कॉन्सर्ट मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये झाला. कॉन्सर्टदरम्यान अभिनेत्री तारा सुतारियाही स्टेजवर दिसली. एका व्हिडीओमध्ये एपी ढिल्लन संजय दत्तला स्टेजकडे घेऊन जाताना दिसला. दुसऱ्या व्हिडीओमध्ये एपीने संजय आल्याची घोषणा करताना दिसला. यो मुंबई, या लिजेंडसाठी जल्लोष करा, असे तो म्हणाला. यावर उपस्थितांचा उत्साह आणखी वाढला. कॉन्सर्ट दरम्यान एपी ढिल्लनने संजय दत्तच्या पायांना स्पर्श केला. हा पंजाबी मुंडा माझा धाकटा भाऊ आहे, असे संजय म्हणाला. ■

### 'इक्कीस'चे होणार स्पेशल स्क्रीनिंग




**मुंबई** : दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांचा शेवटचा चित्रपट 'इक्कीस' १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. प्रदर्शनापूर्वी २९ डिसेंबर रोजी अंधेरी येथील पीव्हीआर आयकॉनमध्ये 'इक्कीस'चे विशेष स्क्रीनिंगचे आयोजन सनी आणि बॉबी देओलने केले आहे. सनी-बॉबी या माध्यमातून वडिलांना श्रद्धांजली वाहतील. या विशेष स्क्रीनिंगमध्ये चित्रपट उद्योगाव्यतिरिक्त माध्यमांतील लोकही उपस्थित राहणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी धर्मेंद्र यांच्या आठवणी नुकत्याच शेअर केल्या होत्या. 'इक्कीस' हा एक युद्धपट आहे, जो सेकंड लेफ्टनंट अरुण खेत्रपाल यांच्या पराक्रमावर आधारित आहे. ■

### आई झाल्यावर पहिल्यांदाच दिसली कॅटरिना



**मुंबई** : कॅटरिना कैफने आई झाल्यानंतर पहिल्यांदाच इन्स्टाग्रामवर फोटो शेअर केला आहे. अभिनेत्रीने ख्रिसमस साजरा करताना फोटो शेअर केला. फोटोमध्ये तिच्यासोबत पती विकी कौशल, दीर सनी कौशल आणि भाऊ सेबेस्टियन लॉरेंट मिशेल दिसत आहेत. या सुंदर सेल्फीमध्ये कॅटरिना आणि विकी कुटुंबासोबत ख्रिसमस ट्रीसमोर दिसत आहेत. कॅटरिना लाल रंगाच्या ड्रेसमध्ये दिसली. इतरांनी लाल आणि पांढऱ्या रंगाची सांता क्लॉजची टोपी घातली आहे. ही सेल्फी विकी कौशलने क्लिक केली आहे तर, कॅटरिना त्याच्या खांद्यावर हात ठेवून हसत आहे. फोटो शेअर करत सर्वांना प्रेम, आनंद आणि शांती मिळो. मेरी ख्रिसमस, असे तिने लिहिले. ■

# विकासाच्या प्रवासातील निर्णायक पर्व




२०२५ हे भारताच्या विकासाच्या प्रवासातील एक निर्णायक पर्व ठरले आहे. पायाभूत सुविधांच्या प्रत्येक क्षेत्रात, रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी आणि डिजिटल, अशा सर्वच क्षेत्रांतील पायाभूत सुविधांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली. दुर्गम सीमावर्ती भागांपासून ते देशाच्या सर्वांत मोठ्या शहरी केंद्रांपर्यंत जोडणी वाढली.

२०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये सरकारचा पायाभूत सुविधांसाठीचा भांडवली गुंतवणुकीचा खर्च वाढून ११.२१ लाख कोटी म्हणजेच अंदाजे १२८.६४ कोटी डॉलर्स इतका झाला आहे. जो सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) ३.१ टक्के इतका आहे. २०२७ पर्यंत भारत दर १२ ते- १८ महिन्यांनी आपल्या जीडीपीमध्ये एक ट्रिलियन डॉलर्सची भर घालेल असा अंदाज आहे. पायाभूत सुविधा हे आर्थिक वाढीचे गुणक बनले आहेत आणि २०२५ हे असे वर्ष आहे, ज्या वर्षात या गुणकाचे दृश्यमान परिणाम दिसू लागले आहेत.

### मिझोरममध्ये प्रथमच रेल्वे

» मिझोरम अखेरीस भारताच्या राष्ट्रीय रेल्वे जाळ्यामध्ये समाविष्ट झाल्याने इतिहास घडला आहे, ज्यामुळे ईशान्य भारतासाठी एक परिवर्तनकारी टप्पा आणि राज्यातील लोकांची दीर्घकाळापासूनची मोठी आकांक्षा पूर्ण झाली आहे. या यशासह, मिझोराम भारताच्या रेल्वे नकाशावर आले आहे. ५१ किलोमीटर लांबीची बैराबी-सैरांग रेल्वे मार्गिका, जी आठ हजार कोटींहून अधिक खर्चाने बांधली गेली आहे, तिने स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच ऐझॉलला थेट भारताच्या राष्ट्रीय रेल्वे जाळ्याशी जोडले आहे. आपत्कालीन सेवा, लष्करी दळणवळण, नागरिकांसाठी आरोग्यसेवेची उपलब्धता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी, या सर्वांमध्ये मिझोरमच्या लोकांसाठी एकाच रेल्वे मार्गामुळे महत्त्वपूर्ण बदल झाले आहे. इतकेच नाही, तर १४ सप्टेंबर २०२५ रोजी पहिली मालवाहतूक झाली, जेव्हा सिमेंटच्या २१ वॅगन पाठवण्यात आल्या होत्या. मिझोरम रेल्वे मार्गाला जोडल्या गेल्यामुळे आता आसाम ते ऐझॉलपर्यंत, बांबू, फलोत्पादन, विशेष पिके यासारख्या स्थानिक कृषी उत्पादनांना कमी खर्चापर्यंत भारताच्या मुख्य बाजारपेठेपर्यंत पोहोचवता येणार आहे.



### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन

» नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनासह भारताच्या विमान वाहतुकीच्या क्षमतेने मोठी झेप घेतली आहे. या टप्प्यामुळे मुंबईच्या विद्यमान विमानतळावरील दबाव कमी झाला आणि प्रवासी आणि मालवाहतूक वाढीच्या पुढील लाटेसाठी भारताची तयारी देखील बळकट झाली आहे.



### पहिल्या कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्टचे उद्घाटन

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८,९०० कोटी रुपयांच्या 'विझिंजम आंतरराष्ट्रीय खोल पाण्यातील बहुउद्देशीय सीपोर्टचे उद्घाटन केले आहे. हे देशातील पहिले समर्पित कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्ट आहे, जे विकसित भारताच्या एकत्रित दृष्टिकोनाचा भाग म्हणून भारताच्या सागरी क्षेत्रात होत असलेल्या परिवर्तनात्मक प्रगतीचे प्रतिनिधित्व करते.

### बिहारमध्ये पहिल्या 'वंदे मेट्रो'चे लोकार्पण

» बिहारमधील पहिली वंदे मेट्रो, ज्याला नमो भारत रॅपिड रेल म्हणूनही ओळखले जाते, जयनगरला पाटण्याशी जोडण्यासाठी सुरू करण्यात आली, ज्यामुळे प्रादेशिक जोडणी वाढली. या प्रकारची पहिली, पूर्णपणे वातानुकूलित आणि आरक्षण नसलेली ट्रेन केवळ साडेपाच तासांत पाटणा येथे पोहोचते.

### झेड-मोरह बोगद्याचे उद्घाटन

» २०२५ मध्ये, पंतप्रधानांनी जम्मू-काश्मीरमधील धोरणात्मक झेड-मोरह बोगद्याचे उद्घाटन केले, हा एक महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे जो सोनमर्गला वर्षभर जोडणी प्रदान करतो आणि लडाख प्रदेशातील दळणवळण वाढवतो.

### जगातील सर्वांत उंच रेल्वे पूल

» उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पांतर्गत जगातील सर्वांत उंच रेल्वे पुलाच्या चिनाब पुलाच्या उद्घाटनाने भारताचा अभियांत्रिकी आत्मविश्वास नवीन उंचीवर पोहोचला. या ऐतिहासिक कामगिरीने काश्मीर खोरे सर्व हवामान रेल्वे जोडणीद्वारे देशाच्या उर्वरित भागाशी जोडले, ज्यामुळे एक दीर्घकाळापासूनचे राष्ट्रीय उद्दिष्ट प्रत्यक्षात आले आहे. तामिळनाडूमध्ये भारताच्या पहिल्या उभ्या-लिफ्ट सागरी पुलाचे उद्घाटन करण्यात आले आहे. २०२५ मध्ये भारताची पायाभूत सुविधांची कहाणी समुद्रापर्यंतही पोहोचली आहे. पंतप्रधान मोदींनी तामिळनाडूमध्ये नवीन पांबन पुलाचे उद्घाटन केले. नवीन पांबन पूल हा भारताचा पहिला उभा लिफ्ट सागरी पूल आहे. हा एक असा पूल आहे, जो अमेरिकेतील गोल्डन गेट ब्रिज, लंडनमधील टॉवर ब्रिज आणि डेन्मार्क-स्वीडनमधील ओरेसुंड ब्रिज यांची बरोबरी करतो.




### जम्मू-श्रीनगर रेल्वे जोडणी

» हाय-टेक वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनचे उद्घाटन पंतप्रधान मोदींनी केले. यामुळे जम्मू ते श्रीनगर पर्यंत पहिल्यांदाच रेल्वेने थेट जोडणी शक्य झाली आहे.

### दिल्ली-मेरठ प्रादेशिक जलद वाहतूक प्रणाली

» दिल्ली-मेरठ कॉरिडॉरचा शेवटचा भाग पूर्ण व्यावसायिक वाहतुकीसाठी खुला झाला, ज्यामुळे दिल्लीच्या सराय काले खान ते मेरठमधील मोदीपुरमपर्यंत ८२.१५ किलोमीटरची जोडणी पूर्ण झाली.

### नौदल पायाभूत सुविधांसाठी मोठे वर्ष

» २०२५ हे नौदल पायाभूत सुविधांसाठी देखील एक महत्त्वाचे वर्ष होते. ऑगस्ट २०२५ मध्ये, भारताने ७५ टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी सामग्रीसह आयएनएस हिमगिरी आणि आयएनएस उदयगिरी या दोन स्टील्थ फ्रिगेट्सचा समावेश केला ही मोठी उपलब्धी मानली जात आहे. ■




## विचारपुष्प



स्वायत्त समाजशक्तीच राज्यशक्तीवर योग्य नियंत्रण ठेवू शकते. राज्यशक्तीचे महत्त्व आहे, पण लोकशक्ती अधिक प्रभावी व स्थायी असणे आवश्यक आहे. म्हणून आपले लक्ष्य राष्ट्राची स्वायत्त समाजशक्ती उभी करणे हे आहे. व्यक्ती परिवर्तनातून- समाज परिवर्तन- त्यातूनच राष्ट्रनिर्माण शक्य आहे.

**मदन दास देवी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



तरुण भारतचे संस्थापक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांचा आज जन्मदिन

**बांगलादेशात संगीत कार्यक्रमात धुडगूस** ▸ वृत्त पान २

## चिनाब नदीवर जलविद्युत प्रकल्पाला मंजुरी

# पाकिस्तानचे पाणी थांबणार



### पूर्णपणे थांबणार पाण्याचा प्रवाह

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

जम्मू-काश्मीरमधील किश्तवार जिल्ह्यात चिनाब नदीवरील प्रस्तावित २६० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाने शनिवारी मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी ३२०० कोटींचा निधी केंद्र सरकारने आधीच मंजूर केला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून भारत पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळवणार असून, यामुळे चिनाब नदीचा पाकिस्तानात जाणारा प्रवा पूर्णपणे थांबणार आहे.

हा प्रकल्प सिंधू जल करार स्थगितीच्या निर्णयाचा भाग असून, सिंधूच्या उपनद्यांवर प्रकल्प उभारून भारताच्या हद्दीतील नद्यांचे पाणी पाकिस्तानात जाण्यापासून रोखण्यासाठी जलविद्युत प्रकल्पाची योजना केंद्र सरकारने आखली आहे. पर्यावरण मंत्रालयाने म्हटले की, तज्ज्ञ मूल्यांकन समितीच्या ४५ बैठकानंतर किश्तवार जिल्ह्यात बेंजवार येथे चिनाब नदीवर २६० मेगावॅट जलविद्युत प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली.

या नदीवर यापूर्वीच १३० मेगावॅटच्या दोन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे जम्मू-काश्मिरात मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होईल. या प्रकल्पात सर्ज शाफ्ट, प्रेशर शाफ्ट आणि भूमिगत विद्युत प्रकल्पाचा समावेश आहे. वर्षभरात हा प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट असून, यातून वर्षाला २६० मेगावॅट वीजनिर्मिती होईल. सीमापार जाणारे पाणी देशातील गरजा पूर्ण करण्यासाठी वापरणे या प्रकल्पाचा उद्देश आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी ३२०० कोटींचा खर्च अपेक्षित असून, केंद्र सरकारने निधीला आधीच मंजुरी दिली आहे.

ऑपरेशन सिंदूरपूर्वीच भारताने पाकिस्तानचे पाणी तोडण्याचा निर्णय घेतला होता.

एकीकडे दहशतवादी हल्ले होत असताना पाकिस्तानसोबत नरमाईची भूमिका घेतली जाणार नाही, असा कठोर संदेश यामाध्यमातून देण्यात आला होता. पण प्रत्यक्षात पाणी रोखण्यासाठी त्यावर प्रकल्प उभारणे आवश्यक होते, तो आता उभारला जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### पाकचे पाणी अडवण्यासाठी धडाका



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २३ एप्रिलपासून सिंधू जल करार स्थगित केला. याचाच भाग म्हणून सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांचे पाणी अडवण्यासाठी त्यावर प्रकल्प उभारणे भारताने सुरू केले. सध्या सिंधू खोऱ्यातील सावलकोट, रतले, बुरसार, पाकल दुल, क्वार, किरू आणि कीर्थई नद्यांवर जलविद्युत प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे.

### पाणी सुरक्षा, ऊर्जा उत्पादनाला चालना

केंद्रीय पर्यावरण, वातावरण बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, चिनाब नदीवरील जलविद्युत प्रकल्पामुळे पाणी सुरक्षा आणि ऊर्जा उत्पादनाला चालना मिळणार आहे. पश्चिमेकडील नद्यांच्या पाण्याचा वापर देशातील नागरिकांच्या विकासासाठी करणे आणि पाकिस्तानला धडा शिकविणे या उद्देशाने जम्मू-काश्मिरातील नद्यांवर प्रकल्प उभारले जात आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- २६० मेगावॅटचा जलविद्युत प्रकल्प किश्तवाड जिल्ह्यातील चिनाब नदीवर उभारणार
- पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीने ३२०० कोटींच्या खर्चाचा आणि कंत्राट काढण्याचा मार्ग मोकळा
- भविष्यात प्रकल्पाची क्षमता ५०० मेगावॅटपर्यंत वाढविण्याची योजना, यामुळे पाकिस्तानात जाणारे पाणी अडवणे शक्य होईल.
- जम्मू-काश्मिरात पाण्याची उपलब्धता आणि विजेची गरज पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा असेल.
- सिंधूच्या उपनद्या असलेल्या सावलकोटे, स्तले, बुरसर, पाकल दूल या नद्यांवरही प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे.


# दिग्विजयसिंहांकडून संघ-भाजपाचे कौतुक

### अडवाणी-मोदींचे जुने छायाचित्र केले पोस्ट

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

काँग्रेस कार्य समितीच्या बैठकीच्या आधी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी 'एक्स'वर जारी केलेल्या एका छायाचित्रावरून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

दिग्जियसिंह यांनी 'एक्स'वर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक जुने छायाचित्र टाकले. या छायाचित्रात भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि अन्य ज्येष्ठ भाजपा नेते बसलेले असून, त्यांच्यापायाशी समोर नरेंद्र मोदी बसलेले दिसतात. या छायाचित्रासोबत दिग्विजयसिंह यांनी मजकूरही दिला आहे. कोरा साईटवरून मला हे छायाचित्र मिळाले, अतिशय प्रभावी असे हे छायाचित्र आहे. जमिनीशी नाते जुळलेला रा. स्व. संघाचा स्वयंसेवक आणि जुन्या जनसंघांचा आणि आजच्या भाजपाचा



कार्यकर्ता जमिनीवर आपल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या पायाशी बसलेला आहे, जो पुढे एका राज्याचा मुख्यमंत्री आणि नंतर देशाचा पंतप्रधान झाला. ही संघटनेची शक्ती आहे, जय सीयाराम, असे दिग्विजयसिंह यांनी म्हटले.

दिग्विजयसिंह यांची ही पोस्ट व्हायरल होताच राजकीय वर्तुळात वेगवेगळी चर्चा सुरू झाली. असे छायाचित्र जारी करीत दिग्विजयसिंह यांना पंतप्रधान मोदी यांचा अपमान केला, अशी एक प्रतिक्रिया पुढे आली, तर काहींनी ही संघटनात्मक राजकारणावरची प्रतिक्रिया म्हणून त्याकडे पाहिले.

कोणावरही टिका करण्याचा माझा उद्देश नव्हता, तर रा. स्व. संघ आणि भाजपा यांच्या संघटनात्मक रचनेची शक्ती दाखवण्यासाठी मी ते छायाचित्र जारी केले होते, असे ते म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

# काँग्रेस राबवणार मनरेगा बचाव अभियान

### ५ जानेवारीपासून देशव्यापी आंदोलन ● कार्यसमितीच्या बैठकीत निर्णय

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

मनरेगा योजनेचे नाव बदलण्याच्या, विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) माध्यमातून मोठ्या संख्येतील लोकांना मताधिकारापसून वंचित करण्याच्या तसेच अंमलबजावणी संचलनालय, सीबीआय तसेच अन्य संस्थांच्या होत असलेल्या दुरुपयोगामुळे लोकशाहीला धोका पोहोचत असल्याचा आरोप करीत काँग्रेसने ५ जानेवारीपासून देशव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

काँग्रेस कार्यसमितीच्या शनिवारी झालेल्या बैठकीनंतर पत्रपरिषदेत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मनरेगा योजनेचे नाव बदलण्याच्या सरकारच्या निर्णयावर जोरदार हल्ला चढवला. कृषी कायदे परत घेण्यासाठी केले त्याचप्रमाणे मनरेगा योजनेचे जुने नाव बहाल करण्यासाठी सरकारला बाध्य केले जाईल, असा इशारा या नेत्यांनी दिला.

देशातील गोरगरिबांना दडपण्यासाठी सरकारने मनरेगा योजनेचे नाव बदलले, गरिबांना न्याय तसेच त्यांचा घटनादत्त अधिकार परत मिळवून देण्यासाठी ५ जानेवारीपासून देशव्यापी आंदोलन करण्याचा इशारा मल्लिकार्जुन खडगे यांनी दिला. या आंदोलनासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, मेळावे, मोर्चा आणि अन्य माध्यमातून लोकांपर्यत पोहोचावे, असे आवाहन त्यांनी केले.

गांधी या नावावर मोदी यांना आक्षेप आहे, त्यामुळे या योजनेच्या नावातून महात्मा गांधी यांचे नाव काढण्यात आले, असे करीत सरकारने महात्मा गांधी यांचा अपमान केला. महात्मा गांधी यांचे नाव हटवण्याच्या निर्णयाला आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करीत उत्तर देऊ, असे ते म्हणाले. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) हा संपुआ सरकारचा दूरदर्शी कायदा होता, कोरोना काळात याच योजनेने देशातील लाखो लोकांचा जीव वाचवला. संपूर्ण जगात या कायद्याची प्रशंसा झाली. महात्मा गांधी यांच्या नावामुळे या कायद्याला वेगळे महत्व आले, असे खडगे म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

# सोनसाखळी स्नॅचिंग करणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सोन साखळी स्नॅचींग करणाऱ्या सराईत एका आरोपीस अटक करून जबरी चोरी व चार सोन साखळीचे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणून २० ग्रॅम सोन्याचे दागिने सपोनि विजय शिंदे यांच्या पथकाने हस्तगत केले.

त्याचप्रमाणे संजय जगताप, पोलीस निरीक्षक, स्था. गु.शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक, विजय शिंदे व त्यांचे पथक अकलुज उपविभागात माळशिरस येथे मालाविषयी गुन्हयाचे तपासाकामी गस्त घालत असताना गोपनिय बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, पंढरपूर शहर पोलीस ठाणे दाखल गुन्हयातील संशयीत आरोपी दुर्योधन उर्फ बबलू कांतीलाल चोरमले सवतगव्हाण माळशिरस येथील बस स्टँडवर येणार आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने सपोनि विजय शिंदे व त्यांचे पथक माळशिरस बस स्थानक येथे पोहोचुन बातमीतील वर्णना प्रमाणे असलेल्या इसमास सापळा रचुन सपोनि शिंदे व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले. नमुद इसमाकडे नाव गांव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नांव दुर्यो धन उर्फ बबलू कांतीलाल चोरमले (वय २४, रा. गोंदी, ता. इंदापूर जिल्हा पुणे ) असल्याचे सांगितले. या आरोपीकडे अधिक तपास करता सदरचा पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हा त्याने त्याचे साथीदार गुणाल जाधव (रा. गट क्रमांक २, महाळुंग तालुका माळशिरस जि. सोलापूर) याचे सोबत मिळुन केल्याची कबुली दिली. आरोपी दुर्योधन उर्फ बबलू कांतीलाल चोरमले याचेकडे अधिक कसुन तपास केले असता, त्याने त्याचे साथीदार गुणाल जाधव (रा. गट न २ महळुंग ता माळशिरस), रोहन नेताजी बाबर (रा. टेंभुर्णी)



यांनी मिळुन सोलापूर ग्रामीण जिल्हयात खालील पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे केल्याची कबुली केली आहे. आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास करता सदर गुन्हयातील चोरीस गेले मुद्देमाल पैकी २० ग्रॅम सोन्याचे दागिने त्याची बाजार भाव किंमत २ लाख ६० हजार किम तीचे मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि नागनाथ खुणे, सपोनि विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक कुलदिप सोनटक्के, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, सफौ नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, पोह। सलीम बागवान, मोहन मनसावाले, रवि माने, धनराज गायकवाड, दिपाली जावध, अश्विनी गोटे, पोकों/ प्रमोद शिंपाळे, सागर ढोरे-पाटील विनायक घोरपडे, सूरज रामगुडे, मनोज राठोड, अन्वर अत्तार, बाळराजे घाडगे, योगेश जाधव, अक्षय डोंगरे, संदीप हुलगे, मपोका सुनंदा झळके तसेच टेंभूर्णी पोलीस ठाणेचे सोमनाथ गायकवाड, केशव झोळ, नितीन तळेकर, अकलुज पो. ठाणे कडील पोहेकॉ सुहास क्षीरसागर, विशाल पोरे, सायबर पोलीस ठाणे कडील पोहेकॉ व्यंकटेश मोरे यांनी सदरची कारवाई केली आहे.

### सोलापूर महानगरपालिका निवडणूक

# काँग्रेसने जाहीर केली २० उमेदवारांची पहिली यादी

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेसाठी २० उमेदवारांची पहिली यादी प्रदेश कार्यालयातून शनिवारी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये ६ अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांचा समावेश आहे. पक्षाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने जाहीर करण्यात आली आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी दोन दिवसापूर्वी राज्य निवड मंडळाच्या बैठकीत उमेदवार निश्चित करण्यात आले होते.त्यानुसार पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे.

| अधिकृत उमेदवाराचे नाव |
| --- |
| प्रभाग क्र: ९ अ:दत्तु नागया बंदपट्टे |
| प्रभाग क्र.११ ड) धीडष्णा गोविंदपा तोरगणी |
| प्रभाग क्र.१४: ब) शोएब अनिसुर रहमान महागामी, ड) बागवान खलिफा नसीम अहमद बशीर अहमद |
| प्रभाग १५) ब) सबा परवीन आरिफ शेख, क) चेतन पंडित नरोटे, ड) मनिष नितीन व्यवहारे |
| प्रभाग क्र.१६: ब) फिरदौस मौलाली पटेल, क) सी सीमा मनोज बलगुलवार, ड) नरसिंग नरसष्णा कोळी |
| प्रभाग क्र.१७ अ) सौ. शुभांगी विश्वजीत लिंगराज, ब) परशुराम छोटूसिंग सतारेवाले ड) वहिद अब्दुल गफूर बिजापूरे |
| प्रभाग २० : अ) सौ. अनुराधा सुधाकर काटकर, |
| प्रभाग क्र.२१ : अ) प्रतीक्षा प्रवीण निकाळजे, क) सौ. किरण शिलालकुमार टेकाळे, ड) रियाज इब्राहिम हुंडेकरी, |
| प्रभाग क्र. २२: अ) संजय चन्नवीरमा हेमगी, क) सौ. राजनंदा डोंगरे |
| प्रभाग क्र.२३ ब) सौ. दिपाली सागर शहा |

# ई-चलनाच्या नावाखाली तरुणाची सायबर फसवणूक

### ▸▸साडेपाच लाखांहून अधिक रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

आरटीओचे ई-चलन असल्याचे भासवून पाठवलेल्या बनावट ॲप फाईलद्वारे मंगळवेढा तालुक्यातील एका तरुणाची तब्बल ५ लाखांहून अधिक रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात सायबर गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक बोरिगिड्डे करत आहेत.

फिर्यादी नागेश भगवान निंबाळकर (वय ३६, रा. खर्डी, ता. पंढरपूर), हे २२ डिसेंबर रोजी मंगळवेढा शहरात असताना त्यांच्या मोबाईलवरील व्हॉट्सॲपवर ओळखीच्या व्यक्तीच्या नंबरवरून आरटीओ ई-चलन ॲप नावाची फाईल प्राप्त झाली. आरटीओ चलनाची पावती असावी, असा समज करून त्यांनी ती फाईल ओपन केली. फाईल ओपन केल्यानंतर इंग्रजी भाषेत- असे पर्याय येत गेले. शेवटी पे





यूपीआय ५० रुपये चार्ज असा पर्याय दिसल्याने त्यांनी व्यवहार न करता बाहेर पडले.

मात्र, त्यानंतर त्यांच्या नकळत त्यांच्या मोबाईलवरून बँकिंग ॲपशी संबंधित प्रक्रिया सुरू झाल्याचे निष्पन्न झाले. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी मोबाईल तपासला असता एसबीआय योनो ॲप रजिस्ट्रेशन, ओटीपी, तसेच नवीन लाभार्थी जोडल्याचे संदेश आले. त्यानंतर सकाळी ११.३० ते ११.४८ या वेळेत त्यांच्या स्टेट बँक खात्यातून ३,९९,९९७ रुपये, १,५०,००० रुपये, तसेच ४९,९९६ रुपये असे एकूण ५ लाखांहून अधिक रुपये आयएमपीएसद्वारे परस्पर वेगवेगळ्या खात्यांत वर्ग करण्यात आले.

फसवणूक लक्षात येताच फिर्यादी निंबाळकर यांनी तात्काळ सायबर हेल्पलाईन व संबंधित एसबीआय शाखेशी संपर्क साधून खाते होल्ड करण्याची विनंती केली. मात्र, त्यानंतरही काही रक्कम वळती झाल्याचे उघड झाले. या प्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक बोरिगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली या सायबर फसवणुकीचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.

# मुंबईत भाजपा-शिवसेना शिंदे गटात २०० जागावर एकमत

### २७ जागांबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री निर्णय घेणार

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २७ डिसेंबर :**

महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरायला अवघे तीन दिवस शिल्लक असताना महायुतीतील भाजप आणि शिवसेना शिंदे यांच्यातील मुंबई महापालिकेचे जागा वाटप अंतिम टप्प्यात पोहचले आहे. त्यांच्यात असून २०७ जागांवर एकमत झाले असून २० जागांवरील तिढा कायम आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः एकत्र बसून तो सोडवणार आहेत, अशी माहिती भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी दिले.म हायुतीच्या नेत्यांची रंगशारदा येथील आज बैठक झाली. सुमारे २ तास झालेल्या बैठकीत २०७ जागा निश्चित करण्यात आल्या. त्यामध्ये भाजपा १२८ व सेनेच्या ७९ जागा लढविणार आहेत. आता भाजपचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन बंगल्या उरलेल्या २० जागांच्या संदर्भात आता एकनाथ शिंदे यांच्या सोबत चर्चा होणार आहे. मंत्री आशिष शेलार, उदय सामंत आणि राहुल शेवाळे एकनाथ शिंदेंशी चर्चा करीत आहेत.



समोर उमेदवार कोण आहे याचा विचार करून उर्वरित जागांवर भाजपा लढणार की शिवसेना लढणार याचा निर्णय घेऊ, अशी माहिती अमित साटम यांनी दिली.

महायुती कशी जिंकणार याच नियोजन करत आहे, आम्ही उमेदवारांवर लक्ष केंद्रीत करत आहोत. आम्हाला उमेदवारांची अदलाबदली करायची असेल तर तीही करू, दोन्ही पक्षाचं सन्माजनक जागा वाटप होईल, असे शिवसेना सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी सांगितले. मुंबईत महायुतीने १५० जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे, जागा व पक्ष बाजुला ठेवत आहोत. एकमेकांना विश्वासात घेऊन प्रत्येक उमेदवार कसा निवडून येईल यावर फोकस आहे. संख्याबळ दोन्ही पक्षांसाठी महत्त्वाचे नाही, गरज असेल तिथे उमेदवारांची अदलाबदल केली जाईल, असे सांगितले.

**रिपब्लिकन पक्षाकडून १७ जागांची मागणी**

मुंबई महापालिकेसाठी रिपब्लिकन सेनेकडून मुंबईतील १७ जागांचा मागणी करण्यात आली आहे. आनंदराज आंबेडकर १७ जागांच्या बाबतीत आग्रही आहेत. रिपब्लिकन पक्षाची शिवसेनेसोबत युती असून सायन, धारावी येथे प्रत्येकी १ जागेची मागणी रिपब्लिकन पक्षाने केली आहे. चेंबुर, कुर्ला विभागातील ८ जागा आणि मुंबई उपनगरातील ७ जागांची रिपब्लिकन सेनेकडून शिंदेंच्या शिवसेनेकडे मागणी करण्यात आली आहे.

**राष्ट्रवादी १०० जागा लढविणार ; म लिकांच्या कुटूंबातील तिघांना उमेदवारी**

मुंबईमध्ये भाजपा व शिवसेना शिंदे गट एकत्र लढणार आहे. तर महायुतीतील तिसरा महत्त्वाचा घटक असलेला अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर १०० जागा लढण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामध्ये माजी मंत्री नवाब मलिक यांचे बंधू कप्तान मलिक,त्यांची बहिण सईदा खान व कप्तान मलिक यांची सुन बुशरा मलिक हे तिघे उमेदवार असणार आहेत.

अन्य उमेदवारांची यादी आज संध्याकाळपर्यंत जाहीर होईल, अशी माहिती नवाब मलिक यांच्या कन्या आ. सना मलिक यांनी दिली. आम्ही सर्व समाजाच्या लोकांना संधी दिली आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले.

**भाजपकडून स्टार प्रचारकांची फौज**

मुंबईतील उत्तर भारतीय मतदारांवर लक्ष केंद्रीत करत भाजप आणि महायुतीने स्टार प्रचारकांची फौज मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपकडून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, लोकप्रिय गायिका आ.मैथिली ठाकूर, खासदार व अभिनेता मनोज तिवारी, तसेच भोजपुरी चित्रपटसृष्टीतील निरुहुआ आणि रवी किशन यांना प्रचारात सहभागी केलं जाणार आहे. उत्तर भारतीय मतदारांची संख्या जास्त असलेल्या वॉर्डांमध्ये हे नेते आणि कलाकार प्रचाराच्या माध्यमातून थेट मतदारांपर्यंत पोहोचणार आहेत. दुसरीकडे, शिवसेनेकडूनही प्रचारासाठी खास तयारी करण्यात आली असून, पक्षाचे नेते आणि अभिनेते गोविंदा यांना निवडणूक प्रचारात सक्रियपणे उतरवण्याची योजना आहे. त्यामुळे येत्या काळात मुंबईतील अनेक वॉर्डांमध्ये स्टार प्रचारकांच्या जंगी प्रचार सभांचा माहोल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

ठाकरे बंधूंकडून युतीची घोषणा झाली, मात्र जागा वाटपाचा तिढा अद्यापही सुटेना झालाय. मुंबईतील दादर-माहीम, शिवडी, विक्रोळी, भांडुप, चांदिवली या मतदारसंघातील जागांवर तिढा कायम असून या मतदारसंघात किमान २ ते ३ जागा द्याव्यात, अशी मनसेची मागणी आहे.

### पान १ वरुन

**मी कसलीही 'ढवळाढवळ' करणार नाही.......**

**ना.गोरे यांच्या कार्यपध्दतीवर नाराजी :** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपातंर्गत वाद सुरु होता. निष्ठावंत कार्यकर्त्यांसाठी बंड करु. ते कोणत्याही पक्षाकडून निवडणूक लढविणार असतील तर आपण उघडपणे प्रचार करु, असे आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख यांनी म्हटले होते. विशेष म्हणजे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कार्यपध्दतीविषयी नाराजी व्यक्त केली होती.

**-'त्या' व्हिडीओची दखल :** आ.विजयकुमार देशमुख यांनी व्यक्त केलेली नाराजी व पार राजीनामा देण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यसंदर्भात व्हिडीओची मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष यांनी दखल घेवून ना.जयकुमार गोरे, आ.देवेंद्र कोठे, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांना तत्काळ मुंबईला येण्यास सांगितले. मात्र दोन्ही आमदार मुंबईला गेले नाहीत. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पालकमंत्री गोरे, आ.कोठे, शहराध्यक्षा तडवळकर, मनिष देशमुख यांची बैठक घेवून सोलापूरबाबत काही सूचना केल्याचे समजते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# ऐका, पुढल्या हाका...

घरातील स्थान, आर्थिक स्थैर्य, जीवनशैली आणि कुटुंबातील सदस्यांशी, विशेषत मुलांशी असलेले नाते अशा अनेक विषयांभोवती स्त्रियांच्या समस्या वर्षांनुवर्षे गुरफटून राहिल्या. चार-पाच दशकांपूर्वीपर्यंत, जेव्हा कौटुंबिक रूढींचा प्रभाव स्त्रीवर सर्वाधिक होता, तेव्हाची स्त्री म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीने रंगविलेले केवळ एक सुबक चित्र होते. म्हणजे, स्त्रीचे रूप, शालीनता, प्रेमळपणा, वात्सल्य आणि स्वयंपाकघरातील जबाबदारी पार पाडण्यातील समर्थपणा किंवा खंबीरपणा या गुणांच्या रंगांनीच स्त्रीचे हे चित्र रंगविले जात असे. पत्नी, आई, सासू, सून, जाऊ-नणंद अशा वेगवेगळ्या कौटुंबिक भूमिकांमध्ये वावरतानाची तिची वागणूक हाच स्त्रीच्या गुणवत्तेचा कस ठरविण्याचा निकष होता. काळ बदलत चालला, स्त्रियांनादेखील शिक्षणाच्या आणि करीअरच्या संधींची क्षितिजे खुणावू लागली, तेव्हा स्त्रियांचे उंबरठ्याआड अडकलेले विश्व मोकळे झाले. कुटुंबातील प्रथांच्या पलीकडे जाऊन 'ब्र'देखील काढण्याची हिंमत नसलेल्या स्त्रिया 'बोलत्या' झाल्या आणि समाजात वर्षानुवर्षे दबून राहिलेल्या महिलावर्गाला आवाज आहे, याची जाणीव समाजाला होऊ लागली. स्त्रिया केवळ बोलू लागल्या एवढेच नव्हे, तर न पटणाऱ्या बाबींवर ठाम मतप्रदर्शन करून प्रसंगी एकजुटीने संघर्षांसही सिद्ध झाल्या. कुटुंबाचा गाडा हाकणे ही सामूहिक जबाबदारी आहे आणि पतीइतकाच पत्नीचादेखील या जबाबदारीतील प्रत्येक पावलावर समान वाटा आहे, हे प्रसंगी पुकारलेल्या लढ्यातून किंवा सिद्ध केलेल्या कर्तबगारीतून स्त्रियांनी दाखवून दिले.

या परिवर्तनासाठी स्त्रियांनीच बजावलेली भूमिका महत्त्वाची आहे. व्यापक समाजव्यवस्थेत हा बदल प्रकर्षाने जाणवत असला तरी सामान्य मराठी कुटुंबांमधील 'आई' अजूनही या परिवर्तनाच्या प्रवासात स्वतःला सामावून घेण्याचा अडखळता प्रयत्न करीत आहे. कारण, अजूनही कुटुंबव्यवस्थेच्या जुन्या रूढींविषयीची आत्मीयता तिच्यात डोकावते. मुंबईसारख्या महानगरातील कॉर्पोरेट कार्यालयांत किंवा मंत्रालयासारख्या सरकारी कार्यालयात काम करून संध्याकाळी घरी परततानाचा प्रवास सुरू करण्याआधी भाजी खरेदी करून, रेल्वेत किंवा बसमध्ये बसायला जागा मिळाली तर प्रवासात शेंगा, पालेभाज्या निवडणारी स्त्री अजूनही दिसते. कुटुंबात परतताना तिने आपली दिवसभरातली कर्तबगार महिला ही प्रतिमा स्वतःच बाजूला ठेवलेली असते. कारण गृहिणी, पत्नी किंवा आई ही आपली घरातली भूमिका निभावण्याची तिची मानसिकता पूर्वीइतकीच जिवंत आहे. घराबाहेर पडल्यानंतर ही स्त्री हक्कांसाठी कणखरपणे लढू शकते, संघटितपणाने संघर्ष करण्याची तयारीही दाखविते आणि न पटणाऱ्या बाबींवर परखडपणे मतप्रदर्शनही करते. पण संध्याकाळी घरी परतते, तेव्हा मात्र, ती आई, पत्नी आणि गृहिणी असते. संध्याकाळी घरी पोहोचल्यानंतर, दिवसभराच्या कामाचा शीण घालविणाऱ्या विरंगुळ्याचे क्षण तिचे तिनेच शोधलेले असतात. त्या क्षणांमध्ये रमल्यानंतर ती आपल्या घरातल्या भूमिकेत शिरते.

हे चित्र अजूनही कित्येक घरांमध्ये दिसते. पुरुषांच्या बरोबरीने नोकरी-व्यवसायाच्या विश्वात वावरणारी प्रत्येक नोकरदार स्त्री केवळ बदलत्या समाजव्यवस्थेतून आलेल्या आत्मविश्वासाचा किंवा मिळालेल्या हक्कांचा वाटा उचलण्याच्या मानसिकतेतच असते असे दिसत नाही. वाढती महागाई, बदलती जीवनशैली आणि त्यामुळे कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही आजही मध्यमवर्गीय कुटुंबाची अपरिहार्यताच आहे. अनेक पाहण्यांतून निष्पन्न झालेल्या निष्कर्षांनुसार, शहरी भागांतील सुमारे ३५ टक्के महिला, घरातली आपली नैमित्तिक कामे घाईगडबडीने पार पाडून नोकरीसाठी सकाळी घराबाहेर पडतात, बस, रिक्षासाठी थांब्यावर ताटकळतात आणि कामाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत त्यांची सकाळी साठविलेली ऊर्जा जाळून नव्या दमाची जुळवाजुळव करू लागतात. साधारणपणे, शहरांत राहणाऱ्या प्रत्येक चार कुटुंबांपैकी एका कुटुंबातील स्त्री नोकरदार असते. अशा वेळी, कुटुंबाचे दररोजचे व्यवस्थान आणि मुलाबाळांची देखभाल हे मोठे आव्हान त्या स्त्रीच्या कुटुंबासमोर असते. या नोकरदार महिलांपैकी सर्वच महिला उच्चपदस्थ नोकरी किंवा उज्ज्वल भविष्यातील संधींची आव्हाने पेलण्यासाठी सरसावलेल्या, उच्चशिक्षित आणि गलेलठ्ठ पगार मिळवणाऱ्या नवश्रीमंत वर्गातीलच आहेत, असे नाही. महानगरांतील उपनगरी रेल्वे स्थानकांकडे जाणाऱ्या बसच्या थांब्यावर सकाळच्या वेळी लागणाऱ्या त्या रांगा पाहिल्या की नोकरदार महिलांचे वेगवेगळ्या आर्थिक स्तरांचे चित्र न सांगतादेखील स्पष्ट होऊ शकते. काखोटीला एक साधी पर्स असतानादेखील, हातात एखादी प्लॅस्टिकची पिशवी सांभाळत रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातील गर्दीत स्वतःला झोकून देताना जिवावरची कसरत पार पाडत कामाच्या ठिकाणी पोहोचणाऱ्या महिलांचा वर्गदेखील नोकरदार महिलांमध्येच मोडतो. नोकरी ही या महिलांची कौटुंबिक अपरिहार्यता असते. आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी घरातील पुरुषाच्या कमाईला जमेल तसा हातभार लावून कुटुंब चालविणे हाच या महिलांच्या 'नोकरदारी'चा अर्थ असतो. अशा महिलांना आपल्या घराची घडी विस्कटू न देण्याचेही आव्हान पेलायचेच असते. नोकरी करणाऱ्या या वर्गातील महिलांची आपली कौटुंबिक जबाबदारी झटकण्याची इच्छा नसते किंवा नवऱ्याच्या बरोबरीने काम करत असल्याने घरातील जबाबदारीचा वाटा नाकारण्याची तिची मानसिकता नसते.

सामान्यपणे प्रत्येकालाच, आपण जगतो ते जीवन सामान्य वाटत असते. भोवतालच्या श्रीमंतीच्या प्रदर्शनामुळे, दूरचित्रवाणीवर दिसणाऱ्या मालिकांनी रंगविलेल्या कुटुंबजीवनाच्या भपकेबाज चित्रांमुळे आदर्श जीवनाच्या वेगळ्याच कल्पना अनेकांच्या मनात घोळत असतात. स्त्रिया त्याला अपवाद नसतात. त्यातच सकाळी घराबाहेर पडून, सामान्य कमाईसाठी दिवसभर राबणाऱ्या नोकरदार महिला आणि त्यांच्याच आसपास वावरणाऱ्या उच्चभ्रू, उच्चशिक्षित आणि अधिकारामुळे प्राप्त झालेला आत्मविश्वास मिरविणाऱ्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या महिला असे तट नोकरदार महिलांमध्ये



आपोआप तयार झालेले असतात. रेल्वेच्या पहिल्या वर्गातून प्रवास करणारी नोकरदार महिला, सेकंड क्लासच्या गर्दीतून लोंबकळत कार्यालय आणि परत घर गाठणारी महिला, भपकेबाज, शोफर ड्रिव्हन कारमधून प्रवास करणारी कॉर्पोरेट क्षेत्रातील महिला आणि मोलमजुरी करून तुटपुंजी कमाई करत आपला संसार सावरण्यासाठी धडपडणारी महिला असे अनेक वर्ग नोकरदार महिलांच्या दुनियेत असल्यामुळे यातील प्रत्येक वर्गाच्या समस्या आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या हाताळण्याचा दृष्टिकोनही वेगवेगळाच असतो. तरीदेखील, सामान्य कुटुंबातील महिलेसाठी मजुरी, नोकरी किंवा व्यवसाय हा जगण्याच्या संघर्षांचा अपरिहार्य भाग असल्यामुळे कुटुंबातील जबाबदाऱ्यांचे स्थान इच्छा नसतानासुद्धा दुय्यम ठेवावे लागते. ही खंत अनेक नोकरदार महिलांना सतावतानादेखील दिसते. कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक ताण आणि नोकरीनिमित्त घराबाहेर राहावे लागल्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य कौटुंबिक समस्यांची चिंता यामुळे अनेक नोकरदार महिलांना रक्तदाब, हृदयदौर्बल्यासारखे विकार जडत असल्याचेही काही पाहणी अहवालांचे निष्कर्ष आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिलांना अधिक मानसिक तणावाचा आणि आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो, असे अमेरिकेसारख्या प्रगत देशातही एका सर्वोक्षणात स्पष्ट झाले आहे. केवळ अमेरिका किंवा भारतातच नव्हे, तर जगातील सर्वच महिलांची तणावाची पातळी पुरुषांपेक्षा अधिक असते. अयोग्य जीवनशैली हे त्याचे एक महत्त्वाचे कारण आहेच, पण एकाच वेळी अनेक भूमिका वठविण्याचा तणाव, सामाजिक प्रतिष्ठेसाठीचा संघर्ष, एकटेपणाची भावना, कामाचा अतिरेक, घरातील कामाचा समतोल, मुलांची देखभाल अशी अनेक कारणे या तणावास कारणीभूत होतात.

अनेकदा, एकटेपणाच्या भावनेतून सुटका करून घेण्यासाठी समाजमाध्यमांवर अधिकाधिक सक्रिय राहून विरंगुळा शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि नकळत तणाव वाढविणाऱ्या बाबी समोर आल्या की नैराश्यात भर पडते. आपल्या आयुष्याची इतरांच्या आयुष्यासोबत तुलना करण्याचा एक मंच समाज माध्यमांच्या रूपाने तयार होऊ पाहात आहे. या मंचावरील समोरचा झगमगाट, आभासी सुखाची, श्रीमंतीची ऐट यांचे भरभरून प्रदर्शन करणाऱ्या आणि जीवनशैलीला सुखासमाधानाची स्वप्ने दाखविणाऱ्या जाहिरातींच्या प्रभावातून उणिवांच्या जाणिवा जाग्या होतात आणि त्यामुळे अभावग्रस्ततेची भावना बळावून त्याचाही मानसिक आरोग्यावर परिणाम होतो असेही निष्पन्न झाले.

नोकरदार, कष्टकरी शहरी स्त्रियांप्रमाणे ग्रामीण भागांतील स्त्रियांमध्येही एकाकीपणा, आर्थिक विवंचनांमुळे सतावणारा मानसिक तणाव, सुविधांच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या आदी अनेक बाबींमुळे नैराश्य व चिंताग्रस्ततेचे प्रमाण वाढले असल्याचा निष्कर्ष अलिकडेच, एका शैक्षणिक संस्थेने केलेल्या पाहणीतून निघाला आणि समाजातील महत्त्वाचा घटक असलेल्या महिलांच्या जीवनातील शीतसंघर्षाची कहाणी उलगडत गेली. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या एका पाहणीनुसार, भारतात आत्महत्या करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सुमारे ३७ टक्के आहे. म्हणजे, प्रत्येक शंभर आत्महत्यांपैकी सुमारे ३७ आत्महत्या स्त्रियांच्या आहेत आणि त्यातही, १८ ते ४० वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी स्त्रियांच्या मानसिक समुपदेशनाची गरजही या पाहणीत अधोरेखित झाली होती. करीअर, शिक्षण, नोकरी यांच्या स्पर्धेत दमछाक झालेल्या जवळपास ४० टक्के स्त्रियांना निद्रानाशासारख्या विकाराचाही सामना करावा लागत आहे. जी ध्येये साध्य करण्यासाठी जीवघेण्या स्पर्धेत त्या उतरतात, त्याच बाबींची चिंता त्यांच्या करीयर, शिक्षण आणि नोकरीतील स्पर्धेच्या धडपडीवर विपरीत परिणाम करणाऱ्या ठरतात, असा याचा अर्थ आहे.

नोकरी ही ज्या स्त्रियांच्या कुटुंबांची गरज असते, त्यांच्या कौटुंबिक आणि आरोग्यविषयक समस्याही वाढत जातात. अशा समस्यांना एकटी नोकरदार स्त्रीच जबाबदार असते का, नोकरी-व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या पतीचीही समान जबाबदारी असते किंवा नाही, हा अलिकडे एक वादविषय होऊ पाहात आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कुटुंबांतील मुलांचे पोषण नीट होत नाही, त्यांच्या आहाराच्या सवयी बदलतात आणि घरातील एकटेपणा घालविण्यासाठी मुलांनी शोधलेल्या बैठ्या पर्यायांमुळे स्थूलपणासारखे विकारही बळावतात, असे काही वर्षांपूर्वीच्या 'असोचेम'च्या एका पाहणीत आढळून आले होते. ते चित्र आजही बदललेले नाही. आर्थिक गरजा भागविण्यासाठी नोकरी करणाऱ्या आणि शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे करीअर म्हणून नोकरी-व्यवसाय करणाऱ्या, अशा दोन्ही गटांतील स्त्रियांच्या मुलांमध्ये असे विकार वाढत आहेत. नोकरदार महिलांचे घराकडे पुरेसे लक्ष नसल्यामुळे मुलांमधील हे विकार वाढतात, असे या पाहणी अहवालाचे मत आहे. पूर्णवेळ काम करणाऱ्या महिलांच्या तुलनेत, अर्धवेळ काम करणाऱ्या महिलांच्या मुलांमध्ये या विकारांचे प्रमाण कमी असते, तर पूर्णवेळ घरात असलेल्या महिलांच्या मुलांमध्ये ते आणखीनच कमी असते, असे आढळल्यानंतर, नोकरदार महिलांच्या मुलांमध्ये आरोग्याच्या तक्रारी अधिक असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून काढण्यात आला. या अहवालावर संमिश्र प्रतिक्रियाही उमटू लागल्या. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी एकट्या स्त्रीची- म्हणजे आईची- का? वडिलांचीही तितकीच जबाबदारी असायला हवी, असा सूरही उमटू लागला. परंतु, मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कुणाची असावी हा या पाहणीमागील महत्त्वाचा मुद्दाच नव्हता. महिलांनी नोकरीचे क्षेत्र निवडल्यानंतर त्या कुटुंबाच्या आरोग्याची घडी कुठेतरी विस्कटते आहे, हे या पाहणीतून समोर आलेले वास्तव विचारात घेणे आवश्यक आहे.

मुलांच्या पोषणाची, शिक्षणाची, आरोग्याची आणि त्यांच्यावर योग्य ते संस्कार घडवून त्यांना प्रगल्भ नागरिक बनविण्याची जबाबदारी केवळ आईचीच का, असा सवाल पुढे येऊ लागल्यानंतर, अशा जबाबदारीतील वडिलांचा वाटा कोणता हा चर्चेचा स्वतंत्र मुद्दा होऊ शकतो. मुलांचे आरोग्य, शाळा, खाण्यापिण्याच्या सवयी, दैनंदिन जीवनशैली याबाबतच्या सवयींवर पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या संकल्पनेत आईचा प्रभाव असल्यामुळे या पाहणीची दिशा अशी ठरली असावी आणि त्यामुळे कदाचित असा निष्कर्ष काढला गेला असावा. तरीदेखील, या जबाबदाऱ्या केवळ आईच्या किंवा केवळ वडिलांच्या या वादाला तात्पुरते बाजूला ठेवून या समस्येवर विचार करणे अधिक गरजेचे आहे. कारण, आरोग्याच्या समस्यांनी ग्रासलेली पुढची पिढी मोठेपणी त्यासाठी नेमके कुणाला जबाबदार धरणार आहे, हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. 'नोकरदारी' हे या समस्येचे मूळ असेल, तर त्यावरचा तोडगा काय, याचाही विचार आवश्यक आहे. आर्थिक गरजा भागविण्याची निकड आणि कौटुंबिक आरोग्य यापैकी कोणत्या बाबीला प्राधान्य हवे, हेही या निमित्ताने ठरले पाहिजे. नाही तर, जबाबदारीच्या वादात पुढच्या पिढीचे आरोग्य पणाला लागलेले असेल.

महिलांचे आरोग्य, मानसिक स्थिती आणि समाजातील स्पर्धेच्या जगातील त्यांचे स्थान, अशा अनेक बाबींवर आजवर अशी अनेक सर्वेक्षणे झाली. वर्षागणिक देशात आणि जगात कोठे ना कोठे होणाऱ्या या सर्वेक्षणांचे निरीक्षण आणि निष्कर्ष गेल्या अनेक दशकांत फारसे बदललेले नाहीत. नव्या शतकाच्या पंचविसाव्या वर्षाचा उंबरठा ओलांडून पुढच्या टप्प्यावर प्रवेश करत असताना, या निष्कर्षांचे नेमके करायचे काय हा प्रश्न मात्र अनुत्तरितच दिसतो. समस्या सुटलेल्या तर नाहीतच, उलट त्या वाढतच आहेत आणि आता तर, अशा विस्कळीतपणामुळे या समस्यांचा थेट परिणाम कुटुंबाच्या मानसिक आरोग्यावरही पडण्याची चिन्हे दिसत आहेत. नवनव्या तांत्रिक प्रगतीमुळे थेट संवाद संपत चालल्याने, एकाकीपणा वाढून त्यातून सुटकेचे प्रत्येकाचे मार्ग आता समाज माध्यमांशी येऊन थांबतात. हे चित्र गंभीर होणार आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नव्या आव्हानास तोंड देण्यासाठी कुटुंबव्यवस्थेकडे कोणते पर्याय आहेत, याचा विचार व्हायला हवा. प्रत्येक वर्ष संपताना मागे वळून पाहण्याची एक प्रथा असते, तसा नव्या वर्षाकरिता काही संकल्प करण्याचीही प्रथा असते. आता आव्हाने उघड झालेली आहेत. त्यातून उमटणाऱ्या भविष्याच्या हाका कान देऊन ऐकणे गरजेचे ठरणार आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### महालातील 'नो पार्किंग' आणि समाजबांधवांची माणुसकी

काही दिवसांपूर्वी कामानिमित्त महालात जाण्याचा योग आला. बडकस चौकात कार पार्क केली. कारण संघ बिल्डिंग परिसरात कार पार्किंगला कुठेच जागा नव्हती. एक दीड तासाने काम आटोपून परत जायला निघाले तर काय! माझी कार टोईंग व्हेईकलला बांधण्यात आली होती. तसं पाहिलं तर रस्त्याच्या दुतर्फा वेगवेगळी वाहने पार्क केली होती. पण कोणीतरी तक्रार केली आणि आमची कार चालान झाली आहे असे त्या ठिकाणी असलेल्या पोलिसांनी सांगितले. खरे तर नियमांची पायमल्ली न करता आम्ही आमची कार चुकीच्या ठिकाणी आणि चुकीच्या पद्धतीने पार्क केली नव्हती. महाल भागामध्ये तशी पार्किंगची व्यवस्थित सोय नाही आणि त्यामुळे बरेचदा ही समस्या उद्भवते. लगेच पोलिसांनी आम्हाला हजार रुपये भरायला सांगितले, पण लेखी चालान देण्यास नकार दिला. पण जवळच असलेल्या काही समाजबांधवांनी त्यांची सामाजिक जाणीव समजून आम्हाला चालान भरण्यास परावृत्त केले. याचे कारण म्हणजे बडकस चौकापासून ते अयाचित मंदिरपर्यंत बरीच वाहने तसेच त्या ठिकाणी असलेल्या दुकानांचे साहित्य दुकानांसमोर त्याच रस्त्याच्या दुतर्फा पार्किंगमध्ये असताना केवळ तुमच्याच गाडीला चालान का? तिथे कित्येक गाड्या कव्हर घालून खूप दिवसांपासून पार्क केलेल्या दिसत होत्या, याविषयी त्यांनी पोलिसांना विचारणा केली. आमची गाडी उचलण्याआधी इतरांच्या पार्क केलेल्या कार, दुचाकी वाहने आणि दुकानांसमोर असलेले सर्व साहित्य पहिले उचला आणि मगच आमची कार चालान करा असे पोलिसांना सांगितले. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूने 'नो पार्किंग'चे सूचना फलक कुठेही नाहीत. त्या वाहतूक पोलिसाला तो दाखविण्यास विचारले असता तो म्हणाला, आमच्या कॉटन मार्केट ऑफिसमध्ये बघायला मिळेल. म्हणजे आता प्रत्येक ठिकाणी जिथे नो पार्किंग बोर्ड नसेल तर आधी वाहतूक विभागाच्या कार्यालयात नो पार्किंगची चौकशी करून नंतर पार्किंग करावी लागेल.

या ठिकाणी मला समाज हितचिंतकांमध्ये असलेल्या माणुसकीचा अनुभव आला. नियम हे सर्वांसाठी सारखे. त्यामुळे एकासाठी एक आणि दुसऱ्यासाठी दुसरा असा नियम पोलिस विभागाने करू नये असे त्यांचे म्हणणे होते. शेवटपर्यंत त्यांनी मला पैसे भरू दिले नाहीत उलट माझे मनोबल वाढवून त्यांनी मदत केली. पोलिसांना केवळ यांचीच कार चालान करणे योग्य नाही. त्या अगोदर इतर वाहनांची पण सुव्यवस्था लावा आणि नंतरच यांना पैसे मागा असे ठणकावून सांगितले. मला पैसे भरावे लागले नाही याहीपेक्षा समाजामध्ये अजूनही मदत करणारे, माणुसकीने न्यायाची बाजू मांडणारे आणि नियमांना धरून चालणारे लोक आहेत, हे बघून अतिशय आनंद झाला. सर्व ठिकाणी सर्वसाधारण नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मदत करणाऱ्या अशा व्यक्ती असतील तर कोण म्हणेल की या जगात माणुसकीच उरली नाहीये. आज आमच्या पाठीशी उभे राहणाऱ्या त्या सर्व व्यक्तींना माझे शतशत धन्यवाद.

**वर्षा चांगदे**/नागपूर

### कुष्ठरोगमुक्त जीवन स्वकीय कधी स्वीकारणार?


तपोवन म्हणजे सेवा त्याग शिस्त, कर्तव्ये, भक्ती, राष्ट्रसेवा, परिश्रम, एकनिष्ठ, तत्त्ववादी, वास्तव, नीटनेटकेपणा, निसर्गरम्य, आशावादी या गुणांनी परिपूर्ण असा नयनरम्य परिसर ज्या परिसराने अनेकांनी स्वप्ने रुजवली घडवली, असा तपोवनच्या प्रवेशद्वारावर लिहिलेला संदेश येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना कायम प्रेरित करत असून सत्यम शिवम सुंदरम अशा या तपोवनचे निर्माते म्हणजे पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने विनम्र अभिवादन. दाजीसाहेब हे पेशाने डॉक्टर होते. डॉक्टर हा पेशा खऱ्या अर्थाने ईश्वरसेवेची पायरी आहे. साक्षात ईश्वराचे रूप असे डॉक्टरी पेशाकडे पाहिले जाते. दाजीसाहेबांनी निस्वार्थी रुग्णसेवेचा आदर्श दाखवीत आपले संपूर्ण आयुष्य कुष्ठरुग्ण यांना अर्पण करून अमरावती मध्ये तपोवन नावाचे नंदनवन उभे केले व कुष्ठरुग्णाच्या वेदनेवर फुंकर घालून त्यांचे जीवन फुलवले, मायेची फुंकर घालीत जखमा मनाच्या व वेदनेच्या ही बसविल्या ठित्या हातांना नवी ऊर्जा उमेद दिली. दाजीसाहेबांचा जन्म २८ डिसेंबर १८९२ रोजी कर्नाटक येथील आसंगी गावात झाला. त्यांचे उच्च शिक्षण कोलकाता येथे झाले. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. मुळात होमिओपॅथीचे डॉक्टर असणारे दाजीसाहेब यांनी प्लेगच्या साथीमध्ये कोलकाता येथे रुग्णांना बरे करून आपले सामाजिक दायित्व निभावले. काही दिवस त्यांनी रामकृष्ण मिशन अलाहाबाद येथेही काम करून १९१७ ला अमरावती गाठले व वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली व साथीच्या रोगांमध्ये १९१८ ला अमरावतीमध्ये रुग्णसेवा बहाल केली. एका आत्महत्याग्रस्त कुष्ठरुग्णाच्या शरीराला कुत्रे लचके तोडत असल्याचा प्रसंगाने त्यांच्या मनावर खूप आघात झाला व तेव्हा त्यांनी कुष्ठरुग्ण यांच्या सेवेचे व्रत घेऊन कुष्ठरोग पीडित लोकांसाठी काम करण्याचा निर्णय घेतला. २६ सप्टेंबर १९४६ रोजी जगदंबा कुष्ठ निवास यांची स्थापना विनोबा भावेंच्या साक्षीने केली. १९४६ सालापासून आजही अविरत कुष्ठ रुग्णांची सेवा तपोवन करत आहे. दाजीसाहेब पटवर्धन यांनी एक आदर्श सर्व सोयीयुक्त अत्यंत देखणा हा परिसर निर्माण केला आहे.

आज काळ बदलला तरी बरी झालेले रुग्ण अजूनही आपल्या घराची वाट पाहत जीवन काढीत आहेत. रोग बरा होतोच. तो काही तसाच राहत नाही. मात्र मनातील घृणा अजूनही कमी झालेली मला तरी वाटत नाही. बरे झालेली रुग्ण आपल्या मुलाबाळांच्या, नात-नातीन यांच्या सहवासात आपल्या घरी जातील, तेव्हाच कुठं कुष्ठरोग संपला, मनातूनही व रोगातूनही तो सुवर्ण दिवस प्रत्येक बऱ्या झालेल्या रुग्णाच्या आयुष्यात येईन तेव्हाच दाजीसाहेब यांच्या कार्याची आपण परतफेड करू शकू.

**उमेश ज्ञानेश्वर ईखे**/९५१८५७११३८

### जिंदादिल भाऊसाहेब पाटणकर

क्या बात है! वा! वा! हे शब्द उच्चारण्याची वेगळीच जागा आहे. त्यासाठी असणारी वेळ ही वेगळी आहे. कुठलीही गोष्ट किंवा प्रकार जेव्हा तुमच्या एकदम हृदयाला हात घालतो, तेव्हा हे शब्द आपोआप बाहेर येतात. मग मात्र त्याला स्थळ-काळाचे बंधन नसते. जिंदादिली हा शब्द म्हणून महत्त्वाचा. स्थळ-काळाचे भानही विसरावे एवढी जादू या दोन शब्दांमध्ये आहे. मैफिल नावाचा शब्द यवतमाळकरांना आणि महाराष्ट्राला समजावला असेल तर तो भाऊसाहेब पाटणकरांनी. मैफिल



कोणी करावी हे पण सांगितलं, कशी करावी याचाही आदर्श त्यांनीच घालून दिलाआहे. पांढरी स्वच्छ वेशभूषा, डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा, चेहऱ्यावर प्रचंड समाधान, तृप्ती, आणि रगारगात भिनलेला मिस्कीलपणा जर कुठे सापडत होता तर तो त्यांच्या ठिकाणी. एखाद्या ठिकाणी गेल्यावर निमंत्रिताने आपल्याला सहज समज द्यावी, अन् आपण ती मन:पूर्वक स्वीकारावी, याचं उदाहरण म्हणजे भाऊसाहेबांची मैफिल. दोस्तहो! हा त्यांच्या आवडीचा शब्द. या शब्दाद्वारे पाठीवर ठेवलेला त्यांचा हात मैफिल संपेपर्यंत काढता येत नसे. मी ऐकलेल्या त्यांच्या एकाच मैफिलीतील सगळे अंदाज आयुष्यभर स्मरणात आजही आहेत. मराठीतील शायरी वाचतो, ऐकतो तेव्हा भाऊसाहेब डोळ्यापुढे उभे राहतात. मैफिलीस आला आहेस तर ये! वा! वा! क्या बात है! असे कुठलेही शब्द जर का ओठावर आले तर त्यांना आवरू नका, असे ते रसिकांना बजावून सांगत. या मराठी शायरीच्या कार्यक्रमात तुझे स्वागत आहे. पण आता बाकी सारे विसरून जा आणि या मैफिलीचा आनंद घ्या. शृंगार, जीवन, विनोद, मृत्यू, दार्शनिक, इत्यादी विविध प्रकार घेऊन भाऊसाहेब पाटणकरांनी मराठी शायरी समृद्ध केली. यातील कुठला प्रयोग उपस्थित श्रोता वर्गावर कमी जास्त करायचा हे भाऊसाहेबच ठरवायचे. मैफिलीचा अंदाज घेण्यासाठी काही सुटसुटीत मराठी शेर भाऊसाहेब अंगावर फेकायचे. थोडक्यात उपलब्ध वर्गाची चाचपणी करायचे.

लागला तिचा धक्का जोरात पण होता मऊ...
ती म्हणाली सॉरी आणि मी म्हणालो थँक्यू...
किंवा
तिरप्या तिच्या नजरेवरी बेहद्द झालो खुश मी...
नंतर समजले मजला अशीच पाहते ती नेहमी...

या अशा काही विस्कळीत शायरींच्या भरोशावर भाऊसाहेब मैफिलीचा पूर्ण अभ्यास करून घ्यायचे. नंतरची सगळी जबाबदारी गोलंदाजी, फलंदाजी, क्रिकेटमधले सगळे आयाम भाऊसाहेबच हाताळायचे आणि श्रोत्यांना फक्त हसण्यासाठी सोडून द्यायचे. दोस्त हो! हा शब्द वापरून भाऊसाहेब मैफिलीच्या खांद्यावर जो हात ठेवीत, भाऊसाहेब म्हणतील त्या पद्धतीने झोकांड्या खातच म्हणाना मैफिल पुढे पुढे जात असे. दूरदर्शन नावाचे घातक प्रकरण त्याकाळी आले नव्हते. आई-वडिलांबरोबर सगळीकडे आमची हजेरी लागायची. व्याख्यानमाला ऐकून आणि टिळक स्मारकमधील विद्यावाचस्पती ऐकून यापलीकडे मराठीत काही प्रकार असतो हे माहीतच नव्हते. ओठावर नुकतीच मिसरुड फुटलेली, तारुण्याचा जोश अंगात जाणवू लागत असतानाच भाऊसाहेब त्यांच्या मैफिलीतून भेटले. शेर शायरी हे प्रकरण भाऊसाहेबांनीच माहीत केले. प्रणय, विनोद यावरील त्यांचे शेर मला पुरते वेड लावून गेले. इश्क या विषयावरील त्यांची शायरी ऐकून माझ्या संस्कारशील लहान मेंदूला प्रचंड मुंग्या आल्या. या मुंग्यांनी माझी साथ अजूनही सोडली नाही. वा! वा! क्या बात है! हे शब्द तेव्हापासूनही घशातच असतात आणि केव्हाही बाहेर सहज डोकावतात. जिंदादिली शब्दाचा परिचय पहिल्यांदा भाऊसाहेबांच्या मैफिलीत झाला. आयुष्य बदलून टाकणाऱ्या या मराठी साहित्यातील जिंदादिल व्यक्तिमत्त्वास मानाचा मुजरा...

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२३६

### गाव तेथे एसटी हे ब्रीद बंद झाले काय?

हल्ली मरापमंचे ग्रामीण भागातील जनतेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले असे दिसते. पुलगाव परिवहन डेपोकडे जेव्हापासून पुलगाव ते यवतमाळ शिरपूर कळंब मार्गे विजयगोपाल, किंवा पुलगाव ते वर्धा देवळी मार्गे विजयगोपाल शिरपूर या बस फेऱ्या हस्तांतरित केल्या तेव्हापासून या मार्गाच्या एस. टी. बस परिवहन व्यवस्थेचा अगदी बट्याबोळ झाला असे पाहण्यास आले. तसे पाहता पुलगाव ते शिरपूर या महामार्गाशी जोडलेल्या सरासरी २० किलोमीटर आड मार्गावर नाचणगांव, इंझाळा, विजयगोपाल, रोहणी, श्री क्षेत्र कोटेश्वर देवस्थान, अशी अनेक महत्त्वाची स्थानके व इतर आजूबाजूची लहानमोठ्या ग्रामीण लोकसंख्या असलेली अनेक गावे आहेत. हा एस. टी.मार्ग ग्रामीण प्रवाशांना दोन जिल्हा शहर, दोन तहसील कार्यालय शहर, कृषी कामे, व्यापार, तसेच शालेय विद्यार्थ्यांकरीता प्रवासासाठी सतत वर्दळीचा तसेच अगदी सोयीस्कर असा आहे. परंतु वर्तमान स्थितीत एस. टी. महामंडळाच्या अविचारी निर्णयामुळे या मार्गावर दिवसभरात केवळ दोनच एस. टी. बसच्या फेऱ्या आणि त्याही अनिश्चित असे मनमानी आयोजन केलेले दिसते आहे. तसेच एस. टी. फेऱ्या केव्हाही पूर्वसूचना न देता डेपोतून अचानक निर्णय घेऊन रद्द केलेल्या आढळतात. तेव्हा प्रवाशांची, परिवारांची तारांबळ होऊन जो त्रास होतो तो क्लेशदायक असतो. पूर्वी याच मार्गावर दिवसभरात वीस ते पंचेवीस बसेसची सतत वर्दळ राहायची. मात्र आज ही संख्या दिवसाला केवळ दोन बसेसवर आली आहे. कधी कधी तर या मार्गावर विशेषतः शनिवारी, रविवारी एकही बस धावताना दिसत नाही, असे निदर्शनास आले आहे. महामंडळातील संबंधित डेपो अधिकाऱ्यांनी या मार्गावरील आपले तीस दिवसांचे शेड्युल्ड तपासून बघावे व त्रुटी अहवाल मुख्यालयासमक्ष सादर करावा.

या मार्गावर ग्रामीण भागातील प्रवाशांकरिता एस. टी. बसशिवाय इतर कोणतेही वाहन उपलब्ध नसते. आज बसेसची संख्या इतकी सीमित केल्यामुळे प्रवाशांना खूप त्रास व मनस्ताप सहन करावा लागतो. नागपूर, यवतमाळ, अमरावती, वर्धासारख्या दूरवरच्या मोठ्या शहरातून येणाऱ्या प्रवाशांकरिता तसेच पुलगाव मुख्य रेल्वेमार्गाला जोडलेले तालुक्यातील एकमेव रेल्वे स्टेशन असल्याने या मार्गावरील ग्रामीण भागातील आपल्या इच्छित गावात जाण्यासाठी कसलेही वाहन उपलब्ध नसते. एस. टी. हाच एक पर्याय होता. आता मात्र तीही व्यवस्था मोडकळीस आलेली दिसते. परिवहन मंडळाच्या संबंधित डेपो मॅनेजर व अधिकाऱ्यांनी या संवेदनशील तक्रारीवर विचार करून पूर्वीसारखी भरपूर नियमित बसेसची व्यवस्था करावी अशी विनंती आहे.

**किशोर पोहेकर**/विजयगोपाल, वर्धा

### एक जानेवारीपासून सुरू होणारे 'नववर्ष' कसे?

जानेवारी ते डिसेंबर या बारा महिन्यांच्या कालखंडास वर्ष संबोधणे तसेच ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री बारा वाजता याची सुरुवात होते असे मानणे किंवा समजणे हे कितपत शास्त्रीय आहे? पुरातन काळी, म्हणजे वैदिक काळापासून कालगणना करण्यासाठी तसेच युक्त कार्यासाठी योग्य काळ निवडण्यासाठी ज्योतिषशास्त्र अस्तित्वात आले. यामुळेच या शास्त्राला 'कालविधानशास्त्र' असे संबोधण्यात येऊ लागले. कालगणना करण्यासाठी वैदिक काळापासून ते आजतागायत, एकूण नऊ पद्धती अस्तित्वात आल्या. त्यातील प्रारंभीच्या बऱ्याच पद्धती जरी सध्या प्रचलित नसल्या तरी यातील शेवटच्या दोन-तीन पद्धती आजही आपण आचरणात आणत आहोत. त्या म्हणजे चांद्र कालगणना व सौर कालगणना होत.

आपल्या दैनंदिन जीवनात आणि व्यवहारात प्रचलित असलेला इसवीसन हा पूर्णपणे सूर्याच्या राशीचक्रातील भ्रमणावर म्हणजेच सौरमानावर आधारित आहे. हा काळ एकूण ३६५ दिवस पाच तास ४८ मिनिटे व ४६ सेकंद एवढा आहे. म्हणूनच जानेवारी ते डिसेंबर या बारा महिन्यातील एकूण दिवस ३६५ भरतील अशा प्रकारे काही महिने कमी व काही अधिक दिवसांचे करून सोय करून ठेवली आहे. इसवी सनाची ही प्रचलित पद्धती आपली भारतीय पद्धती आहे काय? याचे उत्तर अर्थातच 'नाही' असे आहे. येशू ख्रिस्तांच्या जन्मापासूनच इसवीसन (इसवी म्हणजे ख्रिस्ती व सन् म्हणजे वर्ष) सुरू झालेला आहे असा जो सर्वत्र समज आहे, तो मुळातच चुकीचा आहे. कारण पहिली गोष्ट म्हणजे येशू ख्रिस्तांचा जन्म केव्हा झाला? त्या दिवसाविषयीच एकवाक्यता नाही. दुसरे म्हणजे, इसवी सनाची ही कालगणना ख्रिस्ताच्या जन्माच्या सुमारे सहाशे वर्षांनंतर अंमलात आली आहे. अजूनही तिसरे कारण असे की, सध्याच्या इंग्रजी कॅलेंडरचा प्रारंभ इसवी सनाच्या ४५ वर्षांपूर्वीच जुलीयस सिजरने केला. या पद्धतीत वेळोवेळी अनेक सुधारणा होत गेल्या त्यापैकी काही ठळक अशा -

या पद्धतीत जानेवारीची एक तारीख निश्चित करण्यासाठी इसवी सनापूर्वीचे ४६ वे वर्ष तब्बल ४४५ दिवसांचे मानण्याचा कायदा ज्युलीयस सिझरने केला. सिझरच्या या कायद्यानंतरही वास्तविक मानापेक्षा दरवर्षी सुमारे ४५ मिनिटे जास्त धरली जाऊ लागली ही चूक १६ व्या शतकापर्यंत तशीच चालवण्यात आली व १६ व्या शतकाअखेरीस, या चुकीमुळे दहा दिवस जास्त मानले जाऊ लागलेत. तेव्हा त्या चुकीच्या दुरुस्तीसाठी तेव्हाचा पोप, तेरावा ग्रेगरी यांनी लीप वर्षाचा एक सुधारित नियम बनवून, पुढील वर्ष गणनेत अशा प्रकारचा घोटाळा होणार नाही, अशी तजवीज केली व त्यापूर्वी झालेल्या घोटाळ्यातील दहा दिवस कमी करण्याच्या दृष्टीने, इसवीसन १५८२ साली, ऑक्टोबरच्या पाच तारखेला १५ तारीख मानण्याचा नियम केला. अशा रीतीने जास्त झालेले दहा दिवस मागे आणले. कालमापनाची ही पद्धती १७५२ पासून, इंग्लंडमध्ये मानली जाऊ लागली. तोपर्यंत त्यांचा वर्षारंभ मार्चच्या २५ तारखेस म्हणजे आपल्या गुढीपाडव्याच्या आसपास होत होता व मार्च हा महिना पहिला तर एप्रिल हा दुसरा तर डिसेंबर दहावा महिना गणला जात होता. ही नावे सुद्धा ऑक्टोबर आठ, नोव्हेंबर नऊ व डिसेंबर (डेका) १०, या लॅटिन शब्दांच्या अर्थामुळेच पडली आहेत.

जसे जुलै म्हणजे जुलीयस. ऑगस्ट म्हणजे ऑगस्टस् (राजाचे नांव) इत्यादी. मुळात दहा महिन्यांच्या कॅलेंडरमध्ये ही व्यक्ती वाचक महिन्यांची नावे, त्या त्या महान व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ, नंतर समाविष्ट करण्यात येऊन वर्षाचा काळ बारा महिने करण्यात आला. संपूर्ण कालगणना पद्धती ही चंद्राच्या भ्रमणाशी व गतीशी निगडित आहे सूर्याच्या नक्षत्र चक्रातील भ्रमणाशी या पद्धतीचा मेळ गणितसिद्ध बसविण्यात आला आहे. भारतीय संवत्सरातही जरी १२ महिने असले तरी या बाराही महिन्यांची नावे इंग्रजी मासाप्रमाणे कुणा व्यक्तींच्या नावावरून पडली नसून ती त्या त्या महिन्यात होणाऱ्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात दिसून येतो, त्या त्या नक्षत्रांच्या नावावरून त्या त्या महिन्यांची नावे आहेत. जसे चैत्र पौर्णिमेस चंद्र, चित्रा नक्षत्रात असतो म्हणून त्या महिन्याचे नाव चैत्र असे ठेवले गेले. ज्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात दिसून येतो त्या महिन्याचे नाव श्रावण असे ठेवले गेले. तथापि आपण सर्व मात्र आपल्या पद्धतीकडे उपेक्षेने पाहून, इंग्रजांच्या कोणत्याही अशास्त्रीय पद्धतीचे अंधानुकरण करण्यातच दंग आहोत.

**ज्यो. मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

## आजचे संघगीत-८६

रविवार, २८ डिसेंबर २०२५

### ही पवित्र माझी माता धरती येथे कर माझे जुळती

ही पवित्र माझी माता धरती येथे कर माझे जुळती ॥धृ॥

याच कणांतून मानवतेचा आदिम अंकुर डोले
याच कणांनी वेदान्ताचे बोल अमर ऐकविले
याच कणांना हलवित गेली प्रभु रामाची हाक
याच कणांशी एकजीव हो चितोडची ती राख
याच कणांनी श्रीशिवबाची घडली चेतन मूर्ती ॥१॥

नव्हे मृत्तिका, चैतन्याचे प्रतीक माझी आई
तिच्या जीवनांतुन तेजाचा अखंड निर्झर वाही
तिने पाजले स्तन्य मधुरतम धर्माचे आम्हास
तिच्याच जीवित्वावर असती निर्भर अमुचे श्वास
संकटावरी मात कराया हीच एकली स्फूर्ती ॥२॥

अमृतकुंभा जिंकायाला लागे गरुडभरारी
हलाहलाचे विष पचवाया समर्थ हो त्रिपुरारी
या शक्तीचे आवाहन का श्रद्धेविना घडेल?
या श्रद्धेची पूजा देवी बोला कुठे असेल?
या आईविण वदा कोण मग करील इच्छापूर्ती? ॥३॥

अम्हांस लागे पिसे आमुच्या आईचे दिनरात
सुखदुःखाशी तिच्या आमुचे जीवन हे निगडीत
मिळेल जो जो तया देउ या वेडाचे हे वाण
या वेडामधिं शतशत असतिल गेलेले रंगून
भावबळावर दिगंत नेऊ या मातेची कीर्ती ॥४॥

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



सोलापूर : सिद्धेश्वर यात्रेनिमित्त नंदीध्वज मिरवणुक मार्गावरील अडथळा काढण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. जुनी फौजदार चावडी परिसरातील वाढलेल्या झाडांच्या फांद्या कापण्याचे काम सुरु करताना महापालिकेचे कर्मचारी.



### अंतरराष्ट्रीय पॅरा बॅडमिंटन खेळाडू शुभदा जिंदे हीस बालाजी अमाईन्सच्यावतीने मदत

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथील शुभदा विठ्ठलपंत जिंदे हिने बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाच्या नॅशनल पॅरा बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्राकडून खेळताना एकेरी व दुहेरीत प्रत्येकी एक अशी दोन ब्राँझ पदके मिळविली. तसेच तिसऱ्या स्टेट पॅरा बॅडमिंटन स्पर्धेत २ रौप्य पदक मिळविली. या कामगिरीवर तिची इजिप्त पॅरा बॅडमिंटन इंन्टरनॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यासाठी तिला बालाजी अमाईन्सच्यावतीने तिला व प्रशिक्षकास विमानाचा खर्च देण्यात आला. व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांच्या हस्ते धानादेश व विमानप्रवासाचे तिकिट देण्यात आले.

# उत्सव दानाचा हा उपक्रम समाजातील धडपडणाऱ्या हातांना बळ देणारा : पद्मश्री दादा इदाते

**तभा वृत्तसेवा,**
**दि. २७ डिसेंबर -**

एका छताखाली १० संस्थांच्या सक्षमीकरणासाठी उत्सव दानाचा हा उपक्रम म्हणजे समाजातील धडपडणाऱ्या हातांना बळ देणारा ठरेल, हे केवळ एक कार्यक्रमाचा प्रारंभ नाही तो माणुसकी जिवंत असल्याची साक्ष आहे आणि तो माणुसकीचा भक्कम पुल आहे. असे उपक्रम ठिकठिकाणी राबविले जावेत, असे प्रतिपादन पद्मश्री दादा इदाते यांनी केले.

साकव फॉउंडेशन आयोजन उत्सव दानाचा या सामाजिक संस्थांच्या प्रदर्शनाचे उदघाट्न समरसतेचे पुरस्कर्ते पद्मश्री भिकू इदाते यांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त भारूडसम्राज्ञी चंदाताई तिवाडी, साकव चे संस्थापक अध्यक्ष डॉ जगदीश पाटील, दीपक कलढोणे, दीपक आर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूरकरासाठी सामाजिक ऋण फेडण्याची संधी साकव उत्सव दानाच्या माध्यमातून देत असून नागरिकांनी सामाजिक संस्थांच्या प्रदर्शनास भेट देऊन सामाजिक ऋण फेडावं असं आव्हाहन चंदाताई तिवाडी यांनी केले. सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले.

**फडकुले सभागृहात प्रदर्शनासोबत रक्तदान शिबिर**

सामाजिक संस्थांच्या प्रदर्शना सोबत दोन दिवस रक्तदान शिबिराचे ही आयोजन फडकुले सभागृह येथे करण्यात आले आहे. हे प्रदर्शन शनिवार व रविवार या दोनही दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू आहे. नागरिकांनी भेट देऊन सामाजिक संस्थेचं काम जाणून घ्याव अस आवाहन साकव फाउंडेशन चे वतीने करण्यात आले.

**सहभागी संस्था**

आई समाजसेवी संस्था बीड, साधनापूर्ती असोसिएन कुर्डुवाडी, आधार मतिमंद निवासी विद्यालय सोलापूर, पारधी समाज जनजागृती सेवाभावी संस्था बीड, स्नेहप्रेम कर्जत, यशोदानंद गोशाळा राशीन, स्नेहसावली फॉउंडेशन बीड, राष्ट्रीय अंध फॉउंडेशन सोलापूर, सारथी युथ फॉउंडेशन सोलापूर, साकव फॉउंडेशन सोलापूर

# नवीन वर्षासाठी विशेष रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे, सोलापूर विभागातील सोलापूर, कलबुरगि आणि वाडी स्थानकांम र्गे मुंबई आणि हैदराबाद दरम्यान नवीन वर्षासाठी विशेष गाड्या चालवणार आहे.

यामध्ये हैदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई नवीन वर्षाची विशेष गाडी रविवार २८.१२.२०२५ रोजी हैदराबाद येथून सायंकाळी ०५:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०:४० वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल. त्याचबरोबर लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-हैदराबाद नवीन वर्षाची विशेष गाडी सोमवार २९.१२.२०२५ रोजी एलटीटी मुंबई येथून दुपारी ०३:२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०९:०० वाजता हैदराबाद येथे पोहोचेल.

बेगमपेट, लिंगमपल्ली, विकाराबाद, तांडूर, वाडी, कलबुरगि, सोलापूर, पुणे आणि कल्याण असे या रेल्वे गाड्यांचे थांबे असतील. १ फर्स्ट एसी कम एसी- टायर, २ एसी- टायर, ५ एसी- टायर, १० स्लीपर क्लास, २ सेकंड क्लास आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन असे २२ डबे अशी रचना या रेल्वे गाड्यांची असेल. आरक्षित नसलेल्या डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवरील बुकिंग काउंटरवर आणि यूटीएस ॲपद्वारे देखील करता येईल. प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटासह प्रवास करावा.








# गणिताशिवाय जीवनाची कल्पनाच अशक्य : प्रा. कट्टे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत गणिताचा वापर होत असतो. दैनंदिन व्यवहारात क्षणाक्षणाला प्रत्येक टप्प्यावर ते आपल्याला मार्गदर्शन करते. ती केवळ आकड्यांची भाषा नसून, तर्कशक्ती, विश्लेषण क्षमता आणि निर्णयक्षमता विकसित करणारे शास्त्र असल्याने गणित समजून घेतले, तर आयुष्यातील अनेक प्रश्न सहज सुटू शकतात. म्हणूनच गणिताशिवाय जीवनाची कल्पनाच अशक्य असल्याचे प्रतिपादन प्राचार्य बी. एस. कट्टे यांनी केले.

भारताचे महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म दिवस दरवर्षी राष्ट्रीय गणित दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे होते.

यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या प्रशामंजुषा स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रास्ताविक प्रा. अंजली पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या ढेपे यांनी केले. तर प्रा. आकाश भुसे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नीता भास्कर, प्रा. रेश्मा झांबरे, प्रा. ऐश्वर्या मेटे, प्रा. पूजा विटकर, प्रा. दिपाली सातपुते, प्रा. प्रियंका पाटील, प्रा. वृषाली सापटणेकर यांचे सहकार्य लाभले.

# हृदयविकारावरील प्रगत उपचार विषयीची माहिती केली विशद

## एसीएस हॉस्पिटलतर्फे जनजागृती प्रदर्शनी व प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

एन्जोप्लास्टी म्हणजे काय? ती कशी केली जाते? स्टेंट कसा बसवला जातो? अशा प्रश्नांच्या उत्तरासह हृदयविकारावरील प्रगत उपचार तंत्रज्ञान सोलापूरकरांनी जाणून घेतले. एसीएस हॉस्पिटलतर्फे शनिवारी आयएमए हॉलमध्ये हृदयविकारावरील प्रगत उपचारासंदर्भात जनजागृती प्रदर्शनी व प्रात्यक्षिकांचे सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रिसिजन कॅमशाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनीष केत, तसेच आर.एम.ई.ए.चे अध्यक्ष नीलकंठ वाकचौरे, उद्योजक सुहास आदमाने यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर डॉ. सुहासिनी शहा, डॉ. प्रमोद पवार, राहुल कारीमुंगी, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. स्नेहल पवार, डॉ. रुची गांधी, डॉ. नेहा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि फित कापून प्रदर्शनीचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रिसिजन कॅमशाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा म्हणाले, ''कोणत्याही क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून कार्य केल्याशिवाय त्या कार्यात अचूकता येत नाही. हे ओळखून एसीएस हॉस्पिटलने सोलापुरात हृदयविकारावरील उपचारांसाठी प्रगत तंत्रज्ञान आणले आहे. याचे कौतुक आहे.''

डॉ. प्रमोद पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली हब्बा आणि अनिता नन्ना यांनी केले.

### सोलापूरकरांनी केले कौतुक

या प्रदर्शनामधून सोलापूरकरांनी प्रगत हृदयविकार उपचार तंत्रज्ञान व अत्याधुनिक यंत्रसामग्रीची माहिती घेतली. तसेच एन्जोप्लास्टी म्हणजे नेमके काय, ती कशी केली जाते, स्टेंट कसा बसवतात, हृदयाचे छिद्र बंद करण्याची शस्त्रक्रिया कशी केली जाते, आर्टिफिशियल हार्ट म्हणजे काय, हृदयरोगावरील उपचारासाठी ए आय चा वापर कसा होतो याचीही माहिती नागरिकांना देण्यात आली. प्रगत उपचार पद्धतीचे प्रात्यक्षिक, आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञानदेखील सोलापूरकरांना प्रत्यक्ष पाहता आले. रुग्णांना तसेच नागरिकांना पडणाऱ्या अनेक प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे सोप्या भाषेत या ठिकाणी देण्यात येत होती. या उपक्रमाचे सोलापूरकरांनी कौतुक केले.

# सोलापुरात आज एसीएस निमाकॉन राज्यस्तरीय मेडिकल कॉन्फरन्स

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा), सोलापूर शाखा आणि ए.सी.एस. हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार,२८ डिसेंबर रोजी ''एसीएस निमाकॉन २०२५'' या राज्यस्तरीय वैद्यकीय परिषदेचे आयोजन म हालक्ष्मी बँक्वेट्स येथे करण्यात आले आहे.

राज्यभरातून हजाराहून अधिक डॉक्टरांनी या कॉन्फरन्स साठी रजिस्ट्रेशन केले आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून कॉन्फरन्सला सुरुवात होणार असून अकरा वाजता गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे हस्ते उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून निमा केंद्रीय शाखेचे अध्यक्ष डॉक्टर आशुतोष कुलकर्णी, डॉ. शांतीलाल शर्मा, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, डॉ. गजानन पडघन, डॉ.सायबू गायकवाड, डॉ.शैलेश निकम, डॉ. वैशाली पडघन, डॉ. मृण्मयी मासोदकर, राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. राजू ताटेवार, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. तुषार सूर्यवंशी, डॉ. सोपान खर्चे डॉ. रविराज गायकवाड, तसेच सदस्य डॉ. सचिन पांढरे , डॉ.अभय लुनावत, एसीएस हॉस्पिटलचे संचालक डॉ.एसीएस हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ.राहुल कारीमुंगी, डॉ. प्रमोद पवार, डॉ सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड पाटील, निमा वूमन फोरम चे डॉ. अमिता कोकडे डॉ. प्रज्ञा खोसे, डॉ.मीनाक्षी गवळ , डॉ.अनुश्री मुंडेवाडी, डॉ. राजश्री मठ यांची उपस्थिती राहणार आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील नवीन संशोधन आणि प्रगत उपचार पद्धतींची माहिती डॉक्टरांना मिळावी, या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या एकदिवसीय परिषदेत विविध तज्ज्ञ डॉक्टर वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यामध्ये डॉ. प्रशांत दोंड , डॉ. डी. जी. सपले, हृदयरोग चर्चासत्र : ए.सी.एस. हॉस्पिटलचे डॉ. राहुल कारीमुंगी, डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी आणि डॉ. दीपक गायकवाड तसेच डॉ. सुनील हिलालपुरे, डॉ. विनोद बन, डॉ. सुजित जहागीरदार , डॉ. रणजित कदम, डॉ. मीनल चिडगुपकर आणि डॉ. प्रफुल्ल कल्याणकर आदीचा समावेश असल्याची माहिती निमाचे प्रसिद्धी प्रमुख डॉ. उत्कर्ष वैद्य यांनी दिली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्ट हेड डॉ. सुभाष भांगे , डॉ. अमोल माळगे , डॉ.असिफ शेख, डॉ. अभिजीत पुजारी, डॉ. नितीन बलदवा,निमा शाखेचे अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डी मनी , डॉ. प्रवीण ननवरे , वूमन फोरम अध्यक्षा डॉ. श्रुती मराठे, डॉ. अश्विनी देगावकर , डॉ. पल्लवी भांगे, स्टूडेंट फोरमचे डॉ. समर्थ वाले व सर्व कमिटी चेअरमन व निमा सदस्य परिश्रम घेत आहेत.

# धाब्यांवरील धडक कारवाईत २९ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आचारसंहिता कालावधीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रांवर तसेच अवैध देशी-विदेशी मद्य विक्री, वाहतुक व अवैध धाब्यांवर धडक कारवाईत २९ लाख ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पुणे विभागीय उपायुक्त सागर धोमकर, याच्या निर्देशानुसार व राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री पं. जाधव, प्र.उपअधीक्षक जे. एन. पाटील यांचे समवेत शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रांवर, अवैध देशी-विदेशी मद्य विक्री व वाहतुकीवर केलेल्या धडक कारवाईत ४२ गुन्हे नोंद करून ५० जणांवर कारवाई झाली आहे. या कारवाईत २८, २९० ब.लि. रसायन, १४३४ ब.लि. हातभट्टी दारु, १७५.५८ ब. लि. देशी मद्य, १८ ब.लि. विदेशी मद्य, ११ ब.लि. बिअर, ७५ ब.लि. ताडी तसेच ३ चारचाकी व ४ दुचाकी वाहनांसह २९ लाख ५० हजार रुपयांचा प्रोव्हि. गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध मद्य विक्री करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या ७ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून २७ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. हॉटेल जगदंबा, हॉटेल यशराज ढाबा, हॉटेल राजवाडा ढाबा, विलास कोल्ड्रिंक्स, विजापुर रोड कंबर तलाव परिसरातील चायनिज सेंटर, हॉटेल वैष्णवी ढाबा अश्या ढाब्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाई निरीक्षक ओ व्ही घाटगे, राकेश पवार, पंकज कुंभार, सचिन भवड, तसेच दुय्यम निरीक्षक सर्वश्री राम निंबाळकर, धनाजी पोवार, सुखदेव सिद, सचिन शिंदे समाधान शेळके, सुदर्शन संकपाळ, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, संजय चव्हाण, जवान सर्वश्री आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, अण्णासाहेब फड, कपिल स्वामी, गजानन ढब्बे, तानाजी जाधव, पवन उगले, योगीराज तोग्गी, स्वप्निल आरमाळ, योगेश गाडेकर, पंढरीनाथ भुतेकर, मंगेश म ारसिंग, केतन तानगावडे, महिला जवान शिवानी मुढे, वाहनचालक दिपाली सलगर, संजय नवले व दिपक वाघमारे यांनी पार पाडली.

# डोंबिवली रंगीत पणत्यांनी साकारली भारतमातेची मोझॅक कलाकृती

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

२.५ लाख रंगेबिरंगी पणत्यांमधून साकारलेली भारतमातेची एक अफलातून मोझॅक चित्रनिर्मिती सध्या डोंबिवलीत लक्षवेधक ठरत आहे.रंगीत पणत्यांच्या माध्यमातून आकारलेल्या चित्राने जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे.भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराच्या माध्यमातून ही अभिनव कलाकृती तयार करण्यात आली आहे. ही रेकॉर्ड ब्रेक कलाकृती पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षक डोंबिवली जिमखाना मैदानावर गर्दी करत आहेत. ही कलाकृती २८ डिसेंबरपर्यंत खुली ठेवण्यात आली असून प्रेक्षकांनी त्याचा लाभ घ्यावा.

# शापूरजी पल्लोनजीचा प्लॉटेड डेव्हलपमेंट क्षेत्रात प्रवेश

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

भारतातील विश्वासार्ह रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेट (एसपीआरई) ने पुणे ग्रोथ कॉरिडोरमध्ये १०५ एकरांवरील प्रीमियम प्लॉटेड प्रकल्प ट्रीटोपियाच्या माध्यमातून प्लॉटेड डेव्हलपमेंट क्षेत्रात प्रवेश केल्याची घोषणा केली. या प्रकल्पातून सुमारे ६०० कोटी रुपयांच्या महसूलाची अपेक्षा आहे. आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित आयटी पार्क तसेच प्रस्तावित इनर आणि आउटर रिंग रोड्सजवळ स्थित असलेला हा प्रकल्प, प्लॉटेड डेव्हलपमेंटसाठी वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर एसपीआरई च्या निवासी पोर्टफोलिओचा धोरणात्मक विस्तार आहे. या प्रकल्पात २,००० ते ६,००० चौ. फुट क्षेत्रफळाच्या ४८३ नियोजनबद्ध निवासी प्लॉट्सचा समावेश असेल.

# भालशंकर गौरव समितीचे पुरस्कार व अनाथ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

नामदेवराव भालशंकर यांच्या ८७ व्या जयंतीनिमि त्त आयोजित करण्यात आलेल्या नामदेवराव (बापू) बंडूजी भालशंकर गौरव समिती, मातोश्री रुक्मिणी फाउंडेशन तसेच सम्यक अकॅडमी व लोकराजा फाउंडेशन यांच्यावतीने शिवस्मारक सभागृहात राज्यस्तरीय पुरस्कार आणि शिष्यवृत्ती तसेच संविधान गौरव परीक्षेतील गुणवंतांना पारितोषिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी अण्णासाहेब भालशंकर हे होते. यावेळी मंचकावर मातोश्री रुक्मिणी भालशंकर, प्रार्थना फाउंडेशनचे संस्थापक प्रसाद मोहिते, शिक्षण विभाग वेतन व भ. नि.नि. पथकाचे जिल्हा अधीक्षक लक्ष्मण बालवाड, सागर अंबूरे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभागाचे सदस्य प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ, समता सैनिक दलाच्या जिओसी सुमित्रा जाधव, नानासाहेब भालशंकर, गौरव समितीचे सचिव प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन रवी देवकर यांनी करून घेतल्यानंतर दिवंगत रुक्मिणी गायकवाड यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर १२ पुरस्कारार्थींना पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर मातोश्री रुक्मिणी फाउंडेशनच्या वतीने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच निराधार गरजू , दत्तक विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण केल्यानंतर सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित केलेल्या संविधान गौरव परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांना भरघोस रकमेचे धनादेश, पारितोषिके व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. प्रास्ताविक रवी देवकर यांनी केले. सूत्रसंचालन विक्री करनिरीक्षक बुद्धजय भालशंकर व प्रा. युवराज भोसले यांनी केले तर शिवाजी जगताप यांनी आभार मानले. याप्रसंगी चिमुकल्यांनी नामदेवराव भालशंकर यांच्या पूर्व आयुष्यावर आधारित नातवांनी वास्तववादी लघुनाटिका सादर केली.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

तथागत भगवान गौतम बुध्द धम्म रत्न पुरस्कार आनंद जाधव (सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती ॲन्टॉप हिल, मुंबई), डॉ. बाबासाहेब आंबेडकर समतारत्न पुरस्कार चंदाताई कासले (लेफ्टनंट जनरल-समता सैनिक दल, मुंबई), राजर्षी शाहू महाराज जीवनगौरव पुरस्कार दिलीपराव चौगुले , डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्काराने डॉ. सुरेश कोरे, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले समाजरत्न पुरस्कार युवराज पवार, राजर्षी शाहू महाराज उद्योगरत्न पुरस्कार शंकर चौगुले, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार- लाडजी बागवान, राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्कार मयुर प्रधान, राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्कार मनोहर कुंभार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पत्रकार पुरस्कार- विश्वभूषण लिमये व राहुल भालशंकर, तथागत भगवान गौतम बुध्द विशेष गौरव पुरस्कार- सम्यक विचार मंच-मिलिंद व्याख्यानमाला, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ३८

### रनिंग गियर्स

धावणे हे सोपं आणि नैसर्गिक व्यायाम असलं तरी योग्य गियर्स आणि उपकरणांचा वापर केला तर धावण्याचा अनुभव अधिक सुरक्षित, आरामदायी आणि प्रभावी होतो. योग्य गियर्समुळे इजा टाळता येते, परफॉर्मन्स सुधारतो आणि धावण्याची आवड टिकून राहते.

**रनिंग शूज :** सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे रनिंग शूज. धावण्याच्या पद्धतीनुसार (न्यूट्रल, ओव्हरप्रोनेशन, सुपीनेशन), पायाच्या आकारानुसार आणि अंतरानुसार शूज निवडावेत. हलके वजन, योग्य कुशनिंग, सोलची लवचिकता आणि हवा खेळती ठेवणारी मटेरियल ही वैशिष्ट्ये महत्त्वाची. शूज साधारण ६००-८०० किमी धावल्यानंतर बदलणे योग्य.

**रनिंग कपडे:** कॉटनऐवजी ड्राय-फिट किंवा पॉलिस्टर मटेरियलचे असावेत. हे शरीरावरचा घाम पटकन शोषून घेतात आणि चाफिंग कमी करतात. थंडीमध्ये थर्मल लेयर, उष्ण वातावरणात हाफ स्लीव्ह किंवा स्लीव्हलेस शर्ट उपयुक्त. महिलांसाठी योग्य स्पोर्ट्स ब्रा आवश्यक

**आर्म स्लीव्ह :** हाताची पोझिशन सुधारते आणि त्वचेचे संरक्षण होते. **हेड बँड:** घाम डोळ्यात जाण्यापासून वाचतो. **रिस्ट बँड:** हातावर घातल्याने धावण्यात चांगली अनुभूती मिळते. **सॉक्स:** कॉटनपेक्षा ड्राय-फिट किंवा कंप्रेशन सॉक्स चांगले. फोड/ब्लिस्टरपासून संरक्षण आणि रक्ताभिसरण सुधारते. **स्पोर्ट्स/ जीपीएस वॉच :** हृदयगती, पेस, अंतर, टाइमिंग आणि कॅलरीज ट्रॅक करण्यासाठी उपयोगी. इंटरव्हल, टेम्पो आणि लॉन्ग रनचे नियोजन सोपे होते. **वॉटर बॉटल (२००-३०मीली):** हातात धरून धावताना दर १०-२० मिनिटांनी पाणी पिणे सोपे. शरीरातील पाण्याचे संतुलन राखते. **वेस्ट पाउच:** कमरेला लावून जेल, खजूर, सॉल्ट कॅप्सूल, चावी, मोबाईल ठेवता येतात. **हायड्रेशन बेल्ट/बॅकपॅक:** लांब धावांसाठी उपयोगी. नळीद्वारे थेट पाणी पिता येते. उन्हाळा आणि ट्रेल रनमध्ये विशेष महत्त्वाचे. **कॅप आणि सनग्लासेस:** उन्हात डोळे व चेहरा संरक्षित ठेवतात. पावसाळ्यात वॉटर-रेझिस्टंट कॅप चांगली. **कंप्रेशन स्लीव्हस/नी सपोर्ट :** स्नायूंना सपोर्ट, थकवा कमी आणि रिकव्हरीमध्ये मदत. **फोम रोलर आणि मसाज बॉल :** वर्कआउटनंतर स्नायूंचा कडकपणा कमी, इजा टाळण्यास मदत. **चेस्ट स्ट्रॅप :** अचूक हार्ट रेट माहिती मिळवण्यासाठी उपयुक्त. **हेडफोन :** संगीत किंवा पॉडकास्टसाठी, परंतु बाहेरचे आवाज ऐकू येणारे सुरक्षित मॉडेलच वापरावेत. **मसाजर/व्हायबरेटर:** घरच्या घरी रिकव्हरीसाठी उपयुक्त, शरीराला लवकर आराम मिळतो.

योग्य गियर्स म्हणजे फक्त स्टाईल नव्हे, तर सुरक्षित आणि प्रगतीशील धावण्याची पायाभूत गरज. आपल्या शारीरिक आवश्यकता आणि धावण्याच्या पातळीनुसार गियर्स निवडणे हेच यशस्वी धावपटूचे खरे सामर्थ्य आहे.

**- अतिश शहा**

फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर चॅलेंजर स्पोर्ट्स फाऊंडेशन, सोलापूर. संपर्क - ९१७५८२८२०३

# ऑस्ट्रेलियाची विजयी मालिका खंडित

## बॉक्सिंग डे कसोटीत इंग्लंडचा ४ गड्यांनी विजय

### १५ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियात विजयी पताका




**मेलबर्न, २७ डिसेंबर -**

मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड (एमसीजी) येथे झालेल्या चौथ्या ॲशेस कसोटी क्रिकेट सामन्यात इंग्लंडने दुसऱ्या दिवशी गड्यांनी विजय मिळवत ऑस्ट्रेलियातील १८ सामन्यांची विजयी मालिका संपवली. इंग्लंडने मालिकेतील पहिले तीन कसोटी सामने गमावले होते. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला अवघ्या ११ दिवसांत ॲशेस कायम राखता आली. तथापि, इंग्लंडने चौथी कसोटी दोन दिवसांत जिंकून ऑस्ट्रेलियाच्या क्लीन स्वीपच्या आशा धुळीस मिळवल्या.

सामनावीर इंग्लंडचा जॉश टंग ठरला. त्याने या सामन्यात एकूण ७ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाने घरच्या मैदानावर पहिला सामना दोन दिवसांत जिंकला. १२९ वर्षांत पहिल्यांदाच मालिकेतील दोन सामने दोन दिवसांत संपले आहेत. इंग्लंडने शेवटचा ऑस्ट्रेलियात सामना २०१०-११ च्या मालिकेत जिंकला होता, जेव्हा त्यांनी मालिका ३-१ अशी जिंकली होती. चौथ्या कसोटीत पहिल्या डावात १५२ धावा काढणाऱ्या ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात १३२ धावा करून इंग्लंडसमोर १७५ धावांचे लक्ष्य ठेवले. पहिल्या डावात ११० धावांवर बाद झालेल्या इंग्लंडने सहा बाद १७८ धावा केल्या आणि विजयाची मोहर उमटवली. दोन दिवसात ३६ गडी बाद बेगवान गोलंदाजांनी एमसीजीच्या खेळपट्टीवर वर्चस्व गाजवले. पहिल्या दिवशी २० आणि दुसऱ्या दिवशी १६ गडी बाद झाले. सामन्याच्या सहाव्या सत्रात इंग्लंडने विजय मिळवला. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडने आक्रमक सुरुवात केली. पहिल्या १० षटकांत त्यांनी २ बाद ७० धावा केल्या होत्या, त्यानंतर बेन डकेट (३४) आणि तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या ब्रायडन कार्स (६) यांचे बळी पडले. स्कॉट बोलँडने जॅक क्रॉली (३७) आणि जेकब बेथेल (४०) यांना बाद केले. दोघांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

क्रॉलीने डकेटसोबत पहिल्या गड्यासाठी ५१ आणि बेथेलसोबत तिसऱ्या गड्यासाठी ४७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. जो रूट (१५) आणि स्टोक्स (२) स्वस्तात बाद झाले, त्यानंतर जॅमी स्मिथ (नाबाद ३) आणि हॅरी ब्रूक (नाबाद १८) यांनी इंग्लंडला लक्ष्य गाठून दिले. ४ जानेवारीपासून सिडनी येथे सुरू होणाऱ्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीपूर्वी इंग्लंडने मनोबल वाढवणारा विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाकडून मिशेल स्टार्क, झाय रिचर्डसन आणि बोलँड यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. या सामन्यात एकाही फिरकीपटूने गोलंदाजी केली नाही.



# महाराष्ट्र कुमार खो खो संघाच्या स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरास सोलापुरात सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

महाराष्ट्र कुमार खो खो संघाच्या स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरास जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर महाराष्ट्राचे मुख्य प्रशिक्षक मोहन रजपूत व सहाय्यक प्रशिक्षक सुजीत माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशन यांच्या मान्यतेने किरण स्पोर्ट्स क्लबने हे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य अंबादास पांढरे, असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, तांत्रिक समितीचे प्रमुख शिवशंकर राठोड, क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण कोळी, राष्ट्रीय खेळाडू अर्जुन पवार व गणेश पवार, क्रीडा संचालक अशोक पाटील, वेळापूरचे उपसरपंच जावेद मुलाणी आदी उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

मुली गटाचे प्रशिक्षण शिबिर धाराशिव या ठिकाणी सुरु असून या शिबिरानंतर दोन्ही संघ ३१ डिसेंबर, २०२५ ते ४ जानेवारी, २०२६ या कालावधीत बंगळुरू, कर्नाटक येथे होणाऱ्या ४४व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

# दुहेरीत भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना यांना विजेतेपद

### जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धा : भारताच्या वैदेही चौधरी व मिचिका ओझेकी यांच्यात अंतिम लढत




**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, २७ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन(एसडीएलटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जाम श्री-इलिझियम सोलापूर ओपन २०२५ म हिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत वैदेही चौधरी, जपानच्या मिचिका ओझेकी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीत भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना यांनी विजेतेपद संपादन केले.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये एकेरीत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात सहाव्या मानांकित भारताच्या वैदेही चौधरी हिने आठव्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकरचा ६-४, ६-२ असा सहज पराभव करून अंतिम फेरी गाठली. हा सामना १तास ३मि निटे चालला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या चुरशीच्या सामन्यात जपानच्या मिचिका ओझेकी हिने भारताच्या दुसऱ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिपतीचा ४-६, ६-४, ६-४ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. हा सामना १तास ५३मिनिटे चालला दुहेरीत अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना या जोडीने भारताच्या झील देसाई व रशियाच्या एलिना नेपली यांचा ४-६, ७-५, १०-६ असा पराभव करून विजेतेपद संपादन केले. स्पर्धेतील दुहेरीतील विजेत्या जोडीला करंडक व आयटीएफ गुण देण्यात आले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ सुहासिनी शहा, डॉ शंतनू गांधी, एमएसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई, नितीन कन्नमवार यांच्या हस्ते करण्यात आले.



# ज.रा.चंडक प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

बाळे येथील ज. रा.चंडक प्रशालेत वार्षिक क्रीडा महोत्सवास सुरवात झाली. याचे उद्घाटन वैद्यमापन अधिकारी प्रतीक शिंदे यांच्या मैदानाचे पूजन व बाळेचे केंद्रप्रमुख जीवराज खोबरे यांच्या हस्ते आकाशामध्ये फुगे सोडून झाले. यावेळी शालेय राष्ट्रीय खेळाडू श्री लिगाडे बंधू व इतर राज्यस्तरीय खेळाडू यांनी ज्योत आणून प्रमुख पाहुण्यांना दिले त्यानंतर सर्व खेळाडूंना शपथ देण्यात आली. या वेळी प्रमुख उपस्थिती ज. रा. चंडक प्रशालेचे मुख्याध्यापक मोहनराव घोडके, इंदिरा प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकरराव मुळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन. डी. दळवी यांनी केले. क्रीडा शिक्षक दशरथ गुरव यांनी आभार केले.

# योगासन स्पर्धेत पद्मश्री सुमतीबाई स्कूलची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

न्.म.वि प्राथमिक शाळा येथे झालेल्या खुल्या जिल्हा योगासन स्पर्धेमध्ये पी.एस. इंग्लिश मिडियमच्या विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण करून यश संपादन केले. तसेच सर्वाधिक सहभागी स्पर्धक असल्याने शाळेला सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सर्वांना प्रशिक्षक योगशिक्षक रोहन घाडगे, क्रीडा शिक्षक अजित पाटील व सोमनाथ मगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, प्रायमरी पर्यवेक्षक कल्पना रमावत, प्री प्रायमरी समन्वयक अर्चना अक्कलकोटे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले खेळाडू :** बालगट : देवेन बारडकर (द्वितीय), श्रीजा पानशेट्टी (तृतीय). पहिली/दुसरी : श्रेया हारके (उत्तेजनार्थ). नववी/दहावी : ओम तुळशेट्टी (तृतीय). प्रशिक्षक : २५ ते ३५ पुरुष : सोमनाथ मगर (प्रथम).



# सब-जुनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी सोलापूरचे पाच खेळाडू

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सब-जुनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी सोलापूरच्या मृण्मयी गायकवाड (ऑर्किड स्कूल), आराध्या जाधव (राज मेमोरियल), नेत्रा मगर (सिंहगड स्कूल), अजिंक्य वसपटे (ठोकळ प्रशाला), रुद्रप्रताप चव्हाण (लिटल फ्लॉवर स्कूल) पाच खेळाडूंची निवड झाली.

मलकापूर (बुलढाणा) येथे झालेल्या निवड चाचणीतून त्यांची निवड झाली. भुवनेश्वर, ओडीसा येथे सुरू झालेल्या स्पर्धेत ते सहभागी झाले. त्यांचा सोलापूर रेल्वे स्टेशन व्यवस्थापक ए. के. श्रीवास्तव यांनी सत्कार करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांना सुधीर सालगुडे, महेश झांबरे, शिवाजी वसपटे, पूजा सालगुडे, बालाजी केदार चंद्रकांत वाघमोडे, प्रशांत केदार,गणेश बंडगर यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्रा. संतोष गवळी, राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई, सहसचिव, शिवाजी वसपटे यांनी अभिनंदन केले.

# माशाळे नगर ए.जी. कराटे क्लासचा पाचवा वर्धापन दिन उत्साहात




**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**


असोसिएशन ऑफ जीत कुने डो म र्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर संचलित माशाळे नगर येथील ए.जी. कराटे क्लासचा पाचवा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

सुंदर मल्टीपर्पज हॉल नेहरूनगर येथे सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, ग्रॅन्डमास्टर युवराज गायकवाड, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, उद्योगपती यशवंत इंगळे, आशा इंगळे, वसुंधरा कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मारुती घटेवाड, अपुर्वा, टेक्निकल डायरेक्टर किशोर चंदनशिवे, भास्कर देडे, आनंद जाधव, सम्राट गायकवाड, अनुराग देडे, नागेश कांबळे, संदीप गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोलापूर जिल्हा क्रीडा आदर्श विद्यार्थी पुरस्कार सावनी वासुदेव पात्रुडकर व निर्मय अमोल देगावंकर यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच या वर्षी पार पडलेल्या जिल्हा, राज्य तसेच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय जीत कुने डो स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख तथा माशाळे नगर कराटे क्लासचे प्रमुख अभिजीत गायकवाड, प्रशिक्षिका वैभवी दळवी, किमया सपाटे, मोनिका गायकवाड, शिशुपाल चंदनशिवे, विश्वजीत गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण सदरखेडे यांनी केले. पालक संजयकुमार वाघमारे यांनी सर्व प्रशिक्षक, मार्गदर्शक व पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



अवनीश गरड



रुद्र लटके

## कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूरची भंडारी अकादमीवर मात

**सोलापूर -** अवनीश गरड व रुद्र लटकेच्या शानदार अरधशतकाच्या जोरावर मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत पंढरपूरच्या कर्मयोगी विद्यानिकेतनने जुळे सोलापूरच्या भंडारी क्लबवर ९२ धावांनी मात केली. अवनीश सामन्याचा मानकरी ठरला. संक्षिप्त धावफलक : केवीपी ४० षटकात ५ बाद २६२ ( अवनीश गरड ८४, रुद्र लटके ५२, वैष्णवी पडनूर १-९) वि.वि. भंडारी क्रिकेट अकॅडमी : ४० षटकात ९ बाद १७३( आध्या पाटील ४५, धावा केले. अवनीश गरड ४-२६)

# किशोर व किशोरी गटात धाराशिव उपांत्य फेरीत

## ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा

### सोलापूरच्या किशोरींचाही उपांत्य फेरीत प्रवेश



**मुंबई, दि. २७ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो असोसिएशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वी किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे दणक्यात सुरु असून या स्पर्धेत किशोर गटात धाराशिव विरुद्ध सातारा आणि ठाणे विरुद्ध पुणे, तर किशोरी गटात सोलापूर विरुद्ध ठाणे आणि धाराशिव विरुद्ध सांगली अशा अंगावर शहारे आणणाऱ्या लढती आता उपांत्य फेरीत रंगणार आहेत.

**धाराशिवचा दुहेरी धमाका: नाशिक आणि अहिल्यानगरचा धुव्वा!**

धाराशिवच्या किशोर आणि किशोरी दोन्ही संघांनी मैदानावर अक्षरशः वादळ निर्माण केले. किशोरी गटात धाराशिवने नाशिकचा ३४-१५ असा १९ गुणांनी धुव्वा उडवला. धाराशिवच्या आरोही पाटील (नाबाद २.२० मि. व २.५० मि. संरक्षण, ४ गुण) आणि ईश्वरी सुतार (२ मि. संरक्षण, ६ गुण) यांनी विजयाचा पाया रचला; तर नाशिकच्या गायत्री पेंढार (२.१० मि. व १.४० मि. संरक्षण, २ गुण) आणि संभावी शिंदे (१.३० मि. व १.४० मि. संरक्षण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. किशोरांच्या गटात धाराशिवने अहिल्यानगरला एक डाव ७ गुणांनी (२५-१८) लोळवले. धाराशिवच्या प्रफुल वसावे (३.१० मि. संरक्षण, २ गुण) आणि सुरज काकडे (१ मि. नाबाद व ०.४० मि. संरक्षण, ८ गुण) यांनी जबरदस्त खेळ केला, तर अहिल्यानगरकडून सुमित राठोड (१ मि. संरक्षण, ४ गुण) एकाकी लढला.

**सोलापूरची जालन्याला धोबीपछाड; किशोरी गटात सोलापूर सुसाट**

किशोरी गटामध्ये सोलापूरने जालन्याला सावरून घेण्याची संधीच दिली नाही. धारदार आक्रमण आणि अभेद्य संरक्षणाच्या जोरावर सोलापूरने २८-०५ असा एक डाव २३ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. सोलापूरच्या रिया चव्हाण (६.३० मि. संरक्षण, ४ गुण) आणि श्रेया यलमार (५.१० मि. संरक्षण) यांनी मैदानावर आपली छाप सोडली. जालना संघाकडून समीक्षा बिन्नीवाले (१ मि. संरक्षण, २ गुण) आणि पायल घुगिंगे (२.१० मि. संरक्षण) यांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण सोलापूरच्या वेगापुढे त्यांचा निभाव लागला नाही.

अन्य निकालात पुण्याने सांगलीवर २८-२० अशा फरकाने ५ गुणांनी विजय साकारला. दुसऱ्या सामन्यात साताऱ्याने रत्नागिरीचा एक डाव २९ गुणांनी (३७-०८) हा सामना खिशात घातला. ठाण्याच्या किशोर आणि किशोरी दोन्ही संघांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. किशोरी गटात ठाण्याने पुण्याचा २७-१९ असा ८ गुणांनी पराभव केला, दुसरीकडे, किशोर गटात ठाण्याने सोलापूरचा १.५० मि. राखून ८ गुणांनी धुव्वा उडवला. ठाण्याकडून आरु गटेल (२ मि. नाबाद व १.२० मि. संरक्षण), गणेश राठोड (नाबाद १.३० मि. व १.१० मि. संरक्षण, ४ गुण) आणि आर्यन मुळीक (१.३० मि. संरक्षण, ४ गुण) यांनी चमक दाखवली, तर सोलापूरच्या यश कदम (१.१० मि. संरक्षण, ८ गुण) आणि सार्थक (१.१५ मि. व नाबाद १ मि. संरक्षण, २ गुण) यांचा प्रतिकार कमी पडला.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### व्हॉईस ऑफ मीडिया सोलापूर जिल्हा सचिवपदी ओंकार हिंगमिरे

**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

बार्शी लाईव्हचे कार्यकारी संपादक ओंकार हिंगमिरे यांची व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या सोलापूर जिल्हा सचिवपदी निवड झाली आहे. ही निवड सोलापूर येथे झालेल्या संघटनेच्या महत्त्वपूर्ण बैठकीत जाहीर करण्यात आली. यावेळी संघटनेचे संस्थापक संदीप काळे, प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, पत्रकार अभय दिवाणजी, दैनिक 'तरुण भारत'चे संपादक प्रशांत माने यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. परखड लेखनशैली, निर्भीड प्रश्न मांडण्याची क्षमता आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य ओंकार करत आहेत. बार्शी शहरासह परिसरातील अनेक समस्यांवर त्यांनी पत्रकार म्हणून ठाम भूमिका घेतली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेश उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ यांच्या मार्गदर्शनाखाली ओंकार हिंगमिरे यांची सोलापूर जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली असून, त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील पत्रकारितेला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



### कासेगाव येथील प्राथमिक उपकेंद्राकडे जाणारा रस्ता खुला करा

**कासेगाव,दि.२७ डिसेंबर-**

कासेगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राकडे जाणारा रस्ता हा आतापर्यंत खासगी मालकीच्या जागेतून वापरात येत होता. परंतु त्या घरमालकाने नवीन घराचे बांधकाम चालू केल्याने आरोग्य केंद्राकडे जाणारा पर्यायी रस्ता बंद झाल्याने रुग्णांची व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे संबधित आरोग्य उपकेंद्राला मूळ रस्ता विठ्ठल मंदिर पासून साधारणपणे ५०० फुट लांब अंतराचा रस्ता नकाशांमध्ये उपलब्ध आहे. परंतु तो रस्ता सद्य परीस्थितीत रुग्णालयाकडे वापरात नव्हता व संबधित रस्त्याची पाहणी आज सरपंच व ग्रामस्थांच्या टीमने केली. संबधित रस्त्यावर काही नागरिकांनी विनंती केली असता त्यांनी संबधित रस्ता करण्यास अडथळा निर्माण केला आहे. त्यामुळे रात्री अपरात्री येणाऱ्या रुग्णांना व शासकीय कर्मचाऱ्यांना अडचण निर्माण झाली आहे. संबधित रस्त्याचे कामासाठी पूर्वी निधी मंजूर झाला होता व त्यापैकी ५० मीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. परंतु अतिक्रमणामुळे हा रस्ता प्रलंबित राहिला आहे. तरी संबधित अतिक्रमण धारकांवर योग्य ती शासकीय कार्यवाही करून प्राथमिक आरोग्य केंद्राला जाणारा रस्ता खुला करून मिळावा असे निवेदनात सरपंच यशपाल वाडकर यांनी म्हटले आहे.

**ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन**

## निधन वृत्त...

### अलका शेटे



**पंढरपूर, दि.२७ डिसेंबर -**

येथील बेदाणा व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष व पंढरपूर मर्चंट बँकेचे माजी संचालक आनंद शेटे यांच्या मातोश्री अलका शशिकांत (मुनिअप्पा) शेटे (वय ७३) यांचे शनिवार (दि.२७) दुपारी येळे वस्ती (विठाई नगर) येथील राहते घरी अकस्मित निधन झाले. येथील गोपाळपूर रस्त्यावरील लिंगायत स्मशानभुमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा सातारा जिल्हा न्यायाधिश अमित शशिकांत शेटे व सांगोल्यातील मुलगी अंजली अशांक चांदणे यांचेसह सुना, नातू, नाती असा मोठा परिवार आहे.

### पार्वती भिंगे



**अकलूज, दि. २७ डिसेंबर-**

श्रीमती पार्वती शिवदास भिंगे (वय९४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. निवृत्त मंडल अधिकारी दत्तात्रय भिंगे यांच्या त्या मातोश्री होत. श्रीमती पार्वती भिंगे या नृसिंह भजनी मंडळाच्या संस्थापिका होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.

### शिवराम गोटीपामुल



**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सागर चौक, विडी घरकुल येथील रहिवासी श्री शिवराम अंबाजी गोटीपामुल यांचे दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता आकस्मित निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी, सून नातवंडे असा परिवार आहे.

### नारायण सुळे



**पिलीव, दि. २७ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव गावचे माजी उपसरपंच नारायण ज्ञानू सुळे (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### लक्ष्मण खुर्द



**पिलीव, दि.२७ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव (जरगवस्ती) येथील जेष्ठ नागरिक लक्ष्मण आप्पा खुर्द यांचे वृद्धापकाळाने निधन झाले ते ९० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे परतवंडे असा परिवार आहे. नागरी आघाडीचे सचिव अजय खुर्द यांचे ते आजोबा होते.

### बलभीम धावणे



**नरखेड, दि. २७ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथील बलभीम शंकर धावणे(८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. हनुमंत धावणे यांचे ते वडील होत.

# पंढरपुरातील सराईत गुन्हेगारांची टोळी जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ डिसेंबर-**

पंढरपुर शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे अभिलेखावरील सहा सराईत गुन्हेगारांची टोळी एक वर्षासाठी संपुर्ण सोलापुर जिल्हयातुन हददपार करण्यात आल्याची माहिती येथील शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली.

हद्दपारीच्या या कारवाई संदर्भात माहिती देताना पोलिस निरीक्षक घोडके यांनी सांगितले की, शहर पोलीस ठाणे हद्दीतील शरीराविषयीचे गंभीर गुन्हे करणारे टोळीतील सराईत गुन्हेगार आणि टोळी प्रमुख राजेंद्र उर्फ डॅनी गौतम कावरे (रा. हनुमान मैदानाजवळ, जुन्या कोर्टाचे पाठीमागे, पंढरपूर) याच्यासह दर्शन उर्फ कौस्तुभ संतोष बंडगर (रा. धुंडा महाराज मठासमोर, पंढरपुर), पवन अनिल आधटराव (रा. मटण मार्केटजवळ पंढरपुर), कार्तिक नागेश सुरवसे ( रा.धुंडा महाराज मठासमोर, पंढरपुर) अक्षय हरीभाऊ गवळी उर्फ अक्षय जुमाळे (रा. हनुमान मैदान पंढरपुर), ओम उर्फ ओके गणेश कोळी उर्फ जाधव (रा. गांविदपुरा पंढरपुर सध्या रा. शिवाजीनगर, जळगाव) या सहा जणांविरूध्द दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्यामुळे हद्दपारीचा प्रस्ताव तयार करुन हद्दपारीचे कारवाईबाबत वरिष्ठांना अहवाल सादर केला होता. दरम्यान अहवाला नुसार येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी हद्दपार करणेच्या संदर्भातील काम चालवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचेकडे सादर केला होता. जिल्हा प्रमुखांच्या आदेशान्वये राजेंद्र उर्फ डॅनी गौतम कावरे, (टोळी प्रमुख), दर्शन उर्फ कौस्तुभसंतोष बंडगर (टोळी सदस्य) पवन अनिल आधटराव (टोळी सदस्य), कार्तिक नागेश सुरवसे (टोळी सदस्य), अक्षय हरीभाउ गवळी उर्फ अक्षय जुमाळे आणि ओम उर्फ ओके गणेश कोळी उर्फ जाधव यांना ताब्यात घेवून संपुर्ण सोलापूर जिल्ह्यातून एक वर्षासाठीच्या हद्दपारीचे आदेश बजावण्यात आल्याचेही घोडके यांनी सांगितले.



### यांनी पार पाडली हद्दपारीची ही कामगिरी

दरम्यान वरील हद्दपारीची कामगिरी ही सर्व वरिष्ठ आधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि आशिष कांबळे, सपोफौ, कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे तसेच पोहवा सिरमा गोडसे, प्रसाद औटी, विठठल विभुते, शहाजी मंडले, कपिल माने, बजरंग बिचकुले, दिपक नवले, पोकॉ दिगंबर भंडरवाड, पोकॉ अनिस शेख यांनी केली आहे.

### एक वर्ष कालावधीसाठी हद्दपार

दरम्यान हद्दपारीच्या या आदेशान्वये वरील टोळी प्रमुख व इतर सदस्यांना संपुर्ण सोलापूर जिल्हयातुन एक वर्ष कालावधीकरीता हददपार करण्यात आले असुन यापुढेही पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे गुन्हे अभिलेखावरील दोन पेक्षा जास्त दाखल गुन्हयातील अवैध वाळुचोरी तसेच शरीराविषयी गुन्हे करणा-या सराईत गुन्हेगारांना हद्दपार करणेसंदर्भातील कामकाज सुरू असल्याची माहिती शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली.

## बार्शीत राजयोग भवनचे उद्घाटन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ डिसेंबर-**

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे ईश्वरीय सेवांच्या स्वर्णिम जयंती महोत्सवासह नव्याने उभारण्यात आलेल्या राजयोग भवनचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय वक्त्या राजयोगिनी ब्र. कु. उषा दीदीजी (माउंट आबू, राजस्थान) यांच्या हस्ते झाले.



यावेळी नामफलकाचे अनावरण आंतरराष्ट्रीय वक्त्या राजयोगिनी उषादीदीजी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर, बीड, धाराशिव जिल्ह्यासह गंगाखेड, नगर, अहमदाबाद व माउंटआबू येथून सुमारे दीड हजार ब्रह्माकुमारीज बंधू-भगिनी उपस्थित होते. याप्रसंगी राजयोग भवन व स्वर्णिम जयंती महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. अध्यक्षपदी राजयोगिनी ब्र. कु. सोमप्रभा दीदी होत्या. स्वागत व सांस्कृतिक सादरीकरण 'समूह स्वागत नृत्या'ने झाले. यावेळी नूतन नगराध्यक्षा तेजस्विनीताई कथले, ब्र. कु. भरतभाई (संयोजक, वैज्ञानिक व अभियांत्रिकी विभाग, माउंट आबू), राजयोगिनी महानंदा दीदी (उदगीर), राजयोगिनी भानू दीदी ( अहमदाबाद), राजयोगिनी गीता दीदीजी (गुजरात), ब्रह्मकुमार बाबुभाईजी (अहमदाबाद), राजयोगिनी सुनीता दीदी (अंबाजोगाई), राजयोगिनी नंदा दीदीजी (लातूर), राजयोगिनी शकू दीदीजी (इट ), ब्र. कु. राजेंद्र भाईजी (मुंबई), विनायकराव पाटील (माजी आमदार), प्रतापभाई शिंदे (सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता), डॉ. औदुंबर पावले, राजू भाईजी (मुरुम) यांची प्रमुख उपस्थिती होती.

बार्शीतील ईश्वरीय सेवेचा ५० वर्षांचा इतिहास अत्यंत गौरवशाली असून, अनेक परीक्षांमधूनही बाबांच्या विशेष मदतीने ही सेवा अखंडपणे पुढे वाढत राहिली आहे. नवीन राजयोग भवन भविष्यात आत्मिक जागृती व सशक्तीकरणाचे केंद्र बनेल, ज्यातून ईश्वरीय सेवांचा विस्तार दिवसेंदिवस वाढत जाईल असे बार्शी सेवा केंद्राच्या संचालिका संगीता दीदी यांनी सांगितले. ब्र. कु. मिताली बहन (संभाजीनगर) व अनिता बहन (बार्शी) यांनी सूत्रसंचालन केले. मोहनभाई यांनी आभार मानले. बार्शीतील नागरिकांचीही उपस्थिती होती.

## नरखेड येथे १३२ केव्ही सबस्टेशनसाठी मंजुरी द्या

### भाजपा नेते संतोष पाटील यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि.२७ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागात बागायती क्षेत्रात व विविध उद्योगधंद्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने विजेची मागणी वाढत आहे. नरखेड येथे ३२ केव्ही महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र विजेची वाढती मागणी लक्षात घेता नरखेड येथे मोहोळ, पुळूज व लांबोटी या ठिकाणी असणाऱ्या टीएचव्ही १३२ केव्ही सबस्टेशनची आवश्यकता असल्याने नरखेड सबस्टेशनला मंजुरी देण्यात यावी अशी मागणी भाजपाचे कार्यकारिणी सदस्य संतोष पाटील यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ अहवाल सादर करण्याचे पत्र संबंधित विभागाला दिले आहे. मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागात असणाऱ्या नरखेडसह या भागातील २५ ते ३० गावाच्या बाजूनी सीना, भोगावती व नागझरी या तीन नद्या वाहतात. नरखेड व भागातील जवळपास २५ ते ३० हजार नागरिकांच्या पाण्याच्या लाईटचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. सध्या बागायत क्षेत्रात वाढ झाल्यामुळे विजेची मागणी वाढलेली आहे. मोहोळ तालुक्यातील विशेषत नरखेड विभागात होल्टेजची समस्या वाढत असल्याने शेतकरी उदासीन झाला आहे. कधी कधी तर हातातोंडाशी आलेली पिके जळून जातात. त्यामुळे येथे १३२ केव्ही सबस्टेशन देण्याची मनागमी आहे. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने सकारत्मकता दर्शवली. त्यानुसार अवर सचिव नितीन सुर्वे यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांना नरखेड येथील १३२ केवी सब स्टेशन मंजूर करण्याबाबत पत्र पाठवले आहे. यावर शासनास तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले असल्याचे संतोष पाटील यांनी सांगितले.



मोहोळ तालुक्यातील नरखेड हा परिसर मागील २५ ते ३० वर्षापासून विविध विकास कामापासून वंचित राहिला असून या भागाच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून सीना भोगावती जोडकालव्याचा प्रकल्प मंजूर होणार असल्याने विजेची मागणी वाढणार आहे. १३२ केव्ही सब स्टेशनसाठी आवश्यक असणाऱ्या साडेबारा एकर जागेची पाहणीही संबंधीत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करून शासनाला सविस्तर अहवाल पाठविला आहे.

**- संतोष पाटील, भाजपा नेते**



## श्रेयशची 'स्कूलबेल' अन् दीक्षाची 'मोबाईल टॉयलेट व्हॅन' ठरली अव्वल

### वळसंगमध्ये ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २७ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे पंचायत समिती व श्री शंकरलिंग प्रशालेच्या संयुक्त विद्यमाने भरवण्यात आलेल्या ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात बोरामणीच्या ग्लेबल व्हिलेजच्या श्रेयश पोतदार याची ऑटोमॅटीक स्कूल बेल व माध्यमिक गटात कुसुरच्या न्यू इंग्लीश स्कुलच्या दिक्षा घाडगेची मोबाईल टॉयलेट व्हॅन फॉर किड्स अव्वल ठरली.

यामधील प्राथमिक शिक्षकांमधून कुसुरच्या न्यू इंग्लिश स्कूलचे अब्दुल कादर इसाक शेख यांच्या ओ एम आर सिस्टीम वेब प या उपकरणास तर माध्यमिक गटातून औज (मंद्रूप) येथील कादरी प्रशालेतील अबुबकर मुस्ताकपाशी पाटील यांच्या क्यूआर कोड या उपकरणासह प्रयोगशाळा सहाय्यक गटातून वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेचे विनोद दुधगी यांच्या गणितीय साहित्य या उपकरणास प्रथम क्रमांक मिळाला.

विज्ञान प्रदर्शनाचा समारोप बक्षीस वितरण सोहळ्याने करण्यात आला. अध्यक्षपदी संचालक विश्वनाथ थळंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, वळसंगचे केंद्र प्रमुख इंद्रजीत पवार, संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, तज्ञ संचालक शिवशरण प्याटी, पंडिताराध्य हिरेमठ यांच्यासह तालुक्यातील विज्ञान शिक्षक उपस्थित होते. प्राचार्य विरेश थळंगे यांनी प्रस्ताविक केले.

प्रदर्शनात प्राथमिक गटातून ८६,माध्यमिक गटातून ६२, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे ६ तर प्रयोगशाळा सहाय्यक मधून एक उपकरण मांडण्यात आले होते. गावातील व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व पालकांनी या प्रदर्शनचा लाभ घेऊन समाधान व्यक्त केले. परीक्षक म्हणून विश्वनाथ चव्हाण, सुशांत गद्दी, अप्पासाहेब राऊत व डॉ. जीवराज कस्तुरे यांनी काम पाहिले.

प्राथमिक गटात ग्लोबल पब्लिक स्कूल बोरामणी मधील श्रेयश ईरण्णा पोतदार याच्या ऑटोमॅटिक स्कूल बेल या उपकणास प्रथम क्रमांक, समीक्षा अर्जुन कुसुरे जीवन विकास प्रशाला भंडारकवठे हिच्या आरोग्य व स्वच्छता या उपकरणास द्वितीय क्रमांक तर बसवराज रविकांत तोळणुरे श्री भगवती गौरीमाता प्रशाला धोत्री याच्या सौर कृषी पंप या उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला आहे . माध्यमिक गटातून दीक्षा लक्ष्मण घाडगे न्यू इंग्लिश स्कूल कुसुरच्या क्लीन हॅबिट ऑन व्हील्स मोबाईल टॉयलेट व्हॅन फॉर किड्स या उपकरणास प्रथम क्रमांक, तेजस्विनी बसवराज ख्याडे श्री शंकरलिंग प्रशाला वळसंग हिच्या बनाना फायबर फ्रॉम पील या उपकरणास द्वितीय क्रमांक तर अर्पिता कृष्णात साळुंखे एस व्ही सी एस प्रशाला बोरामणी हिच्या पेपर टूथ पेस्ट या उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांमधून श्रेयश गुंड, साईगंधा जमादार यांनी शिक्षकांमधून ओम चौधरी व अब्दुल कादर शेख यांनी तर पालकांमधून शिवरुद्र बगले टाकळी यांनी आपल्या मनोगतातून समाधान व्यक्त करून नियोजनाचे कौतुक केले.

विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, प्रा.संतोष शिंदे, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, प्रा.शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा.प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी विनोद दुथगी व सुनिता कुर्ले यांचे सहकार्य लाभले. सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी सूत्रसंचालन केले. संजयकुमार धनशेट्टी यांनी आभार मानले.

## देशभक्ती असते स्वयंसेवकांच्या नसानसात

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - १४**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.
मो.क्र.७५८८२१६५२६

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे मूळ उद्दिष्टच देशाला महासत्ता बनविणे, या देशाला संपन्न व समृद्ध बनविणे हाच आहे. या देशाबद्दल ज्यांच्या मनात भक्ती आहे, प्रेम आहे,आपलेपणा आहे त्याच व्यक्ती देशाला परमवैभवाकडे नेऊ शकतात, म्हणूनच संघाच्या कार्यपद्धतीतून देशभक्त नागरिक घडविण्याचा कायम प्रयत्न केला जातो. संघ स्वयंसेवकांच्या नसानसामध्ये देशभक्ती भरलेली असते.

भारत देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात भारताबद्दल निश्चितच प्रेम आहे, मनात देशभक्तीचा भाव आहे. परंतु अनेकदा एखाद्या घटनेने - प्रसंगाने अथवा वैयक्तिक स्वार्थ जिथे नसेल अशा गोष्टींमध्ये देशभक्तीचा भाव जागृत होतो, म्हणजेच देशभक्तीचा भाव जागृत होण्यासाठी काही प्रसंग घडावे लागतात, काही घटना घडाव्या लागतात. मात्र स्वयंसेवकांच्या बाबतीत तसे होत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करणारे कार्यकर्ते हे नित्य काम करीत असतात, रोज शाखेवर जाऊन एकमेकांना भेटत असतात अथवा समाजामध्ये मिसळून संघाचा विचार अधिकाधिक वृद्धिंगत करीत असतात. या देशाच्या परमवैभवासाठी माझ्या वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मी विचार केला पाहिजे, एखाद्या प्रसंगामध्ये माझे कितीही नुकसान होत असले तरी माझ्या देशाचे हित महत्त्वाचे आहे हा भाव प्रत्यक्ष कृतीतून साकारणारे स्वयंसेवक असतात. देश प्रथम हा भाव स्वयंसेवकाच्या मनामध्ये संघ संस्कारातून रुजलेला असतो, त्यामुळेच अनेकदा संघाचे स्वयंसेवक त्यांच्या कुटुंबामध्ये - मित्रपरिवारामध्ये अथवा त्यांच्या व्यवसाय - नोकरीच्या ठिकाणी वेगळेपणाने उठून दिसतात. तू तर असे वागणारच नाहीस, कारण तू संघ स्वयंसेवक आहेस. असे अनेकदा स्वयंसेवकांना इतर लोक सांगत असतात, यातच समाज हा संघ स्वयंसेवकाला सच्चा देशभक्त म्हणून ओळखत असतो हे लक्षात येते.

आपला देश हा कायम प्रगतीपथावर राहिला पाहिजे, या देशाची अखंडता - या देशातील लोकांची एकात्मता टिकली पाहिजे, या भूमीतील सर्व संत - महापुरुष यांचा आदर राखला गेला पाहिजे अशीच संघ स्वयंसेवकाची भावना असते. तन-मन-धन अर्पूण देशाच्या प्रति असणारी आपली निष्ठा संघ स्वयंसेवक सातत्याने आपल्या कृती - व्यवहारातून दाखवून देत असतात. त्यामुळेच आपल्या देशामध्ये संघ स्वयंसेवक म्हणजे कर्मठ देशभक्त अशीच प्रतिमा तयार झाली आहे. संघाचा स्वयंसेवक हा या प्रतिमेला तडा जाणार नाही याप्रमाणे आपले वर्तन करत असतो. यामुळेच समाजाला संघ स्वयंसेवकाचा मोठा आधार वाटतो.

देशभक्तीचा आदर्श घालून देणाऱ्या संघाच्या चार पिढ्या संस्कार, शिस्त याबरोबरच देशभक्तीसाठी संघ ओळखला जातो. संघाचे स्वयंसेवक हे राष्ट्र प्रथम हा विचार करणारे असतात, अशीच समाजाची धारणा आहे. ही धारणा बनण्यामागे संघ स्वयंसेवकांचा आचार - व्यवहार आहे. आपल्या देशावर कोणत्याही प्रकारचे संकट येऊ देत, त्या संकटाचा सामना स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ बुद्धीने करणारा संघाचा स्वयंसेवक हा समाजामध्ये आदराचे स्थान बाळगून आहे. आपल्या देशाला काय हवे आहे?, मी यासाठी काय करू शकतो?, माझ्या प्रपंचातून वेळ काढून मला यासाठी काय करता येईल?, मी राहतो त्या परिसरामध्ये - माझ्या गावामध्ये कोणत्या समस्या आहेत?, त्या समस्या दूर करण्यासाठी मला काय करता येईल?, प्रसंगी तन-मन व धन देखील अर्पण करुन हा प्रश्न सोडवता येईल का? याचा रोज संघ शाखेवर विचार केला जातो व असा विचार करणारे संघाचे स्वयंसेवक संपूर्ण देशभरात लाखो स्थानी रोज एकत्र जमतात व संघ शाखेवरील क्षण ना क्षण देशाच्या उन्नतीचा विचार करतात. लाखो - कोट्यवधी स्वयंसेवक नित्य देश उन्नतीचा विचार करून काही योजना बनवून त्याप्रमाणे कार्य करीत आहेत, म्हणूनच या देशात दोन लाखाहून अधिक सेवा प्रकल्पाच्या माध्यमातून कोट्यावधी लोकांना मदतच होत आहे. अनेक आपत्ती प्रसंगी स्वयंसेवक प्रशिक्षितांप्रमाणेच तत्परतेने मदतीला धावून जातात हे देखील सातत्याने अनुभवास येत आहे. याचबरोबर या देशाचा कायदा, संविधान, तत्वे, संस्कृती, परंपरा, येथील लोकांच्या भावभावना या सर्वांचा आदर करण्याची संघाच्या स्वयंसेवकांना सवयच लागून गेली आहे. हे सारे करण्यामध्ये आपण काहीतरी वेगळे करत आहोत हा भाव देखील स्वयंसेवकाच्या मनात येत नाही. केवळ आणि केवळ कर्तव्य भावना श्रेष्ठ समजून स्वयंसेवक देशाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यामुळेच समाजाला संघ स्वयंसेवकांच्या देशभक्तीचा प्रत्यय ठायी - ठायी येतो व स्वयंसेवक हा समाजाला आधार वाटायला लागतो. संघ स्वयंसेवक हा या भूमितील समाजाचा व देशाचा आधार ठरावा हीच भावना संघ निर्मात्यांनी कदाचित मनी बाळगली असेल व त्यांनी पाहिलेले स्वप्न आज स्वयंसेवक आपल्या आचार - व्यवहारातून साकार करत आहेत, म्हणूनच भारतीय समाजाला संघ स्वयंसेवकातील संस्कार, शिस्त व देशभक्तीचा भाव कायम प्रभावित करीत करत आला आहे. हाच भाव वृद्धिंगत होण्यासाठी स्वयंसेवकांच्या एकामागून एक पिढ्या गेल्या शंभर वर्षांपासून मनोभावे कार्यरत आहेत.

# तिन्ही पक्षांची विचारधारा वेगळी : ना. भरणे

## दोन माजी महापौरांचा राष्ट्रवादी पक्षात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ डिसेंबर**

तिन्ही पक्षांची विचारधारा वेगळी आहे. युती करायची की नाही हा वरिष्ठ स्तरावरचा निर्णय आहे. यासंदर्भात मी बोलणे उचित ठरणार नाही. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार हे निर्णय घेतील, असे स्पष्ट प्रतिपादन ना.दत्तात्रय भरणे यांनी केले.

सोलापूरचे माजी महापौरद्वय अ‍ॅड.यु. एन.बेरिया, नलिनी चंदेले यांच्यासह माजी नगरसेवक हारुन शेख, परवीन इनामदार, शिवसेना उबाठाचे संघटिका मीनल दास यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात प्रवेश केला. त्यांचे पक्षात स्वागत करताना ते बोलत होते.




महापालिका निवडणुकीत सोलापूरकर आमच्या पक्षाच्या सर्वाधिक जागा जिंकून आणतील. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी शेवट दिवशी जाहीर करण्यात येईल. त्यांना तात्काळ एबी फॉर्म देण्यात येतील. सोलापुरात शनिवारी अनेक वर्षे काँग्रेस पक्षात आणि त्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत काम करत असलेल्या काँग्रेसचे माजी महापौर यु.एन.बेरिया व नलिनी चंदेले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादीचे शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार,कार्याध्यक्ष जुबेर बागवान जेष्ठ नेते सुधीर खरटमल,प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे,ज्येष्ठ नेते तौफिक शेख ,चंद्रकांत दायमा ,आनंद मुस्तारे,जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले,वसिम बुऱ्हाण,म कबूल मोहोळकर ,माजी नगरसेविका पूनम गायकवाड ,माजी नगरसेविका तस्लिम शेख, चित्रा कदम ,सायरा शेख,प्रा. श्रीनिवास कोंडी ,जेष्ठ नेते हेमंत चौधरी ,शशिकांत कांबळे,बाबा सालार ,बसवराज बगले,खलील शेख ,अनिल उकरंडे ,अजित बनसोडे ,कलीम तुळजापुरे ,सुजित अवघडे ,साजिद पटेल ,अ‍ॅड.जयप्रकाश भंडारे,अमीर शेख ,बसवराज कोळी ,अनिल बनसोडे ,अल्मेहराज आबादीराजे, मार्तंड शिंगारे ,कुमार जंगडेकर ,संजय सांगळे आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महत्वाचे...



### सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन; 'डॉग शो'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर,दि.२७ डिसेंबर**

श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात आयोजित डॉग शोला दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.तब्बल तीनशेहून अधिक देशी-विदेशी श्वानांचा यामध्ये सहभाग होता.होम मैदान येथे श्री सिद्धेश्वर देवस्थानच्यावतीने दि.२५ ते २९ डिसेंबर दरम्यान आयोजित श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनामध्ये तिसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत डॉग शोचे आयोजन करण्यात आले होते. या शोचे उद्घाटन देवस्थानचे विश्वस्त मल्लिनाथ मसरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री सिद्धेश्वर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष प्रकाश वाले तसेच स्मार्ट एक्सपोचे संचालक सोमनाथ शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.



या प्रदर्शनामध्ये पॉमेडियन,सायबेरियन हस्की, गोल्डन रेट्रीवर जर्मन शेफर्ड, लायब्रीडर,डॉबरमॅन,रॉटविलर,अमेरिकन गुली,ग्रेट डेन,डॉलमेशियन, सीझ्झू, लासाअ‍ॅप्सो, केनकरसो, स्पॅनियल,बीगल, फ्रेंच गोल्डन,बुलडॉग, बॉक्सर,बेल्जियन मलोनोईज,शायर टेरियर,पग, कॉरवॉन हाऊड, मुधोळ हाऊंड, पश्मी हाऊंड या देशी - विदेशी जातींच्या २४ प्रकारच्या श्वानांचा समावेश होता. डॉग शोमध्ये सहभागी या सर्व श्वानांच्या शरीराची ठेवण, डोळे, दात, उंची, केस, रंग, शेपटी, पायांची ठेवण या सर्व बाबींची परीक्षकांकडून तपासणी करण्यात आली. बेस्ट इंडियन ब्रीड,बेस्ट पपी इन शो, बेस्ट ज्युनिअर हँडलर, बेस्ट हँडलर यांची निवड करून त्यांना ट्रॉफी व रोख रक्कम तसेच डॉग फूड बॅगा देण्यात आल्या. या स्पर्धेसाठी पेट्स वर्ल्ड अँड पेट गॅलरी सोलापूरचे आर्यन दळवी, स्वप्ना दळवी, शलवारी श्राफ, महेश माने, अभिजीत कम्पली यांच्यासह संगमेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून पुण्याचे संजय मुथुर तर फॅशन डॉग शो व फॅन्सी डॉग शोचे परीक्षक म्हणून वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. सचिन देशमुख व स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. तृप्ती देशपांडे यांनी काम पाहिले.




### व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमचे अधिवेशन व उर्दू विभागाची स्थापना

**सोलापूर,दि.२७ डिसेंबर -**

सोलापूर व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनलतर्फे सोलापूर येथे फोरमशी संलग्न नवोदित पत्रकारांसाठी एकदिवसीय अधिवेशन व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाचे उद्घाटन दै. सकाळचे माजी संपादक ज्येष्ठ पत्रकार अभय दिवानजी, तरुण भारत समूहाचे वरिष्ठ संपादक प्रशांत माने तसेच पुण्याच्या महिला पत्रकार अश्विनी कोळेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. हॉटेल श्रीभोज येथे झालेल्या या कार्यक्रमात राज्य व जिल्हा पातळीवरील पत्रकार कार्यशाळांच्या आयोजनासोबतच उर्दू विंगची पायाभरणी करण्यात आली. तौफीक नदाफ यांच्या मार्गदर्शखाली झालेल्या या उर्दू विभागच्या बैठकीत जिल्हाध्यक्षपदी वजाहत अ. सतार यांची निवड करण्यात आली. तसेच इक्बाल बागबान, ए. मजीद शेख, आकीब मडकी, मैनोद्दीन नदाफ, , गुफरान इनामदार, समीर आबाजीराजे, सद्दाम शेख यांची निवड करण्यात आली. तसेच मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ पत्रकार अय्यूब अहमद नल्लामंदू व प्रा. डॉ. शफी चोबदार यांची निवड करण्यात आली. या बैठकीस व्हीओएमचे संदीप काळे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत तौफीक नदाफ यांच्या हस्ते अय्यूब अहमद नल्लामंदू, प्रा. डॉ. शफी चोबदार आणि अब्दुल्ला मजीद शेख यांचा फेटा, शाल व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सोलापूर शहर व जिल्ह्यातील पत्रकारांनी उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले. संदीप काळेजी यांनीही सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी उर्दू विंगकडून ज्येष्ठ पत्रकार ''अ. लतीफ नल्लामंदू व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व'' हे पुस्तक महिला पत्रकार अश्विनी कोळेकर व फोरमचे संदीप काळे यांच्या सेवेत ज्येष्ठ पत्रकार अय्यूब अहमद नल्लामंदू यांच्या हस्ते भेट देण्यात आले.

### पत्रकार बळीराम सर्वगोड यांचे अपघाती निधन

**सोलापूर,दि.२७ डिसेंबर -**

ज्येष्ठ पत्रकार बळीराम सर्वगोड यांचे शुकवार रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास ते आपले गावी उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ येथे आपल्या स्प्लेंडर एमएच १३ डीएक्स ७९३१ या दुचाकीवरून जात असताना बाळे पुलावर त्यांना पाठीमागून एमएच १३ सीजी ३०१५ या होंडा स्कुटी या वाहनाने जोराची धडक दिली. होंडा स्कुटीवाले गाडी सोडून तिथून फरार झाले. त्यामुळे या धडकेने त्यांची गाडी पुलावरील डिव्हायडरला जाऊन धडकली. त्यात डोक्याला मार लागून ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणल्यानंतर नातेवाईकांची मोठी गर्दी झाली होती. सर्वगोड यांच्यावर बीबीदारफळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सर्वगोड हे ३० ते ३५ वर्षापासून सोलापुरात पत्रकारिता करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे.



## आजही त्याच किंमतीत जागा देण्यास तयार : कुमार करजगी

### जुनी मील जागेबाबत गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

जुनी मील जागेबाबत काही स्वार्थी राजकीय व बिल्डर मंडळींकडून जाणीवपूर्वक गैरसमज पसरवले जात असून सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप करत ज्या दरात न्यायालयातून जमीन मिळाली, त्याच दरात आजही ती देण्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट करत, प्रलंबित तक्रारींबाबत दोन्ही बाजूंच्या वकिलांमार्फत चर्चा करून न्यायालयात ॲफिडेव्हिट देण्याची तयारी असल्याची माहिती उमा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन डॉ. कुमार करजगी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१९६३ साली जुनी मील कायमस्वरूपी बंद झाल्यानंतर तब्बल १५ हजार कामगार बेरोजगार झाले. न्यायालयात योग्य वेळी क्लेम्स दाखल न झाल्याने कामगारांना त्यांच्या कष्टाचा पैसा मिळाला नाही.या अन्यायाविरोधात १९८८ साली कुमार करजगी यांनी जुनी मील बेकार कामगार व वारसदार संघर्ष समिती स्थापन करून उच्च न्यायालयात लढा उभारला. २५ वर्षांनंतर ९ हजार कामगारांचे क्लेम्स न्यायालयात दाखल करून जुनी मीलच्या जमिन विक्रीतून कामगारांना त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळवून देण्यात ते यशस्वी ठरले. अल्प दरात जमीन बळकावण्याचा काही भांडवलदार व राजकीय मंडळींचा डाव यामुळे उधळून लागला, असा दावा करजगी यांनी केला.

न्यायालयाच्या आदेशानुसार जुनी मीलच्या १ ते ५ लॉटची जमीन उमा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे झाली. त्यानंतर १९९९ साली चिठ्ठी पद्धतीने ७७८ नागरिकांना प्लॉटचे वाटप करण्यात आले असून अनेकांनी घरे बांधून वास्तव्यास सुरुवात केली आहे. मात्र महापालिकेच्या काही आरक्षणांमुळे अद्याप १९२ नागरिकांना बांधकामात अडचणी येत आहेत.ज्या दरात न्यायालयातून जमीन मिळाली, त्याच दरात आजही ती देण्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट करत, प्रलंबित तक्रारींबाबत दोन्ही बाजूंच्या वकिलांमार्फत चर्चा करून न्यायालयात ॲफिडेव्हिट देण्याची तयारी असल्याचे कुमार करजगी यांनी जाहीर केले आहे. दरम्यान, बिल्डर कडून पैसे घेऊन काही लोक विनाकारण वेळोवेळी आरोप करून या कार्यात अडचणी निर्माण करत आहेत. वास्तवात ते सदस्यही नाहीत. खोटी कागदपत्रे तयार करून हे लोक आरोप करतात. त्यांना न्यायालयाने फटकारले आहे. जामिनावर ते बाहेर आहेत, असा आरोप डॉ. कुमार करजगे यांनी यावेळी केला. या पत्रकार परिषदेस केतन शहा, कमल काबरा आदी उपस्थित होते.

## महापालिका निवडणुकीसाठी शनिवारी २९ उमेदवारी अर्ज दाखल



### एकूण ४२२ नामनिर्देशन अर्जांची झाली विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सोलापूर : सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज शनिवारी २९ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. तर एकूण ४२२ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली आहे, अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी दिनांक २३ ते ३० डिसेंबर दरम्यान नामनिर्देशन पत्र देणे आणि स्वीकृती प्रक्रिया आहे. काल शुक्रवारी एकूण सहा नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. आज शनिवारी विविध निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात एकूण २९ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ३५ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण चार दिवसात ३ हजार ३८५ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली आहे.

आज शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी २९ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये निवडणूक अधिकारी-१ एकूण प्राप्त अर्ज-४ (प्रभाग व जागा १अ, ३ब, ३क, ४क), निवडणूक अधिकारी-२एकूण प्राप्त अर्ज-५ - (प्रभाग व जागा ५ अ दोन अर्ज, ६ब, ६ड, १५अ), निवडणूक अधिकारी-३एकूण प्राप्त अर्ज-३

(प्रभाग व जागा ८अ, १४ क, १४ ड), निवडणूक अधिकारी-४ एकूण प्राप्त अर्ज-६ (प्रभाग व जागा १२ब, १२क, १३क दोन अर्ज, १३ ड दोन अर्ज), निवडणूक अधिकारी-५ एकूण प्राप्त अर्ज-३ (प्रभाग व जागा १७ अ, १७ ब, १८ क), निवडणूक अधिकारी-६ एकूण प्राप्त अर्ज-५ (प्रभाग व जागा २० ब, २०क, २० ड, २० क दोन अर्ज),निवडणूक अधिकारी-७ एकूण प्राप्त अर्ज-३ (प्रभाग व जागा २२ ड, २४ड दोन अर्ज). सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया दि. २३ ते ३० डिसेंबर २०२५, अर्ज छाननी दि. ३१ डिसेंबर २०२५ असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत राहणार आहे. दिनांक ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल. याच दिवशी अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. दुसऱ्या दिवशीच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी व निकाल घोषित करण्यात येणार आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

| आज नामनिर्देशन अर्ज विक्रीचा तपशील असा | |
|---|---|
| निवडणूक निर्णय अधिकारी-१ | ५५ |
| निवडणूक निर्णय अधिकारी-२ | ५९ |
| निवडणूक निर्णय अधिकारी-३ | ५८ |
| निवडणूक निर्णय अधिकारी-४ | ६५ |
| निवडणूक निर्णय अधिकारी-५ | ८० |
| निवडणूक निर्णय अधिकारी-६ | २३ |
| निवडणूक निर्णय अधिकारी-७ | ८२ |
| एकूण ४२२ नामनिर्देशन | |

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन आदेश तात्काळ रद्द करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सोलापूर जिल्हयातील खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाचे आदेश तात्काळ रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघाचे जिल्हा अध्यक्ष कल्लप्पा फुलारी यांनी पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांच्याकडे केलेला आहे.

पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी दि.२ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांना आदेश काढल्याने प्राथमिक शिक्षण विभागानी तत्परता दाखवत दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शाळा मान्यतेपासून वैयक्तिक मान्यता सह इतर कागदोपत्रासह माहीती मागवून अशा कर्मचाऱ्यावर समायोजनाची टांगती तलवार ठेवलेली आहे.

समायोजनाचे आदेश काढताना भविष्यात अशा कमचाऱ्यांचे शालार्थ प्रणालीत वेतनाचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे सांगीतले जाते आरटीई कायद्या प्रमाणे खासगी प्राथमिक शाळां संच मान्यतेत शिक्षकेतर पद शुन्य दाखवत असले तरी सदर शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे आरटीई कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी पासून मंजूर असून ते एकाकी पद असल्याने सेवानिवृत्ती नंतर सदर पद आपोआप व्यपगत होणारच आहेत.अशा कर्मचाऱ्यांची वेतनाची जबाबदारी शासनाची असून वेतनाचे प्रश्न फक्त सोलापूर जिल्हयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यासाठीच निर्माण होणे शक्यच नाही.

सध्या महाराष्ट्रात कोणत्याही जिल्हयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाचे आदेश शासन आणि प्रशासनानी निर्गमित केलेले नसताना सोलापूर जिल्हयासाठीच असे आदेश निर्गमित करून मुख्याध्यापक, शाळा आणि अशा कर्मचारी यांना वेठीस धरणे नियमबाहय आणि चुकीचे असून काही कर्मचाऱ्यांचे प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ठ ही आहे.

तेंव्हा शिक्षणउपसंचालक पुणे विभाग पुणे आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी तात्काळ सदर समायोजनाचे आदेश तात्काळ रद्द करून सोलापूर जिल्हयातील अशा खाजगी प्राथमिक शाळा, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना दिलासा द्यावा अशी मागणी शिक्षक महासंघाने निवेदनाद्वारे केलेली आहे.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंड्यात तरुणाविरुद्ध अपहरण व लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

परंडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील २० वर्षीय तरुणीला (नाव व गाव गोपनीय) दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता सुमारास गावातीलच एका तरुणाने दवाखान्यात बोलावून घेतले. त्यानंतर फुल लावण्याचा व लग्नाचे आमिष दाखवून तिला फसवणूक करून लैंगिक अत्याचाराच्या उद्देशाने अज्ञात ठिकाणी डांबून ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या प्रकरणी पीडितेच्या आईने दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी परंडा पोलिस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल (एफआयआर) दाखल केला आहे. त्यावरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम १३७, १३८, ८७, १२८, ६४ व ३५१ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### येणेगुर जि.प. शाळा व्यवस्थापन समितीची नवी कार्यकारिणी जाहीर

**उमरगा, दि.२७ डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी ज्ञानेश्वर माने तर उपाध्यक्षपदी प्रतीक्षा गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. समितीच्या सदस्य म्हणून नवनाथ ईगवे, इस्माईल मुल्ला, सोनाक्षी परबळकर व उषा जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीनंतर केंद्र प्रमुख ए.एन. कोकळगावे व शाळेचे मुख्याध्यापक सी.जी. पाटील यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व विकासात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### विठ्ठलसाई साखर कारखान्यात कष्टकरी कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**मुरूम, दि.२७ डिसेंबर -**

मुरूम येथील विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कष्टकरी ऊसतोड कामगार, वाहन चालक तसेच कारखान्यातील कर्मचारी व विविध विभागातील अधिकाऱ्यांसाठी दि.२६ डिसेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मुरूम ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने आरोग्य तपासणीचे काम पाहिले. याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाळे तसेच विठ्ठलसाई साखर कारखान्याचे संचालक दिलीप भालेराव व कार्यकारी संचालक एस.आर. गवसाने यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात एकूण १२२ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विजय भोसले, रवी लोहार, उमेश लोखंडे, संदीप बाबळसुरे तसेच अमोल अष्टेकर, सुरेश गायकवाड, अतुल राखेलकर, सनगुंदे, एस.पी. मेनसे, आनंद मानळे यांच्यासह सर्व अधिकारी, आरोग्य कर्मचारी व कामगार उपस्थित होते.



### आयएमएतर्फे रुग्णांसाठी शुद्ध पाणी सुविधा केंद्राचा शुभारंभ

**उमरगा, दि.२७ डिसेंबर -**

येथील इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) उमरगा शाखेच्या वतीने शहरातील आरोग्य नगरी परिसरात पोफळे रुग्णालयाच्या शेजारी रुग्णांसाठी शुद्ध व फिल्टर पाणी सुविधा केंद्राचा शुभारंभ गुरुवारी करण्यात आला. या सुविधा केंद्राचे उद्घाटन पत्रकार अविनाश काळे व नारायण गोस्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ डॉ. चंद्रकांत महाजन अध्यक्षस्थानी होते. आयएमए उमरगा शाखेचे अध्यक्ष डॉ. अनंत मुगळे, सचिव डॉ. नामदेव बिराजदार, डॉ. विजय पाटील, डॉ. उदय मोरे, डॉ. सुभाष येळापूरे, डॉ. सुभाष वाघमोडे, डॉ.डी.ए. थिटे, डॉ. बाबरे, डॉ. विजय बेडदुर्गे, डॉ. सतीश नरवडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. कपील महाजन, डॉ. दत्तात्रेय खलंगरे, डॉ. विजय गायकवाड, डॉ. राजकुमार कानडे, डॉ. अजीत शिंदे, डॉ. अभय शिंदे, डॉ. सिद्राम ख्याडे, डॉ. बुटुकणे, डॉ. सागर पतंगे, डॉ. निलेश महामुनी, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष नितीन होळे, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे, सचिव प्रा. जोशी, प्रा. सोमशंकर महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.



### बेलवाडी जि.प. शाळेत बाल कौशल्य विकास आनंद मेळावा

**लोहारा, दि.२७ डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंददायी शनिवार उपक्रम ांतर्गत बाल कौशल्य विकास आनंदमेळावा उत्साहात पार पडला. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मेळाव्यात सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून खरेदी-विक्री, नफा-तोटा व व्यवहारिक ज्ञानाचा अनुभव घेतला. पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी स्टॉलना भेट देत मेळाव्याचा आनंद लुटला. खेळांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. या आनंदमेळाव्यातून सुमारे ३,५०० रुपयांची उलाढाल झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पीक विमा योजनेतील १२,३५३ अर्जांबाबत तालुकास्तरीय छाननीचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरीप हंगाम २०२५ अंतर्गत जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा समिती व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची संयुक्त बैठक नुकतीच पार पडली.

या बैठकीत पीक विमा अर्जांची स्वीकृती, पात्रता-अपात्रता, विमा कंपनीकडून नोंदविण्यात आलेले आक्षेप तसेच शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सुकाणू समितीने यापूर्वी घेतलेले निर्णय जिल्हास्तरीय समितीने कायम ठेवले.



बैठकीदरम्यान जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विमा कंपनीकडून रद्द करण्यात आलेल्या १२ हजार ३५३ पीक विमा अर्जांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक प्रकरणांमध्ये विमा कंपनीने घेतलेले आक्षेप तांत्रिक व तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे असल्याचे निदर्शनास आले.

यावर जिल्हाधिकारी पूजार यांनी अपात्र ठरविण्यात आलेल्या सर्व अर्जांची शेतकरीनिहाय व कारणनिहाय माहिती संबंधित तालुकास्तरीय समितींना तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तसेच तालुकास्तरीय समितीने सात दिवसांच्या आत सखोल छाननी करून अहवाल जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावा, असे निर्देश दिले.

छाननीदरम्यान विमा कंपनीकडून चुकीचे किंवा अन्यायकारक आक्षेप घेतल्याचे आढळल्यास संबंधित विमा कंपनीविरुद्ध प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

तसेच रद्द करण्यात आलेल्या अर्जांमध्ये त्रुटी पूर्तता करून शेतकऱ्यांना पुन्हा योजनेत सहभागी होण्याची संधी देण्यासाठी विमा कंपनीने योग्य ती कार्यवाही करावी, असे आदेश देण्यात आले.

दरम्यान, विमा कंपनीकडून रिव्हर्ट (परत) आलेल्या अर्जांबाबतही चर्चा झाली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्र चालकांना रिव्हर्ट अर्जांची तातडीने पूर्तता करून ते विहित कालमर्यादेत पुन्हा सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. केवळ तांत्रिक कारणांमुळे शेतकऱ्यांचे अर्ज अपात्र ठरू नयेत, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले.

## धाराशिव व कळंब पोलिसांची जुगारविरोधी कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**



आनंदनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगारविरोधी कारवाई करत पोलिसांनी दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता नगरपालिकेसमोरील रोडलगत छापा टाकला. या कारवाईत सय्यद सादिक मोरामोईद्दीन (वय ५१, रा. सांजा वेस गल्ली, धाराशिव ता. जि. धाराशिव) हा व्यक्ती कल्याण मटका जुगाराचे साहित्य व ८५० रुपये रोख रक्कम स्वतःकडे बाळगताना आढळून आला.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करून संबंधित व्यक्तीविरुद्ध आनंदनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

तर कळंब पोलिस ठाण्याच्या हद्दीतही जुगारविरोधी कारवाई करण्यात आली. दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३.१० वाजता मोहा येथे दर्ग्याच्या पाठीमागील बाजूस छापा टाकण्यात आला. या वेळी रोहिणी सुनिल शिंदे (वय २१, रा. गोलेगाव ता. भूम जि. धाराशिव, सध्या रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव) हा व्यक्ती सुरट मटका जुगाराचे साहित्य व १,२१५ रुपये रोख रक्कम स्वतः कडे बाळगताना आढळून आला.

कळंब पोलिसांनी जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करून संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये कळंब पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## कळंब तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग २३६ ची दयनीय अवस्था; ग्रामस्थांचा प्रशासनाला इशारा



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील आडसुळवाडी, भोगजी, पिंपळगाव, डोंगरेवाडी, पारा मार्गे अहिल्यानगर-मुंबईकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २३६ ची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून या मार्गावरून जाताना अक्षरशः कसरत करावी लागत आहे.

विशेष म्हणजे हा राष्ट्रीय महामार्ग लातूर-तांदुळजा-शिराढोण-कळंब-आडसुळवाडी-भोगजी-पिंपळगाव-डोंगरेवाडी-पारा या मार्गाने अहिल्यानगर व पुढे मुंबईकडे जाणारा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे रस्ते प्रकल्प उपविभागीय अधिकारी यांनी तातडीने लक्ष घालून या महामार्गाची दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक पावले उचलून रस्ता दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते संदीप लांडगे यांनी दिला आहे.

## परंड्यात नगराध्यक्षा नेहा काकडे, नवनिर्वाचित नगरसेवकांचा सुजितसिंह ठाकूर यांच्याकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ डिसेंबर -**

धाराशिव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीच्या नेहा राहुल काकडे यांची विक्रमी मताधिक्याने निवड झाली आहे. यानिमित्त नगराध्यक्ष नेहा काकडे, त्यांचे पती व नवनिर्वाचित नगरसेवक तसेच भाजप युवा मोर्चा धाराशिव जिल्हाध्यक्ष राहुल काकडे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांसह परंडा येथे भाजप नेते मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांची भेट घेतली.

यावेळी परंडा येथील भाजप संपर्क कार्यालयात नगराध्यक्ष नेहा काकडे व नवनिर्वाचित नगरसेवकांचा मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास भाजपाचे अरविंद रगडे, ॲड. जहीर चौधरी, रमेशसिंह परदेशी, समरजीतसिंह ठाकूर, अविनाश विधाते, अजित काकडे, बाबासाहेब जाधव, किरण देशमुख, साहेबराव पाडुळे, तानाजी घोडके, रामदास गुडे, डॉ. आनंद मोरे, धनंजय काळे, रामकृष्ण घोडके, गजानन तिवारी, पांडुरंग मुसळे, अमर ठाकूर, गौरव पाटील, संतोष गायकवाड, सिध्दीक हन्नूरे यांच्यासह अन्य मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वागदरी शिवारात शेतीच्या वादातून महिलेला मारहाण

**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वागदरी शिवारात शेतीच्या वादातून एका महिलेला मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा केला आहे.

आरोपींची नावे जितेंद्र पाटील, रवींद्र पाटील, सुधाकर बिराजदार, ज्योती पाटील व सुनिता पाटील (सर्व रा. वागदरी) अशी आहेत. फिर्यादी पद्मिनीबिराजदार यांच्या फिर्यादीनुसार, दि.२५ डिसेंबर रोजी शेतगट क्र.१२४ मध्ये वागदरी शिवार येथे शेतीच्या वादाच्या कारणावरून आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करत डोळ्यात मिरची पूड टाकून जखमी केले.

## अन्नपूर्णा संस्थेस ५१ हजार रूपयांची मदत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

समाजातील सेवाभावी उपक्रमांना सातत्याने बळ देणारी रोटरी सेवा ट्रस्ट, धाराशिव ही संस्था सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवत विविध सेवाभावी संस्थांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहत आहे. याच परंपरेत अन्नपूर्णा संस्थेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त रोटरी सेवा ट्रस्ट व रोटरी क्लब धाराशिव यांच्या वतीने ५१ हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

सन २०१५ मध्ये सुरू झालेल्या अन्नपूर्णा संस्थेच्या अन्नदान सेवेने दहा वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला असून, या कालावधीत सुमारे १५ लाख गरजूंनी भोजनाचा लाभ घेतला आहे. विशेषतः सिव्हिल हॉस्पिटल, धाराशिव येथील रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांसाठी दररोज ३०० ते ४०० जणांना अन्नदान करण्याचे उल्लेखनीय कार्य संस्था करीत आहे.

धनादेश प्रदान करताना रोटरी क्लब अध्यक्ष रो. रणजित रणदिवे, रो. प्रदीप खामकर, पी.आर. काळे, रो. प्रदीप मुंडे, रो. सुनील गर्जे व रो. कुणाल गांधी उपस्थित होते.

## सिंदफळ येथे सरकारी घंटागाडी जाळली; ६० हजारांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

तुळजापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सिंदफळ गावात ग्राम पंचायतीजवळ उभी असलेली सरकारी घंटागाडी (कचरा संकलन वाहन) क्र. एमएच २५ एजे ५३४४ अज्ञात व्यक्तीने दि.२१ डिसेंबर रोजी पहाटे १२.३० वाजता सुमारास आग लावून जाळल्याची घटना घडली आहे. या आगीत सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी फिर्यादी मनोज उत्तम चौगुले (वय ४३), ग्राम पंचायत अधिकारी, सिंदफळ (ता. तुळजापूर) यांनी दि.२६ डिसेंबर रोजी पोलिस ठाण्यात खबरी अहवाल दाखल केला आहे.




त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.

## डॉ. राघवेंद्र डंबळ यांचा सन्मान कार्यकर्तृत्वाचा पुरस्काराने गौरव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलात भटके व विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. राघवेंद्र डंबळ यांना सन्मान कार्यकर्तृत्वाचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारी सदस्य भैय्याजी जोशी, देवगिरी प्रांताचे संघचालक अनिल भालेराव, पद्मश्री गिरीश प्रभुणे, भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धव काळे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम, कार्यवाह अजय जानराव, तालुका संघचालक अनिल जाधव, डॉ. सुश्रुत डंबळ, भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धव काळे, कोषाध्यक्ष नरेश पोटे, सचिव विवेक आयाचित, संघटन मंत्री राहुल चव्हाण, महादेव गायकवाड, अभय कुलकर्णी, अशोक संकलेच्या, राजाभाऊ गिजरे, रवी नन्नावरे, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, आण्णासाहेब कोल्हटकर आदीसह विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते, सेवाभावी संघटनांचे प्रतिनिधी, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरग्यात दुचाकीस्वाराचा मृत्यु

**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

उमरगा पोलीस ठाणे हद्दीत ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दुसरा दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.

मयताचे नाव आकाश विद्यासागर भुरे (वय २५, रा. केसरजवळगा, ता. उमरगा) असे आहे. आकाश हा दि.१४ डिसेंबर रोजी रात्री ८.३० ते ८.४० च्या सुमारास बुलेट मोटरसायकल (क्र. एमएच २५ बीई २६३०) वरून जात असताना चौरस्ता ते आळंद रोडवरील पेपर मिलजवळ हा अपघात झाला. ट्रॅक्टर क्रमांक एमएच २५ बीएफ चा चालकाने कोणतेही इंडिकेटर किंवा दिशा फलक न लावता ट्रॅक्टर रस्त्यावर उभा केल्याने आकाश भुरे यांची मोटरसायकल ट्रॅक्टरला समोरून धडकली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

## मुरूम नगराध्यक्ष बापुराव पाटील यांचा सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२७ डिसेंबर -**

भारतीय जनता पक्षाचे व मुरूम नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापुराव पाटील यांचा भाजपाचे नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हा सत्कार सोहळा मुरूम येथील पाटील यांच्या निवासस्थानी दि. २६ डिसेंबर रोजी पार पडला.

या प्रसंगी भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील, भाजपाचे लोहारा तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, परंडा नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक रमेशसिंह परदेशी, भाजपाचे लोहारा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, भाजपाचे उमरगा शहराध्यक्ष ड. साईराज टाचले, नगरसेवक व भाजप मुरूम शहराध्यक्ष गणेश अंबर, महालिंग बाबशेट्टी, राजूभाई मुल्ला, उत्कर्ष गायकवाड, काशीनाथ घोडके, महादेव कोरे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, पाटील परिवाराच्या वतीने माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. या आयोजित कार्यक्रमात पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

# सामाजिक बांधिलकी सायकल यात्रा अयोध्येस झाली रवाना



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २७ डिसेंबर :** सामाजिक व राष्ट्रीय एकता आणि संस्कृती जपण्याचे ध्येय आजचा तरूण अहमदपूर सारख्या छोट्या शहरात देखील उराशी बाळगत पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचे महत्व सांगत अहमदपूर ते प्रभू श्रीराम नगरी अयोध्या असा १२०० किलोमीटर सायकलिंग करत एक महत्त्वाचा संदेश घेऊन अहमदपूर ते अयोध्या निघाला.

अहमदपूर सायकलिंग क्लब चे ११ सदस्यांना येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शुभेच्छ्या दिल्या या प्रसंगी पुष्पवृष्टी करण्यात आली. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे या सायकल यात्रेत शेख कुल्ला यांच्या सहभागाने अहमदपूर ची सामाजिक एकता अधोरेखीत झाली.

यावेळी अहमदपूरचे नूतन नगराध्यक्ष स्वप्निल व्हत्ते, दिलीपराव देशमुख, ॲड. भारत चामे, रोटरीचे अध्यक्ष कपिल बिरादार, सचिव धीरेंद्र ढेले, पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार तसेच नूतन नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमदपूर सायकलिंग असोसिएशन, रोटरी क्लब अहमदपूर आणि रनर्स ग्रुप अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायकल यात्रेत एकूण ११ सायकलवीर सहभागी झाले आहेत. हे सायकल स्वार रोज सुमारे १५० किलोमीटर अंतर पार करत सायकलवीर अयोध्येस पोहचणार आहेत.

ही यात्रा श्रद्धेइतकीच संविधानातील बंधुता, समानता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांचा सन्मान करणारी आहे. नवनाथ हंडे, धनंजय तोकले, भरत ईगे, सूर्यकांत साकोळे, कल्पक भोसले, अजबसिंग यादववंशी, शेख लुल्ला, तुकाराम उगीले, कृष्णा काळे, नामदेव बरुरे आणि सतीश गुरमे हे सायकलवीर सहभागी आहेत.

अहमदपूर चे तरुण छत्रपती शिवरायांना नतमस्तक होऊन प्रभू श्रीराम दर्शना साठी जात असल्याचे समाधान मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

# मैलारा मल्लण्णा देवरा जत्रा महोत्सवात पुजाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २७ डिसेंबर :** बिदर जिल्ह्यातील भालकी तालुक्याच्या मैलारा गावात महिनाभर चाललेल्या मल्लण्णा देवरा जत्रा महोत्सवाच्या समारोप प्रसंगी, मंदिराने मंदिरातील वडीलधारी मंडळी आणि पुजाऱ्यांचा सत्कार केला.

मंदिराच्या सभोवतालच्या गणेश कुंड, थेप्पडा कुंड, ज्योतिर्लिंग मंदिर आणि घृतमारी मंदिरांमध्ये नैवेद्य अर्पण करण्यात आले. मंदिराने वडीलधारी मंडळी आणि मंदिराच्या प्रशासकांचा, तसेच नंतर कुलकर्णी सचिव संजीव कुमार सुंदल यांचा शाल पांघरून सत्कार केला.

महिनाभर, विविध राज्यांतील सात कोटींहून अधिक भाविकांनी कडाक्याच्या थंडीत मैलारा लिंगाच्या भक्तीत लीन होऊन देवाचे दर्शन घेतले आणि स्वतः ला पावन करून घेतले. आज, समारोपाच्या दिवशी, मंदिराच्या ज्येष्ठ वाग्गैय्यांसह अनेक



वाग्गैय्यांची पूजा करून आणि त्यांना कोतांबी (नैवेद्य) देऊन जत्रेची सांगता झाली. आलेल्या सर्व भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती आणि देवाचे वस्त्र प्रसाद म्हणून वाटण्यात आले.

समारोप समारंभाच्या निमित्ताने सज्जी रोटी, भजी, भर्ता, हुग्गी, अण्णा सांबार, होळीगे यासह शिवशरणप्पा वाग्गे, मुख्य पुजारी बसप्पा हिरिवाग्गे, पुजारी मल्लिकार्जुन हिरिवाग्गे, प्रकाश हिरिवाग्गे, आकाश हिरिवाग्गे, बीरप्पा पुजारी, पंडित पुजारी, शिवाजीराव जकनाळ, मारुती बालाथा, आनंद एकलर, अनिल एकलर, दशरथ अतिवाला, हणमंत कामठाणा, पंढरी बरदापुरा, बसवा मालेगाव, मल्लप्पा खानादला, प्रभू हिरिवाग्गे आणि शिवकुमार हिरिवाग्गे यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.

# पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली किनगाव पोलीस ठाण्याची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. २७ डिसेंबर :** नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप (भा.पो.से.) यांनी गुरुवार, दि. २६ डिसेंबर रोजी किनगाव पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी केली.

या वेळी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोळे तसेच किनगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके उपस्थित होते. यासोबतच किनगाव परिसरातील पोलीस पाटील संघटनेचे सर्व पुरुष व महिला पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. वार्षिक



तपासणीदरम्यान विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटलांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या कामकाजाची माहिती घेतली. यावेळी पोलीस पाटलांनी विविध समस्या व अडचणी मांडल्या. त्यावर प्रतिक्रिया देताना उमाप यांनी योग्य व नियमाप्रमाणे तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

तसेच पोलीस पाटील संघटनेच्या वतीने विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोळे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित पोलीस पाटलांनी पोलीस प्रशासनाकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही समन्वय राखून काम करण्याचा विश्र्वास व्यक्त केला.

# सेवानिवृत्त शिक्षक सुरेश पांचाळ यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २६ डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील मेहकर येथील रहिवाशी असलेले आळवाई येथील शांतिनिकेतन उच्च प्राथमिक शाळेचे सहशिक्षक सन्माननीय सुरेश माणिकराव पांचाळ यांचा सेवानिवृत्ती बद्दल २४, डिसेंबर रोजी बुधवारी दुपारी ठीक तीन वाजता मेहकर येथील त्यांच्या राहत्या निवास्थानी सेवानिवृत्तीबद्दल त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आळवाई येथील शांतिनिकेतन शाळेचे मुख्याध्यापक दादाराव जिंके, उमाकांत बिडवे, उल्हास कांबळे, बंडेपा पांचाळ, अण्णाराव सुतार, बाबुराव मंगणे, पत्रकार दत्तात्रय साबणे, बालाजी शिंदे, आप्पासाहेब पाटील, वीरशेट्टी कटाळे, वेंकटराव हाडोळे, मारुती सूर्यवंशी, हनुमंत भंडारे, सुवर्णा गादगे यांच्यासह या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पती-पत्नी सौ. जयश्री सुरेश पांचाळ यांचा सेवानिवृत्ती बद्दल मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका पाहुणे मित्रमंडळी व गावातील प्रतिष्ठित मंडळी यांच्या वतीने शालप-




ुष्पहार फेटा व कपड्याचा फुल आहेर देऊन दोघा पती-पत्नीचा सात्विक सत्कार करण्यात आला.

सुरेश माणिकराव पांचाळ यांचे फर्स्ट अपार्टमेंट आळवाई येथील शांतिनिकेतन उच्च प्राथमिक शाळेमध्ये १७,०६,१९८७, रोजी शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाले पहिली ते सातवीचे शिक्षण तुगाव हा येथील सरकारी शाळेत तर आठवी ते दहावीचे शिक्षण औराद शहाजानी येथील महाराष्ट्र विद्यालयात झाले नंतर ११ वि ते १२ वि इंटरशिप भालकी येथील शिवाजी कॉलेज येथे झाले सहशिक्षक म्हणून एकूण ३८ वर्ष चांगली सेवा देऊन ते सेवानिवृत्त झाले त्यांना एकूण ५ भाऊ विजय पांचाळ अनिल पांचाळ सुनील पांचाळ शशिकांत पांचाळ त्यांना एकूण ३ मुले भागवत पांचाळ आशिष पांचाळ रोहन पांचाळ यांच्यावतीने सौ जयश्री सुरेश पांचाळ यां आई-वडिलांना शाल पुष्पहार व प्रत्येकी ५ ग्राम सोन्याची अंगठी घालून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन भागवत पांचाळ यांनी मानले.

# पेन्शनर्स डे, वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथे दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी लातूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन, लातूर यांच्या वतीने पेन्शनर्स डे तसेच २०२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बापूराव आनंदराव देवंगरे यांनी भूषविले.तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष भुसने साहेब, जिल्हा सचिव मानकर के. एस., तसेच संस्थात्मक तालुकाध्यक्ष व शिक्षण महर्षी प्रभाकरराव कुलकर्णी (पेटे बिडी) हे मान्यवर उपस्थित होते. याशिवाय माजी मुख्याध्यापक ज्ञानोबा चिवडे, सूर्यकांत गुरुजी येरोळकर, एस. एस. पाटील, मोहनराव भोसले, ॲड. रमेश उंबर्गे, पोपडे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे सरन्यायाधीश मा. चंद्रचूड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी ८० वर्षांवरील ज्येष्ठ पेन्शनर्सचा शाल, श्रीफळ व असा हा 'प्रभाकर' हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानितांमध्ये हंद्राळे विठ्ठलराव, गुरुजी डाखरे सर, डॉ. उडदे रामराव, श्रीमती. रोशाबाई केशवराव चोचंडे, उमाकांत राव यांचा समावेश होता.

अध्यक्षीय समारोपात बापूराव देवंगरे यांनी पेन्शनर्सच्या विविध प्रश्र्नांवर आपले विचार मांडले. यावेळी जिल्हाध्यक्ष भुसने साहेब व जिल्हा सचिव मानकर सर यांनी पेन्शनर्सना शासकीय योजना, हक्क व प्रलंबित प्रश्नांबाबत सखोल माहिती व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा. चोचंडे प्रभाकर यांनी केले. मागील वर्षाचा अहवाल वाचन तालुका सचिव गुंडेराव आवाळे सर, तर आर्थिक अहवालाचे वाचन तालुका कोषाध्यक्ष वलांडे यांनी केले. आभार प्रदर्शन इंदलकर किशनराव यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरहरे, गुंडे, फुलार, देशमुख मॅडम, फुलारी मॅडम, उमाकांत देवंगरे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमात शिरूर आनंतपाळ तालुका भरातून अनेक पेन्शनर्सनी उपस्थिती नोंदवली, त्यामुळे कार्यक्रम अतिशय उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# महात्मा गांधी महाविद्यालयात वीर बालदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २७ डिसेंबर :** नानभारत ही शूर आणि वीरांची भूमी आहे. अनेक योध्यांनी आपले बलिदान देऊन भारतभूमीला वैभवशाली केले आहे. भारतामध्ये त्याग आणि बलिदानांचेही अनेक सर्वोच्च दाखले आपणास मिळतात. शीख धर्माचे दहावे गुरु, गुरू गोविंदसिंह यांच्या बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेहसिंह या दोन मुलांनी लहान वयामध्ये असताना दिलेले बलिदान हे त्यांच्या त्यागाचे व शौर्याचे सर्वोच्च प्रतीक आहे. असे प्रतिपादन डॉ यादव सूर्यवंशी यांनी केले.

याचे सविस्तर वृत्त असे की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक २३ डिसेंबर २०२५ च्या शासन आदेशानुसार येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांचा बलिदान दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ यादव सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी भारतातील बहुविध धर्म, बहुविध पंथ व बहुविध भाषा-संस्कृतींचा उल्लेख करून हे विविधतेतील वैभव टिकवून ठेवण्यामध्ये येथील सर्व धर्मातील महामानवांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिलेले आहे. शीख धर्मातील जोरावरसिंह आणि फतेहसिंह यांचे बलिदान हे खरे शौर्याचे आणि त्यागाचे प्रतीक असून, आजच्या विद्यार्थ्यांनी त्याचा बोध घेतला पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास व कलागुणांच्या बरोबरीनेच नैतिक मूल्ये आणि कर्तव्यनिष्ठतेचा मूलमंत्र दिला. तसेच यावर्षी अतिवृष्टीच्या काळामध्ये चिलखा येथील ओढ्याच्या पुरात वाहून जाणाऱ्या




तीन मजूरांचे प्राण वाचविलेल्या रासेयो विद्यार्थी पवार सूर्यकांत सिताराम व कदम मारोती पुरूषोत्तम यांचा त्यांनी आज वीर बाल दिनी विशेष गौरव कैला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी माकणे- पाटील यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश देशमुख, प्रा. डी. जी. पुरी, प्रा. प्रकाश डवरे, पवार सूर्यकांत, राठोड आदिती यांची उपस्थिती होती. आभार डॉ प्रकाश देशमुख यांनी मानले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## *राष्ट्र सेवा दल दिनदर्शिकेचे भूषण यांच्या हस्ते प्रकाशन*

***लातूर :*** *राष्ट्र सेवा दलाच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने स्व. पन्नालाल सुराणा यांचे मुखपृष्ठ असलेली २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते लातूर येथे करण्यात आले. लातूरच्या दयानंद सभागृहात स्व. मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिदिनानिम्मित आयोजित एका कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी समजवादी नेते सुभाष वारे, डॉ.नागोराव कुंभार, अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. गणेश गोमारे, मजविपचे शिवाजी नरहरे, आणि राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.*

# माजी आमदार धर्माजी सोनकवडे राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये



**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २७ डिसेंबर :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री

अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व तसेच महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात पक्षप्रवेश झाला.

पक्षप्रवेश झाल्याबद्दल देवणी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी आदरणीय धर्माजी सोनकवडे यांनी अजित पवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन हे अभिवचन दिले.

या सत्कार सोहळ्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गजानन भोपणीकर, युवक प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे, युवक शहराध्यक्ष प्रितम आष्टूरे, जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे, शहर कार्याध्यक्ष रितेश सूर्यवंशी, तालुका कार्याध्यक्ष अजय भोळे आदी उपस्थित होते.

यावेळी देवणी नगरपंचायतीचे माजी बांधकाम सभापती प्रा.डॉ. अनिल इंगोले, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, जितेंद्र शिवगे, महादेव रोटे, साईनाथ गायकवाड यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

# मेहकर गव्हर्मेंट हायस्कूल येथे दहावीच्या वर्गमित्रांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २६ डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील मेहकर येथे २१ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी ठीक ११ वाजता मेहकर येथील गव्हर्मेंट हायस्कूल येथे १९८९-९० या वर्षातील दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी वर्गमित्रांच्या वतीने गुरुवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्गमित्र मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गव्हर्नमेंट हायस्कूलचे मुख्याध्यापक सन्माननीय प्रकाश बिरादार प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवराय पाटील सेवानिवृत्त शिक्षक शाहूराव पासमे, वामनराव पाटील, गोविंदराव ढाले ,कृष्णा कुलकर्णी, सेवानिवृत्त सेवक किसनराव खटपटे एस डी एम सी चे अध्यक्ष व्यंकट दंडवते बेस्ट अँकरिंग अशोकराव पाटील गुरुजी दिगंबर तेलंग, श्रीमंतराव गणेश वाडे, हीरासिंग भोई, संजीव मंगणे, अमृत पाटील , विशाल चिडगुपे, प्रशांत डोंगरे, पत्रकार दत्तात्रेय साबणे, वीरशटी करकले, सौ




मंगला नीलकंठ हिलालपुरे, एम टीव्ही कन्नडा चैनलचे पत्रकार महादेवी लाखे या प्रमुख मान्यवरांचा सत्कार शाल पुष्पर व स्वामी विवेकानंद प्रतिमा देऊन या वर्ग मित्रांच्या वतीने व शाळेच्या वतीने सर्व वर्ग मित्रांना ही शाल पुष्पहार देऊन सात्वीक सत्कार करण्यात आला.

या प्रमुख मान्यवरांच्या व वर्ग मित्राच्या हस्ते लक्ष्मी माता प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. आठवण शाळेची मैफिल वर्गमित्राची हा असा वर्ग मित्रांचा कार्यक्रम पहिल्यांदाच या मेहकर येथील गोरमेंट हायस्कूल मध्ये ३५ वर्षाच्या नंतर हा कार्यक्रम अगदी शांततेत पार पडला गोरमेंट हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी व वर्ग मित्रांनी व विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपले अल्प परिचय दिले व मनोगत व्यक्त केले.

यावेळी वर्गमित्र भानुदास कांबळे यांच्यावतीने सर्व वर्गमित्र विद्यार्थी विद्यार्थिनींना शाल पुष्पहार पेढा व सुविचार प्रिंट पेपर देऊन सात्विक सत्कार करण्यात आला.

यावेळी सुभाष कांबळे, व्यंकट लाळे, संजय बिरादार, सत्यवान कुडपणे, यांच्यासह वर्गमित्र पंडित बिडवे, रणधीर बिरादार, राजू पाटील, अरविंद डोंगरे, धनाजी वाघमोडे, बालाजी ढोले, भानुदास कांबळे, लिंबराज पाटील, रुपेश पाटील, दत्ता पाटील, दुष्यंत साळुंखे, सुधाकर मोरे, सतीश कारभारी, मुकेश कारभारी, वैजनाथ बिडवे, दिलीप जाधव, मसाजी जेधे, शशिकांत पांचाळ, शिवाजी बिरादार, सतीश जोशी, व्यंकट गायकवाड, श्रीरंग गायकवाड, देविदास राठोड, अंबादास गायकवाड, सौ शोभा भोवी, सौ संगीता देशमुख, सौ जयश्री हुलसुरे, सौ सुमित्रा लंबे, सौ प्रभावती हंगरगे, सौ अनिता मोरे, सौ विजयालक्ष्मी बिरादार, यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका सेवानिवृत्त मुख्याध्यापक सेवानिवृत्त शिक्षक वर्गमित्र विद्यार्थी विद्यार्थिनी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक बाबुराव पाटील गुरुजी यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश बिरादार यांनी मानले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. शितल शिंदे यांची एम.डी. साठी निवड

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२७ डिसेंबर -
कळंब तालुक्यातील सात्रा गावच्या कन्या डॉ. शितल शिंदे यांची वैद्यकीय नीट पी.जी. २०२५ प्रवेश परीक्षेतील गुणांच्या आधारे नाशिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम.डी. (रेडिओलॉजी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल सात्रा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. शितल शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण विद्याभवन, कळंब येथे झाले. इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी राजर्षी शाहू कॉलेज, लातूर येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. पदवी संपादन केली. या उज्ज्वल यशाचे श्रेय त्यांनी आपले आई-वडील व भाऊ यांना दिले आहे.

सत्कार कार्यक्रमास सात्रा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, तात्यासाहेब सुरवसे, रमेश शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी पटणे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



# चोराखळी गण अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव

**भाजपकडून गावोगावी बैठका... मलकापुरात कार्यकर्त्यांची आग्रही मागणी...**

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२७ डिसेंबर -
येरमाळा गटातील चोराखळी हा गण आगामी निवडणुकीसाठी अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी गावोगावी निरीक्षक पाठवून कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. त्याच अनुषंगाने मलकापूर येथे शनिवार, दि.२७ रोजी सकाळी भाजप



कार्यकर्त्यांची इच्छुक उमेदवारांसह बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीसाठी पक्ष निरीक्षक म्हणून धाराशिव जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष अभय इंगळे, जिल्हा परिषद सदस्य मदन बारकुल, खंडु मैंदाड हे उपस्थित होते. या बैठकीत मलकापुर येथील भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते सुधीर पायाळे यांच्या पत्नी स्नेहा पायाळे यांना चोराखळी पंचायत समितीची उमेदवारी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी निरीक्षकांकडे केली.

पक्षाच्या पडत्या काळातही सुधीर पायाळे यांनी मागील पंचायत समितीची निवडणूक लढवून पक्षाला बळ देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. त्यामुळे आता पक्षाच्या चांगल्या दिवसात पायाळे कुटुंबाला न्याय मिळावा, अशी अपेक्षा गावातील तरुण कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी निरीक्षकांनी कार्यकर्त्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले. कार्यकर्त्यांना योग्य न्याय दिला जाईल तसेच तुमची मागणी पक्षश्रेष्ठींपर्यंत मांडली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या बैठकीमुळे चोराखळी गणातील भाजपच्या राजकीय हालचालींना आणखी चालना मिळाली आहे.

## तत्त्वनिष्ठ व कार्यतत्पर अधिकारी-कर्मचाऱ्यांचा विद्यार्थिनींकडून सत्कार

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२७ डिसेंबर -
शासकीय कार्यालयांतील दिरंगाईबाबत तक्रारी ऐकू येत असतानाच कळंब उपजिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठेचे उदाहरण घालून दिले. उपजिल्हाधिकारी गणेश शिंदे, नायब तहसीलदार गोपाल तापडिया, दिनेश मंडलिक व लिपिक अशोक जाधव यांनी दाखवलेल्या कार्यतत्परतेमुळे दोन विद्यार्थिनींचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेश वेळेत पूर्ण होऊ शकले.

कळंब येथील सुहाना मुस्ताक बागवान व वैष्णवी प्रशांत दिक्षीत यांना महाराष्ट्र सीईटी सेलमार्फत अनुक्रमे बी.यू.एम.एस. व बी.वाय.एन.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित झाला होता.

मात्र आवश्यक प्रमाणपत्रांतील त्रुटींमुळे प्रवेश अडचणीत आला होता. सायंकाळी पाच वाजेपर्यंतची मुदत लक्षात घेता नायब तहसीलदार गोपाल तापडिया यांनी अवघ्या एका तासात आवश्यक कागदपत्रे निर्गमित करून ती संबंधित महाविद्यालयांना पाठवली. त्यामुळे वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली.

या कार्यतत्परतेबद्दल आज विद्यार्थिनी, पालक व वैद्यकीय शिक्षण प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शक संतोष भांडे यांच्या वतीने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## प्रेप, धाराशिव येथे ख्रिसमस साजरी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२७ डिसेंबर -
प्रेप, धाराशिव येथे विद्यार्थ्यांनी 'आनंदी, तेजस्वी आणि प्रकाशाने भरलेले' या आनंददायी थीम अंतर्गत ख्रिसमस सचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरवात शिक्षकांनी सांगितलेल्या 'चमकू इच्छिणारा छोटा तारा' या सुंदर व प्रेरणादायी गोष्टीने झाली.

या कथेतून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास ठेवण्याचे, आपल्या प्रकाशाने इतरांचे आयुष्य उजळवण्याचे तसेच समाजासाठी उपयोगी होण्याचे महत्त्व सम जावून सांगण्यात आले.

# नळदुर्ग शहर स्वच्छ-सुंदर करण्यासाठी कटिबद्ध : नगराध्यक्ष बसवराज धरणे

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२७ डिसेंबर -
नळदुर्ग शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन नळदुर्गचे नूतन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले.

नळदुर्ग शहर राजपूत समाज मंडळाच्या वतीने दि.२६ डिसेंबर रोजी नूतन नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सत्कार समारंभात ते बोलत होते.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह नगरसेवक दत्तात्रय दासकर, नय्यर जहागीरदार, पांडुरंग पुदाले, इमाम शेख, तानाजी जाधव, रीजवान काझी, किशोर नळदुर्गकर तसेच नगरसेविका छमाबाई राठोड, मिनाक्षी काळे, सुमन ठाकूर, राणी सुरवसे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच परंडा व धारूर नगरपालिकेतून निवडून आलेले राजपूत समाजाचे नगरसेवक मदनसिंह सद्दीवाल, रोहित हजारी, समरजित ठाकूर व रमेश परदेशी यांचाही यावेळी भव्य सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्ष बसवराज धरणे म्हणाले की, नळदुर्ग शहरातील राजपूत समाज कायम भाजप-शिवसेना युतीच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला आहे. निवडणुकीदरम्यान दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू. येत्या एका महिन्यात त्याचा अनुभव नळदुर्गवासियांना येईल. शहरातील स्वच्छतेच्या कामावर सर्वप्रथम लक्ष केंद्रित करण्यात आले असून ऐतिहासिक नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा संकल्प आहे. आम दार राणा जगजितसिंह पाटील व भाजपचे नेते सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात विकासकामे राबवून नळदुर्ग शहराचा कायापालट करून दाखवू, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक दत्तात्रय दासकर, नय्यर जहागीरदार, इमाम शेख व तानाजी जाधव यांनीही मनोगत व्यक्त करत शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी सर्व



नगरसेवक एकत्रितपणे काम करणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमास भाजपचे नेते सुशांत भुमकर, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, विशाल डुकरे, शिवाजी सुरवसे, स्वप्नील काळे, सिराज काझी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच नळदुर्ग शहर राजपूत समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक सुधीर हजारी, सरदारसिंग ठाकूर, पवनसिंग हजारी, सागरसिंग हजारी, सुरेश हजारी, सनी हजारी, अतुल हजारी, अक्षय हजारी, शुभम हजारी, अरुण ठाकूर, अभिजित ठाकूर, महेश हजारी, सौरभ गहेरवार, किरण ठाकूर, विजय ठाकूर, अजित हजारी, जगदीश गहेरवार, बालसिंग चव्हाण यांच्यासह राजपूत समाज मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब बनसोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सागरसिंग हजारी यांनी केले.

## जिजाऊ मेमोरियल महाविद्यालयात वीर बाल दिवस साजरा

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२७ डिसेंबर -
लोहारा शहरातील जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालयात दि.२६ रोजी वीर बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंह तसेच त्यांचे शहीद व पराक्रमी पुत्र साहिबजादा जोरावरसिंह व साहिबजादा फतेहसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुष्का देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वीर बाल दिवसाचे महत्त्व सांगताना प्रा. यशवंत चंदनशिवे म्हणाले की, २६ डिसेंबर हा दिवस सन २०२२ पासून देशभर 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. गुरु गोविंदसिंह यांचे पुत्र साहिबजादा जोरावरसिंह (वय ९) व साहिबजादा फतेहसिंह (वय ६) यांनी मोगल शासकांच्या अन्यायाविरुद्ध अपार शौर्य दाखवत धर्मांतराच्या अमानुष अत्याचारांपुढे न झुकता मातृभूमी व धर्मासाठी प्राणांची आहुती दिली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी विलास बाभळे, वैष्णवी लोहार, आण्णासाहेब देवकर, नागेश चव्हाण, अनस शेरीकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## येरमाळ्यातील शेतकऱ्याने केळी निर्यातीद्वारे साधले लाखोंचे उत्पन्न

> माझे पदवीत्तर शिक्षण जल व भूमी व्यवस्थापन विषयातून झाले आहे. जैन इरिगेशन कंपनीची नोकरी सोडून झालेल्या शिक्षणाच्या आधारे घरची शेती करण्याचा निर्णय घेतला. पारंपरिक पिकांसोबत एक एकर केशर आंबा व एक एकर कोकण भाडोली जांभूळ फळबाग लागवड केली आहे. गेल्या वर्षी पहिल्यांदाच केशर आंबा उत्पादनातून अडीच लाख रुपयांचा नफा मिळाला.
> **- समाधान तानाजी बारकुल,** शेतकरी, येरमाळा

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२७ डिसेंबर -
शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन व निर्यातक्षम वाणांची निवड केल्यास कमी क्षेत्रातूनही भरघोस उत्पन्न मिळू शकते, हे येरमाळा येथील प्रगतशील शेतकरी समाधान तानाजी बारकुल यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. जानेवारी २०२५ मध्ये लागवड केलेल्या जी-९ वाणाच्या केळी पिकातून थेट इराक देशात निर्यात करत त्यांनी सुमारे ७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे.

समाधान बारकुल यांनी पदवीनंतर जल व भूमी व्यवस्थापन विषयात एम.एस्सी. पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता, घरची २५ एकर शेती आधुनिक पद्धतीने कसण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यावर्षी त्यांनी पावणे दोन एकर क्षेत्रात जी-९ वाणाची सुमारे २ हजार केळीची रोपे लावली. या संपूर्ण पिकासाठी अंदाजे १ लाख ५० हजार रुपये खर्च आला.

योग्य खत व्यवस्थापन, वेळेवर पाणीपुरवठा, रोग-किड नियंत्रण तसेच निर्यात दर्जानुसार फळांची काळजीपूर्वक हाताळणी व जोपासना केल्यामुळे केळी पिकाची थेट इराक देशात निर्यात करण्याचे यश त्यांना मिळाले.



या लागवडीतून सुमारे ४० टन उत्पादन अपेक्षित असून त्यातील मोठ्या प्रमाणात माल परदेशात निर्यात करण्यात आला आहे.

निर्यातीतून मिळालेल्या उत्पन्नातून खर्च वजा जाता सुमारे साडेपाच लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न त्यांच्या हाती शिल्लक राहिले आहे. विशेष म्हणजे, निर्यातीनंतरही उर्वरित केळी स्थानिक बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असून त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे.

जी-९ वाणाची केळी आकाराने मोठी, टिकाऊ व निर्यातक्षम असल्याने परदेशी बाजारात मोठी मागणी आहे. योग्य नियोजन केल्यास शेतकरी थेट निर्यातीशी जोडले जाऊ शकतात, याचा आदर्श समाधान बारकुल यांनी होतकरू शेतकऱ्यांसमोर ठेवला आहे.

या यशामुळे परिसरातील इतर शेतकरीही केळी लागवड व निर्यातीकडे वळू लागले असून शेतीतून शाश्वत व फायदेशीर उत्पन्न मिळवण्याचा नवा मार्ग खुला झाला आहे. बाजारातील चढउतारांचा अभ्यास करून पिकांचे योग्य संगोपन केल्यास यश निश्चित मिळू शकते, हे या प्रयोगातून स्पष्ट झाले आहे.

## वाशी येथे ब्रह्मकुमारी संस्थेतर्फे जीवन का आधार - गीता का सहारा विशेष कार्यक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२७ डिसेंबर -
वाशी येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने आयोजित जीवन का आधार गीता का सहारा या विशेष कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या राजयोगिनी ब्रह्मकुमारी उषा दीदी (माउंट आबू, राजस्थान) यांनी सुमारे एक तास प्रभावी प्रवचन केले.

या प्रवचनात उषा दीदी यांनी श्रीमद्भगवद्गीतेचे अद्भुत रहस्य अत्यंत सोप्या व हृदयस्पर्शी शब्दांत उलगडून सांगितले. त्यांनी पारिवारिक शांतता, आत्मिक सम धान व परमात्म्याची अनुभूती यांचे महत्त्व विशद करत, सध्याच्या संघर्षमय जीवनात परिवर्तन घडवून सुख व शांतीचे जीवन कसे घडवावे, यावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजयोगिनी ब्रह्मकुमारी सोमप्रभा दीदी (संचालिका, उपक्षेत्र सोलापूर) उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा विजया गायकवाड, उपनगराध्यक्ष सुरेश बाप्पा कवडे, माजी नगराध्यक्ष नितीन तात्या चेडे, कृषी अधिकारी उमा देवी बाराते, डॉ. दत्तात्रय कवडे, ॲड. शांता देशमुख, भारत बाप्पा मोळवणे, ॲड. वीरेंद्र पाटील, डॉ. दयानंद कवडे, ॲड. प्रदीप देशमुख, छगन नाना मोळवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच गावातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सोलापूर, धाराशिव, येरमाळा, तेरखेडा व वाशी येथील ब्रह्मकुमारी परिवाराचीही मोठी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरवातीस ब्रह्मकुमारी सोमप्रभा दीदी यांच्या हस्ते वाशी येथील सैलानी बाबाजवळ ब्रह्मकुमारी गीता पाठशाळेचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहणही करण्यात आले. वाशी सेंटरवर उषा दीदी यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. उपस्थित पाहुण्यांचा पुष्पगुच्छ, शाल व छायाचित्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सुरेश बाप्पा कवडे व नितीन चेडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ब्रह्मकुमारी शारदा मोळवणे, छबुबाई कुदळे तसेच इतर ब्रह्मकुमारी भगिनींनी विशेष परिश्रम घेतले.

## कळंब जिल्हा व सत्र न्यायालयात ई-न्यायालयीन प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२७ डिसेंबर -
कळंब येथील जिल्हा व सत्र न्यायालयात ई-न्यायालयीन प्रणालीबाबत प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. या कार्यशाळेचे आयोजन जिल्हा न्यायालयाच्या इमारतीत करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) पी.आर. कुलकर्णी होते, तर मार्गदर्शक न्यायाधीश ए.डी. जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यशाळेत येणाऱ्या काळात न्यायालयीन संपूर्ण माहिती (डाटा) ऑनलाइन पद्धतीने कशी हाताळावी, याबाबत प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ॲड.एस.आर. आगलावे व ॲड.ए.पी. कोल्हे यांनी ई-न्यायालयीन प्रणालीच्या विविध बाबींवर सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार प्रदर्शन विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड.बी.बी. साठे यांनी केले. या कार्यशाळेसाठी वरिष्ठ व कनिष्ठ विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यंकटेश महाजन महाविद्यालयात 'गझल लेखन : तंत्र व प्रकार' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२७ डिसेंबर -
येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात मराठी साहित्यप्रेमी, विद्यार्थी, संशोधक व नवोदित कवींकरिता 'गझल लेखन : तंत्र व प्रकार' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन दि.२९ डिसेंबर सोमवार रोजी करण्यात आले आहे.

व्यंकटेश महाजन महाविद्यालय, साहित्य भारती धाराशिव, मराठवाडा साहित्य परिषद, अक्षरवेल साहित्य मंडळ धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने व प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान यांच्या सहयोगाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून गझलेच्या शास्त्रीय रचनेपासून ते आधुनिक अभिव्यक्तिपर्यंतचा प्रवास उलगडून दाखविणे, तसेच गझल लेखनातील बारकावे प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.




या कार्यशाळेत गझलेचे काफिया, रदीफ, मतला, मकता, शेरचना, तसेच विविध प्रकारच्या गझलांचे सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील माजी मराठी विभाग प्रमुख ज्येष्ठ गझलकार व अभ्यासक डॉ. अविनाश सांगोलेकर हे सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच डॉ. राज रणधीर, वैभव कुलकर्णी, डॉ. स्नेहल कुलकर्णी, दस पाटील इत्यादी अनुभवी अभ्यासक व गझलकार यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागींच्या लेखनकौशल्याला दिशा देण्यात येईल.

महाविद्यालयातील विद्यार्थी, मराठी साहित्याचे अभ्यासक, शिक्षक, कवी तसेच गझल लेखनाची आवड असलेल्या सर्व रसिकांनी या कार्यशाळेत आवर्जून सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, कार्यशाळेचे समन्वयक, डॉ. सहदेव रसाळ, डॉ. मारुती गोरे, डॉ. कृष्णा तेरकर व प्रा. प्रमोद पाटील यांनी केले आहे.

**छोटी जाहिरात...**

**टि.सी हरवली आहे**

**सौरभ भागेश कोनाळे** या नावाची **इयत्ता १२ वी ची टी. सी.** किलज ते जळकोट एसटी बसने प्रवास करीत असताना दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी हरवली आहे.

तरी ही टीसी कोणाला सापडली असेल तर खालील नंबरवर संपर्क साधावा.

**मोबाईल नंबर :-**
८७८८०६६२३१

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या प्रिन्स सोनवणेची चमकदार कामगिरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** भारतीय शालेय खेळ महासंघ तसेच उत्तर प्रदेश माध्यमिक शिक्षण विभाग, सहारनपूर (उत्तर प्रदेश) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. भीमराव आंबेडकर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सहारनपूर येथे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील कुराश क्रीडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूरचा विद्यार्थी प्रिन्स प्रिया विलास सोनवणे याने ३५ किलो वजन गटात महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत सिल्वर पदक पटकावले. देशभरातून सहभागी झालेल्या खेळाडूंमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रिन्सने देशात दुसरा क्रमांक मिळवून महाराष्ट्रासह आपल्या शाळेचे नाव देशपातळीवर उज्वल केले आहे.

विशेष म्हणजे, प्रिन्स सोनवणे याने यावर्षीच्या शालेय क्रीडा सिझनमध्ये विभागीय कुस्ती, बॉक्सिंग, बेसबॉल व जुदो या विविध खेळांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. जुदो कुस्तीमध्ये त्याने ब्राँझ मेडल पटकावले, त्यानंतर राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत गोल्ड मेडल जिंकून राष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट निश्चित केले. पुढे राष्ट्रीय कुराश स्पर्धेतही आपला लौकिक कायम राखत त्याने महाराष्ट्रासाठी सिल्वर मेडलची कमाई करून दिली.



# मराठवाड्याच्या सर्वांगीण विकास साधायचा तर साहित्य संस्कृती विकसीत करावीच लागेल : डॉ.नागोराव कुंभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर अनंतपाळ, दि.२७ :** मराठवाड्याचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास साधायचा असेल तर, या विभागातील राजकीय नेते, कलावंत, लेखक, समीक्षक, वाचक यांच्यासोबत काम करणार्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकार्यांनी येथे साहित्य संस्कृती वाढीस लागण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील,त्यासाठी अशा प्रकारची लहान मोठी साहित्य संमेलनेही पुरक ठरतील असे प्रतिपादन थोर विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांनी येथे केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून, श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय यांच्यावतीने दि.२७ ते २८ डिसेंबर २०२५ या दिवशी मोरया लॉन्स येथील स्मृतीशेष शिवराज पाटील चाकूरकर मराठी साहित्य नगरीतील, मातोश्री हरिबाई माधवराव पाटील मंचावर आयोजित ग्रंथ रसिक जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष पदावरुन डॉ.नागोराव कुंभार बोलत होते.

मंचावर संमेलन उद्घाटक प्रा.डॉ.रणधीर शिंदे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार, मुख्यमंत्री सचिवालयातील प्रशासकीय अधिकारी कवयित्री डॉ.मंजुषा कुलकर्णी, माजी जि.प.उपाध्यक्ष ऍड.संभाजी पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा.श्रीधर नांदेडकर, राज्य ग्रंथालय संघाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले, ज्येष्ठ साहित्यिक धनंजय गुडसूरकर, छत्रपती संभाजी नगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,गडचिरोली जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील गजभारे, ग्रंथमित्र युवराज जाधव,ज्येष्ठ शिक्षण तंत्र प्रभाकरराव कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ.म.शहाजिंदे, ज्येष्ठ साहित्यिक दगडू लोमटे, अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार,श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष एल.बी.आवाळे, सचिव डॉ. राजकुमार बोपलकर आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की, आपणाला अर्थपूर्ण जीवन जगायचे असेल तर अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आदी मुलभूत सुविधांची गरज असते तद्वतच मनाचीही जडणघडण होण्यासाठी लागणार्या गरजा पूर्ण करण्याचे काम साहित्य,तत्वज्ञान करत असते. किंबहुना त्या केवळ तंत्रज्ञान, विज्ञानाने पूर्ण होणार नाहीत. कोणताही समाज अथवा देशाला पुढे जायचे असेल तर विचारांची गरज भासते, ते मोठ्या व्यक्तींकडून मिळते त्याला देशाची सीमा नसते, ते वैश्विक असतात.जे समाजाची वैचारिक धारणा पुढे नेते. कोणताही देश आणि समाज त्या देशातील राज्यकर्त्या नेत्यांमुळे ओळखला जात नाही तर तिथे असलेले कलावंत, साहित्यिक, विचारवंत यामुळे जगात ओळखला जातो. मीठाशिवाय जेवणाला चव नाही, तसे जीवनात तत्वज्ञान नसेल तर जीवन निरस आहे.सक्षम समाजमन, माणूस घडविण्याचे काम साहित्य तत्वज्ञान करते. सुख-दुःखाच्या तीव्र दृष्टिकोणाशिवाय दर्जेदार साहित्य निर्माण होत नाही. आज देशाचं नेतृत्व करणार्यांनी साहित्य,तत्वज्ञानाकडं दुर्लक्ष झाल्याने अधःपतन झाले आहे. जेव्हा जेव्हा नेतृत्वाचा, समाजाचा तोल जातो तेव्हा त्याला आधार देण्याचे काम साहित्य करते.म्हणून साहित्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. दर्जेदार साहित्य नसेल तर समाज असुरक्षित राहतो असे सांगून अशी साहित्य संमेलने महत्वाची ठरतात, असे ठाम प्रतिपादनही डॉ. नागोराव कुंभार यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ तत्वज्ञ डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांनी प्रत्येक तालुक्यात सांस्कृतिक केंद्रे उभारावीत,




त्यात नाट्यगृह, ग्रंथालय असावे तिथे लेखन शिबीर, लेखक कलावंतांचे येजा असावी जेणे करुन नव्या पिढीला त्याचा लाभ होईल, कुटुंब,शाळा, महाविद्यालये, धर्मसंस्था, राजकारणी यांच्यावर संस्कार करण्याचे काम साहित्यामुळे होईल, बहुजन समाजात आकलन शक्ती नाही, त्यासाठी अशी संमेलने साह्यभूत ठरतील. हे ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती अनुदान मंडळ सुरु केल्याचे त्यांनी सांगितले.

माहिती तंत्रज्ञान आणि एआयने मानवी जीवन व्यापले आहे, स्मार्ट फोनमध्ये जग जवळ आले असले तरी समाज हरवतो आहे, धार्मिक बुरसटलेपण येवून माणसाचं स्वांतत्र हिरावलं जातंय, धार्मिक उन्मान वाढतो आहे, राजकीय जीवन अस्वस्थ आहे. गावगाडा फुटीच्या वाटेवार आहे.शेती संकटात आहे. महर्षी शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणं व्यापारी, भांडवलदार, दलालांनी शेतीव्यापार ताब्यात घेतला आहे.अशा वेळी या सर्व बदलाावर साहित्याने ठामपणे बोलले पाहिजे.आजचा लेखक यावर तीव्रपणे व्यक्त होत नाही. तशी शक्यता दिसत नाही,तथापि खेड्यात काही अंशी प्रतिभेचा उन्मेष दिसतोय. आजच्या साहित्य संमेलनामधून साहित्याची केंद्रे बहरत जावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन या संमेलनाचे उद्घाटन झाल्याचे डॉ.रणधीर शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

विशेष अतिथी डॉ.मंजुषा कुलकर्णी यांनी मराठी भाषा ही जगातल्या ४२ देशात बोलली जाते. देशात ती ४ स्थानावर बोलली जातेय.दरवर्षी देशात १० ते १२ हजार मराठी भाषेतील ग्रंथ प्रकाशित होतात, ती रोजच्या जगण्यात,वागण्यातून व्यक्त झाली पाहिजे, असे सांगून मराठीचा आग्रह धरावा. तिचाव्र प्रेम करा, ती मायभाषा आहे तिची लाज वाटू नये, ज्ञानविज्ञान ज्या भाषेतून दिले जाते तिथे विकास होतो. मराठवाड्यातील संतांनी मराठी भाषेत मोलाचे योगदान दिले आहे असे सांगितले आणि यापुढे वाचकांचा सत्कार केला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

साने गुरुजी, विनोबा भावे यांच्या साहित्यामुळे समाजाला मोठा आधार मिळाला, सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमुळे साहित्य विश्व समृध्द व्हायला मदत होतेय, ग्रंथामध्ये माणसाला घडविण्याची धमक आहे असे मत डॉ.गजानन कोटेवार यांनी व्यक्त केले.

तर साहित्यिक देविदास फुलारी यांनी साहित्य संमेलनाची गरज सांगून,कवी आहेत म्हणून समाज आणि असे मत व्यक्त केले. फ.म.शहाजिंदे यांनी कवी, तत्वज्ञ आहेत म्हणून समाज नाही तर समाज आणि म्हणून हे सर्व आहेत. समाजाकडून जे जे मिळते ते साहित्यरुपाने आपण समाजाला परत देण्याचे काम करतो,समाजाने साहित्यिकांना प्रोत्साहन द्यावेत,त्याशिवाय हे कसे लिहिणार असे विचार मांडले. ऍड. संभाजी पाटील म्हणाले की, समाजात परिवर्तन कसे होईल, यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न करावेत, देशाची लोकशाही प्रबळ करायची असेल तर दिशा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. श्रीधर नांदेडकर यांनीही विचार मांडले.

या प्रसंगी प्रा. फ.म.शहाजिंदे यांची मराठवाडा साहित्य संमेलनाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या साहित्य चळवळीबद्दल तर अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार आणि वृत्तपत्र विक्रेते शिवराज खंडापूरे यांचा श्री अनंतपाळ साहित्यसेवा सन्मान देवून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी योगेश आवाळे,गिरीष आवाळे आणि आवाळे परिवाराच्यावतीने श्री अनंतपाळ नवयुवक ग्रंथालयास ५१ हजार रुपयांची देणगि देण्यात आली.प्रारंभी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.प्रभाकरराव कुलकर्णी यांच्यावरील डॉ.मन्मथ भातांब्रे लिखित ग्रंथ तसेच तुफानातील दिवे आणि शिक्षक पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या सत्राचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष लक्ष्मण आवाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डी.के.धुमाळे यांनी केले. इंजि.किरण कोरे यांनी आभार मानले. तत्पूर्वी विविध शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, भजनी मंडळ, साहित्यप्रेमींच्या सहभागाने ग्रंथदिंडी करण्यात आली. त्याचे उद्घाटन उपनगराध्यक्ष अनंत काळे यांच्या उपस्थितीत,नगराध्यक्षा चंद्रकला शिवणे यांनी केले, ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन बालाजी येरोळे यांच्या हस्ते झाले. तर प्रभाकरराव कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या संमेलनाला साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील दोन दिवशीय साहित्य संमेलनासाठी श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे नामदेव जगताप, विरभद्र भातांब्रे, त्र्यंबकअप्पा आवाळे, श्रीनिवास कुलकर्णी, डॉ.मन्मथ भातांब्रेख काशिनाथ देवंग्रे, उपाध्यक्षा सुनीता देवशटवार, उपसचिव पद्मा यरमलवार, कोषाध्यक्ष सुरेश कोटलवार, सत्यनारायण बंग, शिवाजीराव एरंडे, उमाकांत शिंदाळकर, महेमुद तांबोळी, उज्वला दुरुगकर, उज्ज्वला लादे, वकील नंदा, ललिता शिवणे, लता शेरसांडे, ब्रम्हेचा किरण, बसवराज पुजारी, वैशाली कारेगावकर, सरोजा राजपूत, ग्रंथपाल ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, सहाय्यक ग्रंथपाल शिवनंदा शिवणे, लिपिक अनंत सूर्यवंशी, गोविंद हंद्राळे, रामाभाऊ कोळगे, गुणवंत भातांब्रे, किरण कोरे, राजेंद्र कुरे आदी परिश्रम घेत आहेत.

# रेणापूर कृऊबा संचालक अशोक राठोड यांचा भाजपात प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कॉंग्रेस कार्यकर्ते अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून शनिवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी सकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे फरदपूर येथील बंजारा समाजातील कॉंग्रेसचे कार्यकर्ते रेणापूर बाजार समितीचे संचालक अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, चव्हाण, प्रवीण कोतवाल, संजय ठाकूर, नारायण राठोड, गणेश चव्हाण, उत्तम




फरदपूरचे सरपंच बालाजी राठोड, गरसुळीचे सरपंच अजय राठोड, माजी सभापती विजय चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, सुभाष राठोड, प्रकाश राठोड, राजसंघ राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर तालुक्यासह संपूर्ण लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली. सर्वत्र होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेकजण आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत.

येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघात शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते प्रयत्नशील आहे.

# आज आवर्तन मासिक संगीत सभेमध्ये सायली टाकचे गायन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, दि. २७ डिसेंबर :** येथील आवर्तन व अष्टविनायक प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येणाऱ्या १३१ व्या आवर्तन मासिक संगीत सभेमध्ये लातूर येथील युवा संगीत साधक सायली टाक यांचे गायन होणार आहे.

अभिजात शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी मागील १३० महिन्यांपासून लातूरमध्ये आवर्तन मासिक संगीत सभेचे आयोजन केले जाते, या मासिक संगीत सभेमध्ये आजपर्यंत भारतातील अनेक दिग्गज कलावंतांनी आपले गायन वादन तसेच नृत्य सादर केले आहे.

आज रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी होणारी आवर्तन मासिक संगीत सभा लातूर येथील कै.सौ. कुमोदिनी विजयराव कुलकर्णी व कै. विजय दत्तात्रयराव कुलकर्णी यांच्या स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील प्रसिद्ध फर्निचर वर्ल्ड चे प्रोप्रायटर श्री मनोज कुलकर्णी व त्यांच्या परिवाराने आयोजित केली आहे, आज होणाऱ्या या १३१ व्या मासिक संगीत सभेमध्ये लातूर येथील युवा गायिका कुमारी सायली सुनील टाक यांचे गायन संपन्न होणार आहे. व यांना तबला साथ लातूर येथील युवा तबला वादक चिरंजीव समिहन हरिसर्वोतम जोशी व संवादिनी साथ प्रा.शशिकांत देशमुख हे करणार आहेत. ही संगीत सभा आज सायं ६:३० वाजता, गणेश हॉल अष्टविनायक मंदिर लातूर या ठिकाणी होणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय शहा सचिव डॉक्टर रविराज पोरे, विशाल जाधव, फर्निचर वर्ल्ड चे मनोज कुलकर्णी व समस्त कुलकर्णी परिवाराच्या व आवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने केले आहे.

# धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** जिल्ह्यामध्ये केंद्र सरकार व कृषि आयुक्तालय यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर- घुगे यांच्या अध्यक्षतेखाली धरती माता बचाव अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

या समितीच्या बैठकीमध्ये रसायनिक खतांच्या अतिरिक्त वापर आणि बिगर कृषि कारणासाठी होणाऱ्या रसायनिक खत वापरावर लक्ष ठेण्याकरिता ग्रामस्तरावरील ग्राम कृषि विकास तथा धरती माता बचाव निगरणी समितीमार्फत गाव पातळीवर कळविण्यात आले आहे. तसेच तालुका अथवा उपविभागस्तरावर धरती माता बचाव निगरणी समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यामध्ये धरती माता बचाव अभियान अंतर्गत बागायत क्षेत्र व खताचा जास्तीचा वापर असणाऱ्या ग्रामपंचायतस्तरावर १०० गावांची निवड करावी. सदर निवडलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत ग्राम कृषि विकास समिती बैठक घेऊन रासायनिक खताचा वापर कमी करणे, बिगर कृषि कामासाठी खतांचा वापर होवू नये, यासाठी कृषि विज्ञान केंद्र शास्त्रज्ञ व समिति सदस्यद्वारे गावपातळीवर प्रचार व प्रसिद्धी करणे असा प्रकार होत असल्यास तो वेळीच तालुका व जिल्हापातळीवरील संबधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी भास्कर कोळेकर, डी. पी. जाधव, दीपक सुपेकर, डॉ. एस. एस. डिग्रसे, श्रीमती एम.यू बांगर उपस्थित होते.

# तथागत बुद्धांचा विचार मानवतेचा विचार : भिक्खु महाथेरो

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** तथागत बुद्धाने सर्व मानव जाती करीता आपल्या नितिमान धम्माची शिकवण दिली आहे. सर्व जीव प्राण्यांचे कल्याण व्हावे यासाठी करुणा, मैत्री आणि अहिंसा या उच्च तत्वाचा उपदेश केला आहे. भवतु सब्ब मंगल आणि बहुजन हिताय सुखाय हा विश्र्व कल्यानाचा मार्ग बुद्धाने सर्वप्रथम सांगितलेला आहे त्यामुळे तथागत बुध्दाचा विचार हा मानवतेच्या हिताचा विचार असल्याचे प्रतिपादन अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक पू. भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांनी केले आहे.

बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त बौध्द उपासक-उपासिकांच्यावतीने डॉ. भिक्खु उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या संयोजनाद्वारे महाविहार, धम्म संस्कार केंद्र, बार्शी रोड, सातकर्णी नगर,





रामेगाव ता. जि. लातूर येथे एक दिवशीय आठवी अ. भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात आंबेडकर चौक आणि बौध्द नगर येथून पंचरंगी ध्वजारोहण करून महापुरुषांच्या मुर्तीसह भिक्खु संघ आणि बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मिरवणुकीचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास सर्व कार्यकर्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. भिक्खु पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करून त्रिशरण पंचशिल वंदना घेण्यात आली.

धम्म परिषदेच्या दुपारच्या दुसऱ्या उदघाट्कीय सत्रात अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते पूज्य भिक्खु संघ, प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी हजारोंच्या संख्येने बौध्द जनसमुदाय उपस्थित होता. प्रारंभी सामूहिक बुद्ध वंदना करून भिक्खु संघांचे व मान्यवरांचे स्वागत केले गेले. यावेळी 'सातकर्णी' स्मरणिके सहीत आर्या मेत्ता, डॉ. मा. ना. गायकवाड यांच्याही ग्रंथाचे प्रकाशन सर्वांच्या हस्ते करण्यात आले.

# डॉ. पंजाबराव देशमुख शेतकऱ्यांचे कैवारी होते : डॉ. बिरादार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा देश आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती आणि शेतकऱ्यांना समृद्धदे करणारे धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी त्यांनी आपली प्रतिभा ऊर्जा समर्पित केली त्यामुळे ते गरीब शेतकऱ्यांची बाजू मांडणारे शेतकऱ्यांचे कैवारी होते असे प्रतिपादन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे हे होते तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. दिनेश मौने, डॉ. यशवंत वळवी, डॉ. संजय गवई, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. विनायक वाघमारे, डॉ. दीपक चाटे, प्रा. माधव नायणे, प्रा. केशव सूर्यवंशी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यक्षीय समारोप प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार डॉ. संजय गवई यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, शिवशंकर खुब्बा आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.